# मराठीची माया

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १४२३

९८५८

संग्राहक :

डॉ. ना. गो. नांदापूरकर

एम. ए., पीएच्. डी.

REFBK-0010048

REFBK-0010048

मूल्य : रु. १.५० न. पै.

# मराठीची माया

(मराठवाड्यांतील स्त्रीगीतांचा संग्रह)

REFBK-0010048

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम ........ वि: ........

क्रमांक ........ नों: दि: ........

संग्राहक :

डॉ. ना. गो. नांदापूरकर

एम्. ए., पीएच्. डी.

मूल्य : रु. १·५० न. पै.

प्रकाशक :
डॉ. ना. गो. नांदापूरकर
'आशीर्वाद'
इम्लीबन, कुतबीगुडा,
हैद्राबाद. आंध्र प्रदेश

आवृत्ति पहिली १९५८

(सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.)

मुद्रक :
जयहिंद प्रिंटिंग प्रेस.
सराफा, औरंगाबाद.

महाराष्ट्र कुलस्वामिनी
तुळजापूरची अंबाबाई
हिच्या चरणीं

# अनुक्रमणिका


| क्र. | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | संग्रहासंबंधीं | |
| २ | पहिली ओवी– | १ |
| ३ | तुळजापुरची अंबाबाई | ८ |
| ४ | जनाबाईचें जीवन | २८ |
| ५ | तुळशी–माहात्म्य | ६१ |
| ६ | विठ्ठलाचें दर्शन | ६३ |
| ७ | मायबाप-तीर्थ | ६४ |
| ८ | माझी जातकुळ | ६७ |
| ९ | जातीसाठीं खातें माती | ६८ |
| १० | पदराची बंदोबस्ती | ६८ |
| ११ | जीवाला जीव देते | ७० |
| १२ | धीराचा प्रपंच | ७१ |
| १३ | विसाव्याचं झाड | ७२ |
| १४ | देतें तल्वारीवर पायी | ७४ |
| १५ | का रे पाव्हन्या केली रात | ७५ |
| १६ | वंदु इव्हाई करीतें | ७६ |
| १७ | असं माझं दुबळपन | ७८ |
| १८ | लाडकी लेक | ८० |
| १९ | तुज्या मैनाला वाट लावूं | ८१ |
| २० | लाल पिंजरीचं कुंकू | ८३ |
| २१ | लुगडं घेतलं | ८४ |
| २२ | हौस | ८६ |
| २३ | पाऊस | ८८ |
| २४ | निफणी बाई | ९० |
| २५ | पिकलं पिकलं | ९१ |
| २६ | नांगरट | ९३ |
| २७ | सावळी सुरत | ९४ |
| २८ | गांवा गेलेला आला नाहीं | ९६ |
| २९ | दुरून वळखितें | ९८ |
| ३० | पानिवंताच्या वायांनो | १०० |
| ३१ | उन्हाळ्याचं ऊन्ह | १०१ |
| ३२ | झोंबी | १०२ |
| ३३ | घाटावरला गाडीवान | १०४ |
| ३४ | गवळी माझा गोरा चांद | १०५ |
| ३५ | माझी महेताप गवळन | १०७ |
| ३६ | देवशिंगची देवता | १०७ |
| ३७ | कठिण शब्दांचा अर्थ | १२४ |

क्रमांक ....... नों: दि: .......

## संग्रहासंबंधीं

ह्यापूर्वी मी दोन संग्रह प्रसिद्ध केले; 'माहेरचं मराठी' आणि 'मराठीचा मोहोर.' प्रस्तुत तिसरा संग्रह 'मराठीची माया' या नांवानें प्रसिद्ध करीत आहे. मजपाशीं एक लक्ष गीतांचा संग्रह असून त्यांतून आतांपर्यंत ( हा संग्रह धरून ) सव्वातीन हजार ओव्याच काय त्या प्रकाशित होऊं शकल्या. पुढे यथावकाश पण त्वरितच इतर भागहि जनतेच्या निदर्शनास येईल. चंचल स्वरूपी आणि संस्कृतीच्या प्रसाराबरोबर रूप पालटून फिरणारें हें वाङ्मय नष्ट होण्याचाहि संभव असल्यामुळेंच प्रकाशनाची घाई.

प्रस्तुत संग्रहांत तुळजापुर तालुक्यांतील ओव्या तीनचतुर्थांश असून उरलेल्या मराठवाड्याच्या इतर भागांतील आहेत. हें ह्या संग्रहाचें एक वैशिष्टयच आहे. यांत चार प्रदीर्घ गीतें आहेत. 'पहिली ओवी' ही अखिल मराठवाड्यांतील आहे. हींत देव, गुरु, माता, पिता तर आहेतच, पण इतरहि कांहीं आहे. तुळजापुरची अंबाबाई आपल्या सर्वांगसुंदर स्वरूपांत प्रगट झाली आहे. जनाबाईचें जीवनदर्शन आहे. 'देवशिगची देवता' ह्या गीतांत एकाच स्त्रीच्या कांहीं ओव्या आहेत. याप्रमाणें प्रस्तुत संग्रहांत महाराष्ट्राच्या कुलस्वामिनीचें स्तवन वर्णन, संताचें एक आख्यान आणि एका साधारण व्यक्तीच्या जीवनांतील सर्वसाधारण भाग असा वैशिष्टयपूर्ण क्रम धरला आहे. 'देवशिंगीची देवता' हें गीत तर एकीचेंच आहे. जणूं तिच्या आत्मचरित्रांतलेच तिनें आत्मीयतेनें गायिलेले ते प्रसंग आहेत.

ह्या संग्रहांतील बहुसंख्य ओव्या मराठी वर्गातील आहेत. मुसलमान, महार, चांभार, तेली, वारीक, वरठी, सुतार, सोनार,

जैन, जंगम आणि ब्राह्मण ह्या स्त्रियांच्या ओव्या अगदीं अल्प आहेत. त्याप्रमाणेंच कांहीं स्त्रियांनीं एक एक हजार ओव्या दिल्या आहेत. त्यांतून देवशिंगच्या स्त्रीची ओवी विशेष सरस आणि सलग वाटली. यास्तव तिच्या संग्रहांतून सलग विषयावरील वैशिष्टयपूर्ण पावणेदोनशें ओव्या वेगळया काढून त्यांचा एक स्वतंत्र भाग केला. तिच्या इतरहि कांहीं ओव्या या संग्रहांत त्या त्या संदर्भांत इतरत्र आहेत. या संग्रहांतील आणिक चार पांच गीतेंहि एकेकीचींच आहेत पण त्यांत एखादी दुसरी ओवी दुसरीची आहे.

एकाच विषयासंबंधीं अनेकींच्या अनेक ओव्या असतात. यांतून उत्कृष्ट ओव्या निवडून त्या सुसंगतपणानें मांडून त्यांचें एक एक गीत मी पूर्ण केलें आणि त्यांस नांव दिलें. तेंहि शक्यतों त्यांच्या ओवींतील नि त्यांच्याच शब्दांत आहे. एवढाच त्यांत माझा संबंध. त्याच्या भाषिक रूपास मी धक्का लावला नाहीं. जात, प्रान्त नि व्यक्तिनाम द्यावें, पण एक तर उभयपक्षीं संकोच, छपाईचा व्याप आणि कांहीं स्त्रियांची जात निश्चित ठाऊक नाहीं; यास्तव उपाय हरला.

प्रस्तुत संग्रह जवळ जवळ केवळ तुळजापुरचाच आहे. त्यांतील सर्व ओव्या माझे स्नेही श्री. द. पं. जोशी यांनीं स्वतः परिश्रम करून आपल्या विद्यार्थ्यांकरवीं गोळा केल्या. त्यांचा आणि सर्व विद्यार्थ्यांचा ऋणनिर्देश किती म्हणून करावा? थोडच्या थोडक्या नाहीं, त्यांनीं सव्वीस हजार ओव्या दिल्या आहेत. ह्या संग्रहांत मी निमित्तमात्र असून सर्व श्रेय श्री. जोशी आणि त्यांच्या छात्र-गणासच आहे. ज्या मावल्यांनी ह्या ओव्या दिल्या त्यांचें ऋण फिटणें तर अशक्यच. त्यांच्या चरणीं नमस्कार. मी हैद्राबादीं असून पुस्तक औरंगाबादीं छापलें तें माझे स्नेही प्रा. भगवंत देशमुख यांच्याच जिवावर. त्यांनीं अत्यंत त्रास सोसूनहि मुद्रितें तपासून

चूकभूल नीट करून पुस्तकाचें काम पार पाडलें याजसंबंधीं मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तसेंच दुसरे स्नेही जयहिंद मुद्रणालयाचे चालक यांनीं अनेक कामें हातीं असतांहि पुस्तक उत्कृष्ट स्वरूपांत आणि संकल्पिलेल्या वेळेंत वाचकांच्या हातीं दिलें यास्तव त्यांचाहि मी अत्यंत आभारी आहे.

" आशीर्वाद "
इम्लीबन, कुतबीगुडा
हैद्राबाद.
आश्विन शु॥ प्रतिपदा शके १८८०.
१३–१०–१९५८.

मराठीचा पाईक
**डॉ. ना. गो. नांदापूरकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 28929 वि: 8985
क्रमांक 1223 नों: दि: 28.12.55

मराठीची माया

पहिली ओवी

पहिली माझी वई। गणेशा गनपती
आधी नाव तुझं घेते। शास्त्रपुरान बोलती
पहिली माझी वई। गायिली हासत
देव गनपती। आले मोरया नाचत
पह्यली माझी वई। गनेस मोरया
शिद्धे व्हावा बापा। माझ्या चिंतिल्या कारया
पह्यली माझी वई। जात्याच्या हस्तकी
सोन्याच्या दुरवा। गनरायाच्या मस्तकी
पह्यली माझी वई। गनेस पागडा
नागेली बाईचा। त्याच्या सोंडावरी दोडा
पह्यली माझी ववो। गनपति गनेराजा
त्येजे खांबाशीं उभा ...
पह्यली माझी ववी। गनराज गनपती
तिथ सारजा उभी व्हती। आस साहित्य पुरवाला.
पहेली माझी ववी। गनराज गनपती
देवाला हात जोडी। शारदा उभी व्हती
पहेली माझी वई। गनेशा गायिली
शारदा मोरावरी। अशी आरूढ झाली
पहिली माझी ववी। समर्थाला गायिली
सखी मानाची राहोली। शारदाबाई माझी
पहिली माझी वई। सारजा सरस्वती
नाचत आले गनपती। पायी घागऱ्या वाजती

मराठी ग्रंथ संग्रहालय 10086

पहिली माझी ववी । गायिली गनपती
बासरच्या सरस्पती । माझा नमस्कार
पहेली माझी ववी । गनराज गनपती
करीते नमस्कार । आधी माता सरस्वती
पहिली माझी वई । गायिली परमेसरा
गंगच्या पाची धारा । मिळाल्या समिंदरा

× × ×

पहिली माझी वई । नित्य चंदनाला
माझा नमस्कार । पंचवटीच्या रामाला
पहेल्या ववीचा । म्या ग नाही नेम केला
ववीपरत गायिला । सावळा रामराय
पहेल्या वईचा । प्रसंग सोईचा
हे ग वाचेला आला सये । राम कौसल्याबाईचा
पहेल्या ववीचा । प्रसंग पडला
सहस्रापरी सये । रामराया विनविला.
पहेली माझी वई । रामराया सजनाला
मोती घाला वजनाला । सावळी सिताबाई
पह्यली माझी वई । गायाला गोड वाट
माझ्या ववीला राम भेट
पहेली माझी वई । कोनाला गाऊ बाई
देवा या मार्वतीला । बलभीमाला भईन व्हाई
पहिली माझी वई । चिंतून ठेविली
राजा पर्भूला गायिली । देवा या मार्वतीला

पहिली माझी वई । गायिते हेला तेला
बिननारीच्या पुरषाला । मारोती राईयाला
पहिली माझी ववी । येशीमधल्या रुशीला
अंजनीच्या कुशीला । असा माझा नमस्कार
पह्यल्या वईच । नाही राह्यल धोरन
राजा मार्वतीला । वया गायीन फिरून

× × ×

पहिली माझी ववी । निराकार निर्गुनाला
बाई माझा नमस्कार । वोंकार सोरूपाला
पहिली माझी ववी । ह्या ग गुरूच्या गुरूला
माझा नमस्कार अढळपदीच्या धुरूला
पहिली माझी ववी । आताशी केली सुरू
रामासंग माझे गुरू
पहिली माझी ववी । अनुसया सोयरीला
दत्तात्रयाच्या पायरीला
पहिली माझी वई । अन्नपुरनाबाईला
वेलाची वैरन । विश्वनाथाच्या गाईला
पहिली माझी ववी । काशीच्या जंगमाला
आंघुळी केल्या बाई । त्रिवेणी संगमाला
पहिली माझी ववी । गायिली दत्तात्रया
अत्रीसहित अनुसया । असा माझा नमस्कार
पहिली माझी ववी । सोन देऊन घ्यावी
साजल तिला द्यावी । दयाळ अंबिकेला

× × ×

पहिली माझी वई। पंढरी ऐकू गेली
रंगमहालात। रुक्मीन जागी झाली

पहेल्या वईचा। रथ बाई जातो जड
नाव घेता तुझ गोड। सावळ्या पांडुरंगा

पहिली माझी वई। पंढरीनाथाला
वई गायिल्याईन। हात चालना रथाला

पहिली माझी ववी। गायिली गडबडीन
देवा तुला आवडीन। सावळ्या पांडुरंगा

पहिली माझी वई। गायिली ज्याची त्याला
विटेवरल्या हरीला। माझ्या पंढरीरायाला

पहिली माझी वई। जाईन पंढरीला
बसन बारीला। गुज बोलन हरीला

पहिली माझी ववी। गायीन मनुष्याला
माझ्या हुर्दयी रहिवाशाला। हरि सावळ्याल

पहिल्या ववीचा। कोन अर्थ ग काढील
रखुमाबाईच्या माडीला। खांब रत्नाचा जोडीला

पहिली माझी ववी। जातियाच्या पाळी
गायिला वनमाळी। सावळा पांडुरंग

पहिली माझी ववी। तुळशीच्या पाना
कैलाशीच्या नारायेना। असा माझा दंडवत

पहेल्या वईचा। प्रसंग पडला
बाई या तुळसीचा। संग गर्तीचा घडला

× × ×

पहेली माझी ववी। गाऊ मी कोना कोना
येक वई दोघाजना। लक्षेमी नारायेना
पहेल्या वईचा। प्रसंग आयका
येक्या खांबावरी। कृष्ण रचीली द्वारका
पह्यली माझी ववी। भक्तीच्या भावाला
सोन्याची नगरी। देली सुदामदेवाला
पह्यली माझी ववी। भद्रीनारायनाला दंड
सख्याच्या आंघोळीला। आलकनंदा तपती कुंड
पह्यली माझी ववी। नंदाच्या नंदाला
गोकुळी गोइंदाला। माझा नमस्कार
पह्यली माझी ववी। पाची पांडवाला
द्रोपतीच्या बंदवाला। असा नमस्कार

× × ×

पहेली माझी ववी। गायिलीं साधुसंता
अंबाळीच्या भगवंता। करीते नमस्कार
पहिली माझी ववी। गायिली आवल्याला
वनामधल्या साधूबाला
पहिली माझी ववी। जात्याच्या फेरायाला
ववी बारसकराला
पहिली माझी ववी। नाथाच्या पायरीला
करीते नमस्कार। गंगाबाई सोयरीला.
पहिली माझी ववी। अरिहंत देवाजीला
नेमीच राज्य। राजामती बईईला

पहिली माझी ववी । जात्याच्या चौफेरी
उभे हाती गिरिनारी । नेमीनाथ महाराजाला
पहिली माझी वई । नेमीनाथाला गायिली
राजामती बाई । शेसे वनात राहीली

× × ×

पहिली माझी ववी । गाऊ मी कोना कोना
बाप्पाजी मायबाप । जन्म देत्या दोघाजना
पहिली माझी वई । धरतरी मेघाला
जन्म दिलेल्या दोघाला
पहिली माझी वई । गायीली इसरता
नाना माज्या दसरता
पहिली माझी ववी । पाची पांडवाला
माझ्या पाठीच्या बंदवाला
पहिली माझी ववी । गायिली सोनटक्का
ओवीजोगा प्रानसखा । भाईराजस माझा.
पहिली माझी ववी । नगरबंधाला
त्याच्या मागून चांदाला
पहिली माझी ववी । नगरीच्या बाळाला
तुम्हासंग खेळाला
पहिली माझी ववी । गायिली येकाला
शाहूराजाच्या लेकाला
पहिली माझी ववी । ऊन्ह पाहून शिराळाला
येन माझ्या मुराळयाला । भाई राजसाला माझ्या

पहिली माझी ववी । कसाराची सिता
कारला भरायाचा व्हता । कानडया रुक्मिनीला
पाटची बाई ववी । गाते मी पांगुळाला
मारुती माझा देव । गेला काशीच्या अंगुळीला

× × ×

पहिली माझी ववी । माईच्या माईला
अन् लोढन वढाळ गाईला
पहिली माझी ववी । बापाच्या बापाला
अन् दोडक लोंबत कुपाला
पहिली माझी ववी । वहाते बंधुराजा
घरी नाहीत तुटक्या बाजा । बंधु बडोद्याचा राजा
पहिली माझी ववी । मेव्हन्या दाजीला
तेज मेथीच्या भाजीला
पहिली माझी ववी । पानी चालल उसाला
गुळ सासूच्या दिसाला
पहिली माझी वई । माळावरल्या घुबडा
गळा ठेविला उघडा । लिंबुळयाच्या घाटासाठीं

# तुळजापुरची अंबाबाई

## नमन

पहिली माझी ववी । गायीली अंबाबाई
गनराज तुझ्या पायी
पहिली माझी वई । सिंफळगाईच्या येशीला
आली नगरीत चौकशीला । मुदुबा अंबाबाई
पहिली माझी वई । तुळजाभवानीला
शेला वाळतो लिंबोनीला
पहिली माझी ववी । अंबाबाई सोयरीला
असा माझा नमस्कार । तिच्या पायरीला
पहिली माझी ववी । गायिली रावळाला
अंबे तुझ्या कळस । सोन्याचा देवळाला
पहिली माझी वई । तुळजाबाईच्या तुऱ्याला
खडा शिपाई पहाऱ्याला
पहिली माझी ववी । तुळजाबाईच्या तुऱ्याला
अंबाला पाहून । शीन माझा उतरला
पहिली माझी ववी । गायिली चंडिकेला
तुझ्या माझ्या चांगलीला । तुळजापुरच्या अंबिकेला
जात्याला वैरन । घालिते येका शेज
आधी नाव घेते तुझ । अंबिका माझे बाई

× × ×

तुळजापुरची तुकाई । पावली येकदोघा ।
चल जाऊ जिवलगा । अष्ट भुजेच्या दर्शनाला

चला सयानो पाह्या जाऊ । तुळजापुराची बांधनूक
सिंहासनाला गायमुख । अष्टभुजेच्या माझ्या
चल सयानो पाह्या जाऊ । मह्या अंबेची बढाई
चंद्रसूर्याची लढाई । अंबेच्या शिखरावरी
चला सयानो पाहू । तुळजापुरची नागर
हिच्या घटाला घागर । माय माझ्या अंबिकेच्या
चला सयानो फाया जाऊ । तुळजापुरची गौळन
तिच्या नतला सुर्वेपान । तुळजाबाईच्या माझ्या
चला बघाया जाऊ । तुळजापुरची नागीन
आन्याबाईन लाविली । वल्या झाडाला आगीन

× × ×

तुळजापुराची वाट । हिरेकंकराची
तिथ नांदती तुळजा । लेक मुदुबा शंकराची
तुळजापुरच्या वाट । हाय ती आराद्याची वाडी
आई माझ्या न अंबिकेच्या । पोताला शालजोडी
तुळजापुरची वाट । पुसते आराद्याला
नव्या कमानी दरवाज्याला । अष्टभुजच्या माझ्या
तुळजापुरच्या वाट । माझ्या पायाला आला फोड
तुळजा माय माझी । अंबा डोंगराच्या आड
तुळजापुरा जाते । पायाला आले फोड
तिन धाडिल गाडीघोड । माय मह्या अंबिकेन
तुळजापुरा जाया । सुकले माझे व्हट
माझी कनवळ पान्हा लोट । दयाळ अंबाबाई

तुळजापुरा जाया । उठत बसत ।
वाडा रंभाचा पुसत । अष्ट, भुजचा माझ्या

तुळजापूरा जाते । अस तिथ आहे कोन
चिंताजोगी मायबहीन । दयाळ अंबाबाई

तुळजापुरा जाया । आडवी लागती सुरडी
हाती फुलाची परडी । अष्टभुजेच्या माझ्या

तुळजापुरा जाया । आडव लागत इरल
अष्टभुजाला माझ्या । इला सोन्याच कारल

पाऊस टक्यान–पसून । तुळजापुर काय जवळ
आई मह्या न अंबिकेच । रूप बयाच केवळ

तुळजापुर गाव । आहे डोंगरावरी
अंबाबाई आपल्या । सावलीखाली धरी

तुळजापुर बाई गाव । यवढ हाय खोरियात
वाघ धरिला निरीयात । दयाळ अंबिकेन

तुळजापुर शहर । येशीला कुलूप
रावरंभाचा मुलुख

तुळजापुरयेशीला । सोन्याच कुलूप
पतिवर्ताचा मुलूक । तुळजाबाईचा

तुळजापुर गाव । मोट वस्तीला चांगल
मंकावतीच तळ । कोन्या राजान बांधिल

तुळजापुरामधे । तीर्थ आहे पापनास
जगदंबेच्या कृपेन । उद्धारून जाईल खास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नों: दि: ......................


तुळजापुरामध्ये । कोन सोन्याच्या परडीची
येमाबाई मारडीची
तुळजापुर गावी । कोन भाग्याची नांदती
नित्ते नौबत वाजती । तुळजाबाईईची
तुळजाबाई बसती । जागा बघून मैदानी
नांद चौघडा लावूनी
तुळजापुर शहर । दिसत गुलजार
हळदी कुकाचा बाजार । दर्शनाला जाताना
तुळजापुर शहर । दिसत लालीलाल
आई अंबिकेची । जळती दीपमाळ
आस पावन ग आहे । क्षेत्र ग तुळजापुर
माता नांदती घरोघर । अष्टभुजा माझी
तुळजापुरची महिमा । किती सांगू येडियाला
नवलाख सोन । तुळजाच्या वाडीयाला
काशी मुन काशी । जन जातेत धावत
काशी तुळजापुरात । अष्टभुजा माझी

× × ×

काळुबा कडचावरी । अंबा माझी तळघाटी
मुदुवा शंकरान । डेरा दिला वाळवंटी
नकीच घोतर । वाळवितो कोन
मुदुबा शंकर । चिचबनीचा बाम्हन
काळूबा कडचावरी । दत्तात्री चिचखाली
गायमुखाला काशी आली । तुळजाबाईच्या माझ्या

आल्याड गायमुख। पल्याड तुझा वाडा
मधी दत्ताचा आखाडा। चिचखाली शोभा देतो.

उशीर मला झाला। देवळात येता येता
वाटवरी वाडा व्हता। माझ्या मातंगीबाईचा

तुळजाबाई माझी माता। मातंगी मावशी
दोघीनी भेट दिली। कल्लोळ तीर्थापशी

काळुबा कड्यावरी। यवढी मातंगी ववरीला
खडा सेवक दाराला। टुळुबा तरी बाई

टुळुबा घोड्यावरीं। मातंगी महाराची
कडी उघड दाराची

काळोबा टुळोबा। जन्माचे व्यापारी
आई माझी अंबिका। बहीन भाग्याची शेजारी

काळुबा कड्यावरी। टुळुबा देसमुख
सेवा व्हती समाईक। तुळजाबाईईची

काळुबा कड्यावरी। टुळुबा पायी पेदा
सिंफळाला गेली राधा। अंबिका माझी बाई

काळुबा कड्यावरी। टुळुबा घोड्यावरी
गस्त राधच्या वाड्यावरी। बाई अंबिकेच्या माझ्या

काळोबा टुळोबा। अंबिकेचे ग कारकून
मोती घेतले पारखून

पंचरंगी बाशिंग। देवा काळोबाच्या शिरी
पुजाऱ्याची कारागिरी

देवा काळुबाची पुजा। सुरव्याच्या नीट
पुजाऱ्याला व्हईल द्रिष्ट

× × ×

देवाबीमंदी देव । तुळजा अभिमानी
चारी दरवाजे कमानी । अंबाच्या देवळाचे

तुझ्या देवळासमुक । शंकराचा पिवळा नंदी
तुझ्या कवाडाला चांदी

तुळजाबाईन देल । येळंबच्या ठिगळचाला
चांदीचे कवाड । अंबाच्या देवळाला

तुळजापुरची अंबाबाई । कोन्या राजाला पावली
तुळजाच्या सिक्राला । धज मोत्याची लावली

अंबेच्या देवळात । चंदनाचे पाट
सप्तशतीचे होती पाठ

देवीच्या देवळात । शेलाटचा उच गेल्या
पालकीच्या दांड्या केल्या । अष्टभुजच्या माझ्या

× × ×

कल्लोळावरी आहे । आवळीच झाड
माझ्या तुळजाबाईला । शोभत गादी लोड

कल्लोळ पारावरी । तिथ आवळयाचे झाड दोन
मधे गोसायाची धुन । दत्तात्री महाराजाची

अंबा म्हनूनी अंबा । हाक मारीतो तुझा भोपी
अंबा कल्लोळी तोंड धुतो

कल्लोळाच पानी । दिसत पिवळट
अंबा धुविला मळवट

कल्लोळाच पानी । दिसत नितळ
अंबा धुतील पातळ

कल्लोळाच पानी। कशान लाललाल
तिन धुतीला रंगमहाल

कल्लोळाच पानी। कशान झाल काळ
तिन धुतील काजळ

कल्लोळाच पानी। कशान ढवळल
अंबाबाईन स्नान केल

कल्लोळाच्या पायऱ्या। कशान वल्या झाल्या
माझ्या तुळजाबाईईच्या। यौगिनी पानी गेल्या

कल्लोळाच पानी। दिसत मोत्यावानी
जटा धुतिल्या गोसायानी

कल्लोळाच पानी। दिसत हिरवा पाला
बंदु तुझा गांजावाला। काळभैरव महाराज

कल्लोळाच पानी। दिसत हिरवगार
काळोबा तिचा बंदू। हाये गांजाचा तलपेदार

अंबिका माय माझी। कल्लोळा येती जाती
भोळ्या भक्ताची वाट पाहती। बाळराजाची माऊया

× × ×

देवीच्या देवळात। गायमुखाची धार
अंबा–उदेची ललकार

गायमुखाच पानी। वाजत डबडबा
तोंड धुवीती नरबदा

सरजाची ग नथ। शिरीमंताच्या हाती
गायमुखाला तोंड धुती। अष्टभुजा अंबाबाई

× × ×

पहाटेच्या प्रहरामधे । चौघडा झाला सुरू
तोंड धुती माझी धुरू । दयाळ अंबाबाई
पहाटेच्या प्रहरामधे । कर्णा वाजतो मंजुळ
चर्णतीर्थाची झाली वेळ । दयाळ अंबिकेची
सकाळी उठून । घालीते रांगुळ
दह्या-दुधाची आंघुळ । तुळजाबाईईला
दह्या ग दुधान । न्हानी तिची उसवली
कणकवर न्हाली । अष्टभुजा अंबाबाई
दुपारतीच्या वेळी । नगारे वाजती
भक्तराजाची गर्दी व्हती । दर्शेनासाठी
अंबाबाईच्या पूजेला । दोपार कलली
जाई-मोगऱ्याची कळी हाराला खुलली
जाईच्या फुलाचा । करीते उगानिगा
हार अंबेच्या गळ्याजोगा
वाटी वाटी तूप । अंबेच्या आरतीला
नेनंता बाळ माझा । तुझ्या वटीत घातला

X X X X

देवळात जाते । देवळी पडला गुता
वाटवरी वाडा व्हता । आई माझ्या मातंगीचा
देवळात जाते । येक पायरी पाशानाची
आवड मला दर्शेनाची । माय माझ्या अंबिकेच्या
देवळात जाते । अशी जाते मी सभागती
आडवी आली ग धुपारती

देवळात जाते । होमाच्या पडते पाया
पलीकड अनुसया । अंबिका माझी बाई
देवळात जाते । उभी होमाच्या सावलीला
इन्ती माझ्या मावलीला । माझ्या अंबिकाबाईईला
देवळात जाते । उभ्या ग दवडीन
चरन वंदिते आवडीन । माझ्या तुळजाबाईचे
देवळात जाते मी । आधी पसरिते वटी
तुळजा भवानी माझी बाई । माझे अन्याय घाली पोटी
देवळात जाते । उभी राहाते येका कोनी
हात जोडिते तिला दोन्ही
देवळात जाते । उभी राहाते येक्या कोनी
नेत्र उघडावे दोन्ही । अष्टभुजे तुळजाबाई
देवळात जाते । उभी राहाते येकीकड
सर्व नदर माझ्याकड । माय माझ्या अंबिकेची
अंबेच्या देवळात । जाते मी धावधुडी
टाक शेसनाखाली उडी । अंबिका माझी बाई
देवळात जाते । उभी राहाते दाटीत
आली खडाव लोटीत । माय माझी जगदंबा
देवळात जाते । उभी राहाते बाजूला
हात लाविती भुजला । माय माझी अंबाबाई
देवळात जाऊनी । उभी राहीले पाठीशी
मला धरिल पोटाशी । माय माझ्या अंबिकेन

देवळात जाते । बसते ववरीला
गुज बोलते गवरीला । माय माझ्या अंबिकेला
देवळात जाते । माझ्या वटीत गुळ अंबा
मला पावली जगदंबा

× × ×

अंबाबाईचा भुत्या । पायरीवरी उभा
याच्या अंगाऱ्याला बघा
अंबाबाईच सिंहासन । हाये म्हादेवाच्या नीट
भोप्याला व्हईल द्रिष्ट
शेरभर सोनं । हे ग अंबाबाई लेली
कवड्याच्या माळावरी । मग तिची विच्छा गेली
मोठे मोठे मोती । तबकी गोळा केले
भोप्याला राज्य दिले । दयाळ अंबिकेन

× × ×

देवीच्या देवळात । रमल माझ मन
हिला चांदीच सिंहासन । अष्टभुजेला माझ्या
चांदीच्या गुंडीला । सोन्याची घासनी
अंबा ताऱ्हेली सिंहासनी
उजेड पडला । पायीच्या खडावाचा
शिरी टोप जडावाचा । माय माझ्या अंबिकेचा
पायी शंभराचे तोडे । पैंजन वाजती झुनूझुनू
तुळजाबाई माझी । अंबा पटाला आली जनू

तुळजा माझी अंबा । नस शंभराची घटी
शिपळनगरी तिचश । मुदुबान केली पटी

आई माझ्या अंबिकेच । घाटशीळ हाये उच
शाल कंबर खई गच्च

तापत्याची चोळी । घामान वल्ली झाली
झाजला भाई दिली । दयाळ अंबिकेन

आई माझ्या अंबिकेची । दंडात चोळी काळी
माहेराला जातीवेळी । घाटशिळला ऊन्ह टाळी

अंबाबाईच्या देवळात । जागा हाये दाटनीची
सोगा लोळतो पैठनीचा। अष्टभुजेचा माझ्या

अष्टभुजा तुळजामाता । पिवळे तिचे दंड
जडावाचे बाजूबंद । भक्तांनी चढविले

तुळजापुर पेटमंदी । कोन हिंडती पातळाची
गळा माळ पुतळ्याची । माय तुळजाच्या माझ्या

अष्टभुजा लेन लेतो । गरमुळी सरमनी
अष्टभुजला पाहूनी । मन माझ समाधानी

उजेड पडला । नाकातल्या मोरनीचा
भांग टिळा कोरनीचा । तुळजा भवानीचा

देवळात गेल्ये । नदर माझी खाली
नवरत्नाचा टोप लेली । तुळजा भवानी आई

तुळजाबाई माझी । पुरुषाच लेन लेती
उजव्या बाजूला खविती । मोतियाचा तुरा

अंबा माझीला द्रिष्ट झाली । गगथडीच्या फिकराची
लेक मुदुबा शंकराची । तुळजाबाई माझी

तुळजामातला द्रिष्ट झाली । गंगथडीच्या भक्ताची
झाली ताकीद माळ्याला । इसबंदाच्या रोपाची

अंबा मनूनी अंबा । तोंड माझ पडल गोड
अंबा मनुक्याच झाड । तुळजाबाई माझी

कापराचा वास । माझ्या पदरा कुटूनी
आले तुळजला भेटूनी

× × ×

आवस पुनवला । घालते साकराच उंड
अंबा जोगव्याला हिंड । तुळजा भवानी माझी

साखरेचे लाडू । महिन्याच्या पौर्णिमेला
येई ग जोगव्याला । सावळे अंबाबाई

× × ×

## भोगी

माझ्या घरी ग कारन । काळोबा कारभारी
अन्नपूरना कुठीवरी । माय तुळजा माझी

वाजंत्री वाजतेत । कुनाला काय जात
अष्टभुजला माझ्या । मानाचं कुंकू येत

वाजंत्री वाजतेता । कल्लोळपारापशी
भोगी भंडारा येका दिशी

अंबाच्या देवळात । फुलाच अथरून
भोजी गेलेत उतरून

नेस नेस तुळजाबाई । पैठनी जराची
भोगी तालुकदाराची

नेस नेस अंबाबाई । चोळी पातळ जराची
भोगी सिदफळकराची

रुसली अंबाबाई । उठन आंघुळीला
साज मागती लिंबुळीला

आले घेऊन महापूजा । पुन्याचे गनपती
चंद्रहाराला लाख मोती

आले घेऊन महापूजा । पुन्याचे पुनेकर
हिरा चमके मुकटावर

आईच्या देवळात । बसले दोघ चवघ
सका भरीतो सवासिन्या । आई माझ्या अंबिकेच्या

अंबिकेच्या देवळात । उदाचा धुंदकार
बाईच्या पुंजाचा जयजयकार

उदे बोलन्यान । बाईचा डोंगर गरजला
बाईन मंदिरी नांगू दिला । अंबिकेबाईईन

काळी अंबाबाई । पिवळी का ग झाली
तुझ्या भक्तान भोगी केली

जाईजुईच्या फुलांनी । अंबाबाई ग लोपली
भोळ्या भक्तानं पूजा केली

देवीच्या देवळात । हळदी–कुकाची गर्दी झाली
हौशान भोगी केली । बाळा माझ्या नेनंत्यान

देवीच्या देवळात । रांगुळी गुलालाची
भोगी झाली दलालाची । बाळराजाची माझ्या

देवीच्या देवळात । कशाचा गलबला
भोगी करून वर आला । भाई ग राया माझा

अंबाबाईच्या देवळात । सांडला दहीभात
भोगी झाली आनंदात । अष्टभुजाची माझ्या
जरीचा शेला । खांद्यावरी टाकीला
भोगी करोनी भक्त आला । तुळजा मातेचा

× × ×

तुळजापुरा जाते । वटीला माझ्या केळ
छबिन्याची झाली येळ
वाजंत्री वाजतेता । कल्लोळपारावरी
हिचा छबीना मोरावरी
छबीन्याच्या येळा । अशी उडती चंद्रजोत
तुझा छबीना मिरवत
छबिन्याच्या येळा । अंबा खेळती होमामोहर
गोंडा लोळतो पाठीवर
छबीना मिरवतो । चांदनीचौका मंधी
धुंद दारूच्या कैपामंदी
तुळजापुरा जाते । वटीला माझ्या जांब
हिचा छबीना गेला लांब
तुळजापुर शहरामधी । कशाचा गलवला
राती छबीना मिरवला । अंबिकेबाईईचा
अंबारीचा हत्ती । उधळितो माती
आई माझ्या अंबिकेचा । छबीना आला राती

× × ×

आरादनीबाई । नको जाऊ तू जोमान
गाठी पडल्यात नेमान । अंबेच्या देवळात

आरादनीबाई । नको जाऊ तू गरवान
तुझ माझ येक धन । अंबिकाबाई माझी
आरादनीबाई । पाया पडन माझ यथ
गुरुबहिनीच नात । अंबिकाबाईईच्या
आरादनीबाई । तुझं आराद होसाच
कुकू आल नवसाच । माझ्या अंबिकेबाईईच

× × ×

तुळजापुर शहरामंदी । तुळजाचा काळा रंग
दैत्यासंग खेळ झुंज । तुळजाबाई माझी
पाचा वर्साची अंबा । होमात जलमली
दैत्याला काळ झाली
मारीला मंकासुर । धरीला तळव्याखाली
वरी खेळती चेंडूफळी
मारीला मंकासुर । टाकीला भितीवरी
पाय अंबेचा छातीवरी
मारीला दैत्यासुर । असुदाच गेल लोंड
बाजुबंदाच भिजल गोंड
दईत मारूनी । केलीया चक्काचूर
सावळी माझी अंबा । वर रचील तुळजापुर
मारीला मंकासुर । दैत्याची केली माती
वर रचिली मंकावती । माय मह्या अंबिकेन
मारीला देत्यासुर । मारून केली राख
वर रचिल गायमुख । माय मह्या अंबिकेन

पांच वर्साची अंबा । होमापुढं खेळ
हिचा लाकडी गोंडा लोळ
देवा म मंदी देव । अंबा माझी जलायाल
हाती पोताचा हिलायाल
साता पासोडयाचा । मंडप आहे खुजा
पोत खेळती अष्टभुजा
सोन्याची तोळबंदी । सभामंडपी पडली
दारू कैपाची चडली
जाईच्या फुलाचा । सभामंडपी झाला सडा
तुझा सुटला बुचडा । तुळजाबाईईचा
देवामंदी देव । अंबिका हाये खरी
पुरषाच्या केल्या नारी । नाचविल्या दरबारी

× × ×

नव दिवस नवरात्र । घट बसले घागरीचे
तेली आले नगरीचे
नगराचा तेली । चाप्याचा घाना गाळी
जोडसमया तेल जाळी । तुळजाच्या उच्छावात
नऊ दिवस नवरात्र । अंबा माझी नवचंडी
तेल जळत सव्वा खंडी । अंबाच्या नंदादीपा
नवा दिवसाच्या नव माळा । दहाव्या दिवशी शिलंगन
अंबा बसली नवरतन । तुळजा माझी बाई
नगरीचा तेली । अनितो भेंड–भाजी
शिलंगनाला झाली राजी । तुळजा माझी बाई

अंबेच्या पारावरी । कापराचा जपजपकार
आयार सव्वापार । तिच्या मुदुबा पित्याचा
नव दिवस नव रात्र । दहाव्या दिवशी शिलंगन
तुळजा माझी बाई । अंबा निघाली उशीरान
नव दिवस नवरात्र । दहावे दिवशी दसरा
इची पालखी हाती धरा । शिलंगन खेळायाला
दसऱ्या बाई । हाय जतरची हवा
पालखीला रंग नवा । दिला बंदुबाळानी
दसऱ्या बाई । हाये जतरची हवा
बगाडाला बईल नवा । माझ्या अंबिका बाईईला
दसऱ्या बाई । भोप्याला बलाविती
माझ्या अंबेला इनविती
वाजंत्री वाजतेता । पालकी आली दारा
मानकऱ्याला जाग करा । बाळेराजाला माझ्या
वाजंत्री वाजतेता । पालकी तटली
मानकऱ्यान रेटिली । बाळेराजान माझ्या
शिलंगन खेळून । अंबा शिनली भागली
सभामंडपी निजली । तुळजा माझी बाई
अस दुरून दिसत । तुळजापुर लाल लाल
शिलंगन झाल काल

× × ×

तुळजापुरची तुकाई । घाटशिळा उभी राही
बाळराजाची मन काय सये । वाट भक्ताची पाही
आठा दिसा मंगळवारी । बाजार भरला दाटनीचा
पदर खवीती पैठनीचा । अंबा ग माझी बाई

अष्टभुजा अंबिकेला । हिला मोत्याचा आहे तुरा
तुझ्या पायरी माझा हिरा
पाषानाची ग अंबाबाई । हिला सोन्याची प्रभावळ
दूर देशात सांभाळ । बाळराजाला माझ्या
सांगून धाडिते । पुन्यापासून बडोद्याला
काळी खुतन पडद्याला । माय माझ्या अंबिकेच्या
अंबिकाबाई माझ्या । नवसाला पावली
माझ्या शार्दूळ बाळानी । धज मोत्याची लावली
सोन्याची अंबाबाई । तिला मोतियाचा तुरा
भक्त वांधी फुलवरा । नेनंता बाळ माझा

× × ×

मंगळवार दिवशी । सारविते दारवटा
मला सखीचा पुरवठा
सकाळच्या पारी । हात जोडिते उल्लास ।
शिकरा सोन्याचा कळस । तुळजाबाईईच्या
हात मी जोडिते । तुझ्या देवळाच्या नीट ।
मोहरी कल्लोळ माग मठ
हात मी जोडिते । कल्लोळाच्या कोनी
देव नारद हे मुनी । सांगा माझा नमस्कार
हात मी जोडिते । नगारखान्याच्या पायरी ।
आली देवळाबाहेरी । शिलंगन खेळायला
हात जोडून इन्ती । तुझ्या देवळाच्या म्हाग
माझी चिंता तुला लाग । माय माझ्या तुळजाला

हात जोडून इन्ती । अंबाबाई मावलीला
आहे तुझ्या सावलीला । तुळजा माये माझे
तुझ्या चरनावरी माथा । ठेविते आदर
पाय अंबेचे सकुमार । तुळजाबाईईचे
तुझ्या चरनावरी माथा । ठेविते भीत भीत
माझ्या मस्तकी तुझा हात । माय तुळजा माझे

× × ×

तुळजापुर पेठला । जागा बसते झाडूनी
द्या ग बायानो धाडूनी । माय माझ्या अंबिकेला
हातात पानफूल । जाऊ मी कोन्या देवा
दयाळ अंबाबाई । करीते तुझी सेवा
अंबेच्या देवळात । बसते टेकूनी
तिचा रहिवास देखूनी
भोळा ग माझा भाव । कर जोडूनी उभी राहते
जगदंबा अष्टभुजे । तुला मी विनविते
भोळा ग माझा भाव । भक्ति माझी थोडी थोडी
संकटाला घाल उडी । माय माता जगदंबा
रामनामाचा जप । करिते मी मनात
प्रसन्न व्हावी तू जनात । अष्टभुजा तुळजामाते
जगदंबेचा जप । करिते मनोभावे
अष्टभुजा त्वा प्रसन्न व्हावे । भोळया भक्ताला
धावा मी करिते । धाव पाव तू जननी
महिषासुरमरदिनी । अष्टभुजा तुळजामाते

देवा ग मंदी देव। माझी तुळजा शानी
वानी बामन लागले ध्यानी
पंढरपुरचा देव। असा आहे भोळा राजा
प्रिथ्वीला धाक तुझा। अंबिका माय माझे
अंबाबाईची निंदा। कुनी केली जतरात
फुल पडले नेतरात
अंबाबाईची निंदा। कुनी केली ढेळजात
बान मारिला काळजात
भयान वनामधी। मोडना कूपकाटा
माझ्या हरनीचा धाक मोठा
भयान वनामधी। पडली माझी गोनी
माझ्या हरनीला सांगा कोनी
माझ्या संकटाला। धावत कोन आली
परवत उतरली। दयाळ अंबाबाई
नवस बोलले। मी ग मनातल्या मनात।
दयाळ अंबाबाई। मला पावली जनात
वेडा माझा जीव। कशान व्हईना थीर
दयाळ अंबाबाई। मला सपनी देती धीर
दळन दळाव। कस गान्याच्या छंदान।
दयाळ अंबिकेला। बया गाते आनंदान

## जनाबाईचें जीवन

ज्ञानदेव–नामदेवादि संतांच्या समुदायांत जनाबाईला फार मानाचें स्थान होतें. ती गंगाखेडची राहणारी असून नडसीच्या नामदेवाची दासी होती. नामदेवांच्या संगतींत तिचें समग्र जीवन पंढरीरायाच्या सेवेंत व्यतीत झालें होतें. तिनें अभंग आणि कांहीं आख्यानें रचिलीं असून तिची वाणी फार मधुर आहे. प्रत्यक्ष पांडूरंग तिचे अभंग लिहून घेत. अशा जनाबाईचें जीवन स्त्रीगीतांतून स्त्रियांनीं कसें रंगविलें तें येथें दर्शवितों.

### संसार

चला जाऊ पाहू । जनीचा सव्सार
पांडुरंगाचा अवतार । नामदेव भक्त
पहिली माझी ववीं । नामदेव जनाबाई
लागती तुझ्या पायी । देवा इठुला
गोपाळ पुऱ्यावरी । जनाबाईचा हाय वाडा
जनीच्या सव्सारा । देव इठुल झाला येडा
गोपाळपुऱ्यावरी । जनाबाईची झोपडी
हाती धोतराचा पिळा । देव निघती तातडी
संत जनाबाई । नामदेवाची दासी
करिती कामधंदा । अखंड हरि तिच्यापशी

नामापुरी नामाबाई । पंढरपुरी जनाबाई
प्यार भक्तीले नाही

जनाबाईचा सव्सार । हातामंदी टाळ इना
पाठीमाग उभा कान्हा । पंढरीराया माझा

पंढरपुरामधी । जनाबाई कुनबीन
इठ्ठलाच्या संगतीन । आरध तिला भाग्यपन

हौस मला मोठी । गोपाळपुऱ्याला जायाची
जनीच्या रावळात । दुरडी फिरवा लाह्याची

जिवाला वाटती । पंढरी पाहावी
गोपाळपुऱ्यावरी । रवी पान्याची लावावी

पर्दक्षना घालून । गोपाळपुऱ्याला जाते
दाळ चुरमुरे ठेवून । जनीच दर्शन घेते

देशील देवा मले । साधूचा सेजार
हरिनामाचा गजेर । पडते कानावर

पंढरीला जाया । सोबत नाही कोनी
पुढे इठ्ठल माघ जनी

जनाबाईचं घर गोपाळपुऱ्यांत होतं. ती देवाचं नामस्मरण करून, त्याची भक्ति करून रहात होती. तिच्या भक्तीला अंत नव्हता. तिचा संसार तो काय ? नामदेवाचं घर हेंच तिचं घर होतं, पंढरी हें माहेर होतं, आणि विश्वांतील लेंकरं हींच तिचीं लेंकरं होतीं.

# चोळी

पंढरपुरामधी । कशाचा गलबला
जनाबाईच्या चोळीसाटी । नामदेव चाटी झाला
पंढरपुरामधी । नामदेव शिंपी झाला
जनाबाई बहेनीला । चोळयाह्यचा पुरवा केला
पंढर हे ग पूर । माझ माहेर साजनी
पांडुरंग शिवी चोळी । नामदेवाची ग जनी
इठ्ठल घेतो चोळी । रुक्मीन गेली पाह्या
सोन्याचे बाजूबंद । दोन्ही जरतारी बाह्या
इठ्ठल शिवतो चोळी । रुक्मीन जाती पाहया
पाठ पंखे जडिताचे । दोन्ही सोनियाच्या बाह्या
पंढरीरायाची । जनाबाई बहीन
देली आळंदी लेहून । दिवाळीच्या चोळीसाठी

जनीला चोळी दोरी करण्याचें काम पांडुरंगाचें असे; चोळया शिवण्यासाठीं तेथें नामदेव चाटी होताच. दिवाळीच्या चोळीसाठीं तर पांडुरंगानें तिला आळंदी गांवच लिहून दिला होता. दुबळा पावळा भाऊ बहिणीला असावा म्हणतात. मग येथें तर श्रीपतीच तिचे भाऊ होते. देवानें चोळी घ्यावी, चोळीसाठीं ज्ञानदेवांची आळंदी लिहून द्यावी आणि देवाच्या लाडक्या भक्तानें, संतश्रेष्ठ नामदेवानें ती चोळी आपल्या हातानें शिवावी ! केवढें हें जनीचें भाग्य ! ती चोळीहि तशीच नवलपरीचीअसणार !

रुक्मिणीलासुद्धां ती पहावी वाटली. सीतेच्या कांचनमृगाच्या कंचुकीपेक्षांहि ही चोळी अभिनव आणि अलौकिक म्हणावी ! सीतेनें कंचुकी मागतांच तिच्यावर संकट-परंपरा कोसळली. जनाबाईनें न मागतांहि विठ्ठलानें तिला तसली चोळी शिवली. देवाचं तिच्यावर प्रेमच तसं होतं. दासी जनी देवाची लाडकी, फुलाची फडकी.

## जनीची वेणी-फणी

पंढरपुरात । जनीला नाही कोनी
तुळसीच्या इंद्रावनी । नामदेव घाली यनी

देव इट्ठल मनीतेत । मह्या जनीला नाही कोनी
सावळे रुकमिनी । सोड बुचडा घाल यनी

इट्ठल मनीती । माझ्या जनाला नाही कोनी
हाती घेऊन तेल फनी । इचरून घाल यनी

इट्ठल मनीतेत । जना का ग तू यथ उभी
चाल तुळशीच्या बनी । तुझी उकलितो यनी

पंढरपुरात । जनीला नाही कोनी
पांडुरंग घाली यनी । हाती लवंगाची फनी

पंढरपुरात । जनीला नाही कोनी
हाती घुंगराची फनी । देव इट्ठल घाली यनी

पंढरपुरात । जनीला नाही कोनी
पांडुरंग घाली यनी । हाती त्याच्या नाडा फनी

जनी दासी होती. नामदेवाच्या घरीं तिचा प्रतिपाळ झाला होता. विठ्ठलरखुमाईवांचून तिला कोणी सखा सोयरा नव्हता. दासीची वेणी फणी कोण करणार? ती आपली कामांत दंग; तिच्या ध्यानीं पांडुरंग. देवाला हें ठाऊक होतं. म्हणून कधीं नामदेव तिची वेणी घाली, तर कधीं रुक्मिणी घाली. कधीं तर ते स्वत:च तिची वेणी घालीत.

## जनीचें नहाणें

इट्ठल देव मनी। जना माझी परदेसी
चंद्रभागच्या काठी। हाती धोंडा पाठ घासी
चंद्रभागच्या काठी। जना बसली नाह्या
पुंडलीक राया। फेंके धारतून लाह्या
देव इट्ठल मनीती। माझ्या जनाला नाही कोनी
सावळे रुखमिनी। यनी उकलून घाल पानी
इट्ठल मनीती। माझ्या जनाला नाही कोनी
अग आनून देतो पानी। जनीला नाहायाला
इट्ठल मनीती। जना माझी वनवासी
हाती सोन्याची वजरी। माग बसून पाठ घासी
इट्ठल मनीतो। सोड जना तुही यनी
जनीला नाही कोनी। घाल रुक्मिनी तू पानी
तुळशीच्या बनी। जना उकलिती यनी
हाती घेऊनीया लोनी। डोई चोळी चक्रपानी
इट्ठल मनीती। माझ्या जनाला नाही कोनी
हांडे इसानिले दोन्ही। जनीच्या आंघोळीला

अनुक्रम .. २४१२५ ... विः ...........
क्रमांक ........... नों: दि: २४।११।५८

मराठीची माया

जना वसली नाह्याला । फनी हत्तीच्या दाताची
देवा केली उगवनी । जनाबाईच्या केसाची
जनी बसली नाह्याला । पांडुरंग घाली पानी
हिरेकंकराची फनी । जनाबाईच्या केसाला
जनी बसली नाह्याला । पानी जळतु पोळतु
जनीला नाही कोनी । देवा अन्तरी कळतु
जनी बसली नाह्याला । पानी जळत पोळत
देवा अन्तरी कळत । भरली घागर भिवरेत
जनी वसली नाह्याला । पानी नाही इसानाला
देव गेलेत कावडीला
पंढरपुरामधे । जनी बसली नाह्याला
पानी नाही इसानाला । हाती घागर भिवरेला
सेला देला चुंबळीला
पंढरपुरामधे । जनी बसली नहात
जनीला नाहीं कोनी । वरून पानी इसानाच गळत
पंढरपुरात । जनी बसली नाह्याला
पानी नाही इसानाला । झरे फुटले माळाला
पंढरीची वाट । कह्यान वल्ली झाली
इट्ठलाची जनी न्हाली । केस वाळवीत गेली

जनीचं नहाणं म्हणजे देवाचा दिवाळी सण. पंढरीरायाला त्या वेळेस कोण आनंद व्हायचा ! त्याच्या जिवाची किती धांवपळ व्हायची ! जनाबाई नित्य चंद्रभागेंत स्नान करी, धोंडा घेऊन पाय घासी, पाठ घासी. तिला न्हाऊं घालायला कोण

होतं ? पुंडलिक भाऊ धारेमधून तिला तुषारस्नान घाली. तुषार तर असे दिसत कीं जणू पुंडलिक तिच्यावर मोठ्या कौतुकानं लाह्याच उधळीत आहे. पांडुरंगाला वाटे आपणच जनीला न्हाऊं घालावं. ते रुक्मिणीला म्हणत, तूं वेणी उकल मी पाणी उपसतों. कधीं ते वेणी उकलीत, रुक्मिणी पाणी घाली; कधीं देव जनीच्या डोक्याला लोणी लावून तें चोळीत, केंसांचा गुंता उकलीत आणि रुक्मिणी सोन्याच्या वज्रीनें तिची पाठ घाशी. एकदां जनीच्या विसाणाला पाणी नव्हतें. देवांनी घागर घेतली नि भिवरेची वाट धरली. रुक्मीणमाता जवळच होती. तिनें देवाचा शेला उचलला अन् चुंभळ करायला दिला. एकदां जनी नहात होती, पाणी कढत होतं अन् जवळ कोणी नव्हतं, तेव्हां प्रीतीच्या पांडुरंगानं उचलली कावड अन् टाकली खांद्यावर. पुढें एकनाथाच्या घरीं पाणी भरायचं आहे याचा जणूं ते सरावच करीत होते. एकदां तर कावड आणायलाहि सवड नव्हती. तेव्हां देवानं केली माया आणि माळ लागले पाझराया. जनीच्या नहाणींतील पाषाणांतून झुळझुळ झरे वाहूं लागले. काय हें जनीचें भाग्य! विठ्ठलरुखमाई तिला न्हाऊं घालीत. सोन्याची वज्री, हस्तिदंताची फणी आणि वर जडले हिरा-हिरकणी. अशी न्हाऊन धुऊन केंस वाळवीत जनाबाई विठ्ठल-रुखमाईच्या दर्शनास जाई. अशा तिच्या नहाण्याची एक कहाणीच आहे.

## जनाबाईचं जेवण

रुख्मीन जेवू वाढी । पोळी ठेविती काढून
दे ग जनाला वाढून । सावळे रुखमिनी

देव बसले जेवाया । पोळी ठेवीली काढूनी
बोलली रुखमीन । देते जनाला वाढूनीं

रुक्मीन जेवू वाढी । पोळी ठेवीली काढून
सावळ्या पांडुरंगा । द्याव जनाला धाडून

इट्ठल बसले भोजना । पात्र ठेवीले मांडूनी
जाये जाये नामदेवा । आन जनाला धुंडूनी

देव बसले जेवाया । पोळी ठेवीली ताटाआड
रुख्मीन मनीती । देव जनाच किती येड

देव बसले भोजना । पोळी ठुती माग माग
बोलली रुखमीन । जनापाशी जीव लाग

देवाला जनीवांचून जेवण गोड लागत नसे. आपल्या पात्रांतील तूप पोळी पाहून देवाला जनाची सय होई. ते तीं वेगळी काढून ठेवीत. रुक्मीण-मातेला कां तें कळत नव्हतं ? ती म्हणे देवा, तुम्ही सावकाश जेवा. मी जनीलाहि वाढतें. जनीचं पात्र मांडीत, तिला बोलावूं धाडीत. हा मान कोणाचा ? नडसीच्या नामदेवाचा. विठ्ठलाच्या पंक्तीला जेवली जनी, वाढीत होती आदिमाता रुक्मिणी.

## द्वादशीचें भोजन

पंधरवाडी यकादशी । आयद्याला काय ठाव
इठ्ठलाच्या वाड्या जाव । जनाबाईला पुसाव

आखाडी यकादस । इठुला तुला मला
जनाबाई गेली । वाघ्राटे आनायला
साळीच्या भाताची । आवड देवाला
बारस सोडायला । जातो जनीच्या गावाला
इठुल पाव्हने । जनाबाईला तातडी
साळीचे तांदूळ । उभ्या लवन्यान पाखडी
इठुल पाव्हना । जनाबाईला तातडी
साळीचे तांदूळ । उभ्या उभ्यान पाखडी
चिन्या साळीच्या तांदळाचा । वास येतो दूरवरी
जनाबाईच्या परवरी । देव इठुल न्याहरी करी
पंढरपुरामधी । गल्ली गल्लीला हवाया
रुक्मीन चालली जेवाया । गोपाळपुऱ्यावरी
सखा पांडुरंग मने । टाक रुक्मिनी चौरंग पाट
केल लाडवाच ताट । जनाच्या मंदिरांत
रुक्मीन जेवू वाढो । निरशा दुधामधी केळ
देवाला आवडत । जनाच ताक शिळ
देवाच्या फराळाला । रुक्मीन देती दूधफेन्या
देवाला आवडती । जनीच्या ताककन्या
रुखमीन वाढईती । निरस्या दुधामंदी काला
इठुला आवडतो । जनीचा भाजीपाला
रुखमीन वाढईती । निरस्या दुधामंदी पेडा
इठुला आवडतो । जनीचा शिळा वडा

देवाची द्वादशी जनीच्या घरीं, विठ्ठलरुखमाई जाती गोपाळ-

पुऱ्यावरी. जनीच्या हातचें जेवण म्हणजे त्यांना परमामृत वाटे. रुक्मिणींच्या दूधकेळापेक्षां जनीचं शिळं ताकच त्यांना आवडे. जनीच्या ताक-कण्यापुढें त्यांनां रुक्मिणीच्या दूधफेण्यादेखील उण्या वाटत. जनीचं कसंहि कोरडं ओलं, देव म्हणती रुक्मिणी लाडवाचं ताट आलं............

## जनीचा कामधंदा

नामयाच्या घरी । जनी झाडलोट करी
देव केराच्या पाट्या भरी
जनी करी झाडलोट । पांडुरंग केर भरी
पाटी घेऊनि शिरावरी । केर टाकी दूरवरी
साधूला साधू पुस । इठ्ठलाचा कोनता वाडा
मानिक चौकामधी । जनाबाई टाकी सडा
चला सयानो पाह्या जाऊ । वाडा इठ्ठल बामनाचा
जनाबाई माझी । सडा टाकी चंदनाचा
इथून दिसती । पंढरीची लाल माती
जनाबाई सारविती । रावळाच्या भिंती
पंढरीच्या वाटवरी । गेरूची लाल माती
दासी जना पोतारिती । सभामंडपाच्या भिंती
नामदेवाच्या घरी । जनाबाई पानी भरी
मुखी नाम हे उच्चारी । सावळ्या इठ्ठलाच
पंढरपुरात । जनाला काम भारी
बाई सावळा पांडुरंग । देतो आडव्या घागरी

इठुलाचा शेला । कशान वल्ला झाला
देव भावाचा भुकेला । जनीसंग पान्या गेला

चंद्रभागच्या पान्यान । जना व्हईना घाबरी
पांडुरंगान देल्या । चहू हस्तकी घागरी

रुक्मिनी मनीती । देवा माझी काय चोरी
जनासंग पानी भरी । चंद्रभागच्या तीरी

जनाबाई धुन धुई । इठुल गोळा करी
रुक्मीन बोलती । आली पावसाची सरी

इठू मन इठू । अवघी पंढरी धुंडीली
जनीच्या मंदीरी । भोइ-फुगडी मांडीली

जनाबाई करी कामधंदा, मनीं आठवुनिया गोविंदा. सडा सारवण शेणपाणी आणि तिच्या मनीं चक्रपाणि. विठ्ठल तिला काम करूं लागे, जनीचा सारा शीण भागे.

## विठ्ठलाला जनीचं वेड

उत्तर रात्रीला । रुखमीनी पानी माग
जनीसंग दळू लाग । देव पांडुरंग

जनाबाई धुन धुई । इठुल दरडी उभा
त्याहीच्या पिर्तीला । दंग झाली चंद्रभागा

इठुल मनीती । नाही जना करमत
मी जातो अंघूळीला । कर धून्याच निमित्त

इठुल सखा मनी । जना माझी का सुकली
पदम तळ्यावरी । धुन धूतसे एकली

रावळापासून । गोपाळपुऱ्याला सुरंग
येरझारा घाली । जनीसटी पांडुरंग

इट्ठल मनीतो । नाही जना करमत
कर धुन्याच निमित्त । तुला दाखवितो गोत

इट्ठल देव मनी । जना माझी बाकटी
धुन धुती येकटी

पांडुरंग मनी । चल जना धुया जाऊ
शिळा पाषानाच्या पाहू । धुन पाटावाच धुऊ

इट्ठल मनीती । चल जना माडीवरी
रुक्मिन नाही घरी । दोघ बोलूत घडीभरी

इट्ठल मनीतो । नको येऊ जना माघ
रुक्मिनीला येतो राग । तुझा बाळपनाचा लोभ

इट्ठल देव मनी । जना माझी सासरवाशी
उभी सेनाच्या ढिगाऱ्याशी । जरीपदरा कोन पुशी

देव इट्ठल मनी । जना माझी सासरवाशी
पाहटच्या दळनासी । निजली जात्यापसी

दळनाची पाटी । ठेविली जात्यापुढ
ऊठ जना उजडल

इट्ठल मनीतो । ऊठे जना उजडल
गाईच्या कोठ्यावरी । दीपक सूर्याच पडल

इट्ठल मनीतो । जना माझी कुनबीन
तिला सापडल धन

रुक्मिनीच्या चोळीवरी । हैत अभंगाच्या धारा
वरी काढीला गोपाळपुरा । सावळ्या इट्ठलान

इट्ठल मनूनी । हाक मारिती रावळी
देव जनीच्या जवळी

जनी, जना, कांहींहि म्हणा पण देवाला जनीवांचून करमेना. एका क्षणाचाहि जनीचा वियोग त्यांना सहन होत नसे. जना काम करो कांहीं, देव तिच्या हातीं पायीं. जना नामदेवाची कुणबीण, तिला सांपडलं पंढरीचं धन. विट्ठलाच्या ध्यानीं मनीं, नामयाची दासी जनी.

## विठ्ठल–रखमाईचें भांडण

रुक्मिना मनी । कांवळ का हो खांद्यावरी
अग इसरून आलो । शाल जनीच्या मी घरी
रुक्मिनी मनी । देवा तुम्हा लाज थोडी
जनीच्या मंदिरात । वाकळाची काय गोडी
रुक्मिनी मनीती । देवा तुमचा येतो राग
जनीच्या काजळाचा । दुशालीला काळा डाग
रखमाबाई मने । मी करीते पुजापाती
जना कशाला येती राती । येवढ्या मंदिरात
रुक्मिनी मनीती । देवा तुम्हा लाज थोडी
जनाबाईच्या वाड्याला । तुम्ही जाता घडोघडी
बाई रुक्मीन मनी । देवा तुम्हा नाही लाज
जनीसंग बोला गुज

× × ×

इठ्ठलाच्या पाया । रुक्मिनी लावीती दही
खर सांगा हो इट्ठला । जना तुमची कोन व्हावी

इठ्ठलाच्या पाया । रुक्मिन लावीती लोनी
खर बोला देवा तुम्ही । जना माझ्या बहिनीवानी
रुक्मीन मनी । देवा गळियाची आन
जना तुमची व्हावी कोन । माझी धर्माची बहीन
रुक्मिनी मनीती । देवा तुमची जना कोन
जना माझी मायबहीन । तुझ्या गळियाची आन
रुक्मिनी मनीती । देवा तुम्हा बहिनी किती
गंगा, गिरजा, भागिरथी । जनी धर्माची चवथी
इठ्ठलाचे पाय । रुखमीन दाबी राग
खर सांगा इठ्ठला । जना तुमची कोन लाग
इठ्ठलाचे पाय । रुखमीन घेई तळहात
खर बोला स्वामी । जनीच काय नात
रुक्मिनी मनीति । देवा जनी कोन व्हती
वनवासी जनी । आपल्या आसऱ्याला व्हाती
इट्ठल मनीती । रुक्मिनी नको झुरू
आल व्हत देशावरू । जना सुखाच पाखरू
इट्ठल देव मने । नको रुक्मिनी भरम धरू
जना परदेशी पाखरू
इट्ठल मनीती । नको रुक्मिनी राग करू
जना धर्माच लेकरू । आल थाऱ्याला पाखरू
इट्ठल देव मनी । जनी धर्माच पाखरू
भावरथाच लेकरू । चुकल वाळवंटी

इट्ठल मनीती । का ग रुक्मिनी कपटी
जना बहीन धाकटी । आपल्या दोघामधी

इट्ठल मनीताती । जना आपल लेकरू
नको मनी कल्प धरू । वेडे ग रुखमिनी

इट्ठल मनीती । नको रुक्मिनी राग धरू
जना आपल लेकरू । गाईमाघल्ल वासरू

इट्ठल मनीती । नको करू राग राग
जनी आली माझ्या माग । बिनआई ना बापाची

देव इट्ठल मनी । नाही रुक्मिनीला ग्यान
आपल्या दारावून । जनी गेली अबोल्यान

इट्ठल मनीतो । का ग रुक्मिनी बोलना
गोपाळपुऱ्या जाया । रथ जागचा हालना

रुक्मिनी रागात । देव बोलले हासून
गोपाळपुऱ्या जाया । चाल रथात बसून

विट्ठल ग विटावरी । रुक्मिनी घोड्यावरी
दोहीची स्वारी गेली । गोपाळपुऱ्यावरी

भरली चंद्रभागा । पानी चालल वाहून
जनाच्या भेटीसटी । देव जाती रुक्मिनी घेऊन

नामदेवाची जनी देवाच्या गळ्यांतला मणि. यामुळें विठल-रुखमाईत प्रेमकलहहि होई. देव झाले तरी अवतार घेतल्यावर त्यांना लौकिकाप्रमाणं वागणं आलंच. सावळ्या रुक्मिणीला संशय येई नि मग लटकाच खटका उडे. परब्रह्म आणि आदिमाया यांचं हें भांडण ! यांत कोणाचा पक्ष घ्या नि

कशी समजूत घाला? 'विठ्ठलरखुमाईच्या भांडणीं। कवण करी बुझावणी। बाप विठ्ठलचरणीं। ज्ञानदेवो" ज्ञानदेव विठ्ठलचरणीं विनटले, आपणहि देवाच्या चरणीं चित्त ठेवूं नि त्यांच्या संवादाचा आस्वाद घेऊं. देव जनीसांगातीं हितगुज करतात म्हणून कधीं रुक्मिणीनें त्यांची लाज काढावी तर कधीं पायाला लोणी चोळीत असतां मनांत शिरावं आणि गळ्याची आण घालून जनीचं नातं पुसावं. देव म्हणत, अग, संसाराचा पिंजरा सोडून आत्मसुखाचा चारा चरून, अनंततेच्या आकाशांत निजानंदाच्या गिरक्या घेणारं तें पांखरूं आहे. तें आपणांकडे येणार नाहीं तर कुठं जाणार? पण संशयाची नागीण एकदां कां चावली म्हणजे तिचं विष लौकर उतरत नाहीं. फिरफिरून लहरी येतात. देव रुक्मिणीची समजूत घालण्याचा परोपरीनें प्रयत्न करीत. पण छे! कधीं त्यांना वाटे रुक्मिणीच्या या अशा बोलण्यानं जनी रुसून अबोल्यानं गेली. तेव्हां तर पांडुरंग बेंवीच्या देंठापासून, अगदीं कळवळून म्हणत, रुक्मिणीला ज्ञानच नाहीं. अग रुक्मिणी, आतां हें कपट, हें अज्ञान, ही माया सोड. जनी भावार्थाचं पांखरूं आहे; बिन-आईबापाचं लेकरूं आहे, गाईमागलं वासरूं आहे. नवराबायकोचं तें भांडण, वळवाच्या पावसासारखं तें यायचं अन् मग लागलीच आभाळ निर्वाळायचं तेव्हां कशाचा राग आणि कशाचं काय? भरली चंद्रभागा वाहून जाई. रुसली रुक्मिणी प्रसन्न होई. मग विठ्ठल-रुक्मिणी रथांत बसून जनाबाईच्या भेटीसाठीं गोपाळपुऱ्यास जात.

## जनीबरोबर देव गवत आणतात

इट्ठल मनीती। चल जना गवताला
अशा पवना मातला। चंद्रभागाच्या वताला
हातात खुरप दाव। हरि सावळा बोलला
चल जने गवताला। चंद्रभागच्या वताला
सोन्याची मोहोरकी। नामदेवाच्या गाईला
घुंगराचा साज। जनाबाईच्या रईला
सोन्याच घुंगरू। नामदेवाच्या गाईला
तीनशे साठ मोती। जनाबाईच्या रईला

पांडुरंगाला उल्हास येतो आणि 'जनीवरं गवता जातो.' जनीला नामदेवाच्या गाईसाठीं गवताचा भारा आणावा लागे. खुरपें दावें घेऊन देव तिला गवताची आठवण करून देत. आधींच चंद्रभागा अन् जनीनं आणलं पांडुरंगा. त्या पवन्याचं पावनत्व कुणी वर्णावं? देव–भक्तांनीं मिळून भारा आणावा. तें गवत खाऊन गाय किती दूध देत असेल याची कल्पनाच करावी. हें दूध–दुभत्याचं काम जनाबाईकडेच असे. नामदेवाची गाय ती, ती साधी कसली? ती कामधेनूच होती. भावाचा खुंटा अन् प्रेमाचं दावं, तिला नित्य नामदेवानं धुवावं. कामधेनूचं दूध दही अन् घुसळण घुसळिती जनाबाई. सोन्याची म्होरकी नामदेवाच्या गाईला अन् तीनशें साठ मोतीं जनाबाईच्या रवीला. "लक्ष्मी जया घरची दासी" तो जनीचा हृदयनिवासी. त्याच्या भक्ताच्या घरच्या मंथनाचं हें वर्णन आहे. धनहीन जनीच्या भावश्रीमंतीचं हें वर्णन आहे.

# जनीचं दळण

पहांटेच्या दळणाला । तांबड फुटल
देव हाका मारिती । ऊठ जना उजडल
हरि दयाळ मनीतो । जनें दळायाला ऊठ
भक्त पाहतील वाट । काकडआरतीला
पहाटेच दळन । निसून ठेविल
इट्ठल मनीती । ऊठ जनें उजडल
इट्ठल मनीतो । जना माझी सासरवाशी
उस दिल जात्यापाशी
पाटच्या पाऱ्यामंदी । खुटा उपटला जात्याचा
खांद्यावर वाकस । हरि आला दारकेचा
पाहटच्या पाहऱ्यामंदीं । देव बसती जात्यावर
दळू लागती जनीबर
जनी दळण दळी । पांडुरंग जात झाडी
येका पाया घाली अढी । दुज्या पायी घाली मुडी
विठ्ठल, विठ्ठल । मोठा भवरतगडी
जनीला दळू लाग । जातःफेराखाली वढी
दळन दळिती । जनाबाई येकलीन
सोबतीसी व्हता कोन । इट्ठल माझा देव
जनाबाईच जात । गोपाळपुरी वाज
जनाबाईला दळू लाग । पंढरीचा शामराज
येकलीच जात । दोघावनी कस वाजत
पिर्तीचा पांडुरंग । जनीला दळू लागत

× × ×

पहाटच्या दळनाला । रुक्मिनी देती कान
प्रीतीचा पांडुरंग । जनासंग गातो गान

जनाबाई दळन दळी । घालून पायामधे अढी
चक्रपानी जात झाडी । गान गाऊन दळन दळी

गोपाळपुऱ्यांत । जनाबाईच जात
देव त्यथ वव्या गात । दळन दळू लागत

पाहटच्या पाहऱ्यामंदी । इठ्ठल कोठ गेला
जनीला दळू लाग । दोघाह्यचा येतो गळा

दळीता कांडिता । माळ वैजंती काढिली
संभाळन्याकरिता । दासी जनीपाशी देली

दळीता कांडिता । हालती मव्हनमाळ
दळू लागतो जनीला । यशवदेचा बाळ

पहाटच्या पाऱ्यामंदी । जनी बसली दळायला
पीतांबर काढून । देवा इट्ठलानं देला

दळीता कांडिता । देवाहाती आले फोड
जनाबाई बोल । केली वैकुंठाची जोड

देव दळित्याती । जनाबाई बोल
तुझ्या प्रेमाला नाही मोल

जना गाती ववी । सखा माझा योगीश्वर
निवर्ती महाराज । तुमच्या पाठीचे ज्ञानेश्वर

जना गाती ववी । देवा ठेवीली शालजोडी
पांडुरंगाची माझ्या । याची चमकती सलकडी

जना गाती ववी । देवा याव घरात
माझ्या अन्तरीचा भाव । तुम्हा वाढीते दूधभात
जना गाती ववी । देवा याव माझ्या घरी
दुधातुपाची मी तुम्हा । वाढीते न्याहारी
जना गाती ववी । घरी याव देवा
अन्तरापसून । करीन तुमची सेवा
जनाबाई मने । मोठा देवा तू लबाड
पर्पंचाच घरी । पाठी लावील लिगाड.
माझ्या दळनाचा । देवा ग्रिठुला आला सीन
नको वाईट मानू । तुझ्या पाठीची बहीन
वैजंती हालती । कानी कुंडल डोलती
जनी सभे बोले । दळू लागती वैकुंठपती
दळीता कांडिता । माळ हालती वैजंती
देवा पांडुरंगा । जनाबाई गीत गाती
दळीता कांडीता । मुखी मना राम हरी
देव आलेत जनाघरी

दळनानं अंगाची झाली गंगा, तरी शोण नाहीं पांडुरंगा. ते जनीला नित्य दळूं लागेत. सारा दिवस शिणली जाई, रात्रीं गाढ झोंप येई. तेव्हां देव तिचं दळण निसून ठेवीत, जातं झाडून पुसून ठेवीत आणि तिला उठवीत. जनीला श्रमं होऊं नयेत म्हणून देव फेराखालीं जातं ओढीत आणि तिच्याबरोबर ओव्या गात. दळून देवाच्या हाताला आले फोड अन् जनाबाईनं केली वैकुंठीची जोड. दळतांना जना देवाला ओव्या गाई अन् देवाच्या

हृदयाचा ठाव घेई. दळून दळून दमली सई, जिवाभावाची गाते ओवी. ओवी ऐकून आले हरि दळू लागले जनीच्या बरोबरी.

## सारवण

कोणतंहि असो काम, जना घेई विठ्ठलनाम. ती झाडतां सारवतां गाणं गाई आणि आंतून बाहेरून पांडुरंगच आकळून घेई.

सारवन सार बाई । रामनामे सार
राम नामे सार बाई । घडो हा संसार ।। ध्रु. ।।
देहे जल्म झाले बाई । सप्न सोशीते । बाई सप्न सोशीते
थोर भाग्य जागृत आता करीते ।।१।।
रामनस्मान बाई मंदीर झाडू । बाई मंदीर झाडू
प्रायक्काली विश्रांतीचा केर हा काढू ।।२।।
रामनामाचा बाई टाकू जे सडा । बाई टाकू जे सडा
सारवन सारविता मुंगी ना किडा ।।३।।
जनी मने बायानो सांगते ऐका । गूज सांगते ऐका
काम करितांना हरि इसरू नका ।।४।।

## जनाबाई धुणं धुते

भरली चंद्रभागा । धोंडे बुडाले ल्हान थोर
देवाचा पीतांबर । जना धुती पायावर
चंद्रभागेच्या काठी । वाळूच केल आळ
जनी धुतसे सवळ । देवा या अिठ्ठलाच
जना धुन धुती । देवा इठ्ठलाची कळी
आबीर बुक्यात । चंद्रभागा झाली काळी

हृदयाचा ठाव घेई. दळून दळून दमली सई, जिवाभावाची गाते ओवी. ओंवी ऐकून आले हरि दळू लागले जनीच्या बरोबरी.

## सारवण

कोणतंहि असो काम, जना घेई विठ्ठलनाम. ती झाडतां सारवतां गाणं गाई आणि आंतून बाहेरून पांडुरंगच आकळून घेई.

सारवन सार बाई । रामनामे सार
राम नामे सार बाई । घडो हा संसार ।। ध्रु. ।।
देहे जल्म झाले बाई । सप्न सोशीते । बाई सप्न सोशीते
थोर भाग्य जागृत आता करीते ।।१।।
रामनस्मान बाई मंदीर झाडू । वाई मंदीर झाडू
प्राथक्काली विश्रांतीचा केर हा काढू ।।२।।
रामनामाचा बाई टाकू जे सडा । बाई टाकू जे सडा
सारवन सारविता मुंगी ना किडा ।।३।।
जनी मने बायानो सांगते ऐका । गूज सांगते ऐका
काम करितांना हरि इसरू नका ।।४।।

## जनाबाई धुणं धुते

भरली चंद्रभागा । धोंडे बुडाले ल्हान थोर
देवाचा पीतांबर । जना धुती पायावर
चंद्रभागेच्या काठी । वाळूच केल आळ
जनी धुतसे सवळ । देवा या अिठ्ठलाच
जना धुन धुती । देवा इठ्ठलाची कळी
आबीर बुक्यान । चंद्रभागा झाली काळी

जना घुन घुती । रुक्मिनीची साडी
वास गेला झाडोझाडी । आबीरबुक्याचा
जना घुन घुती । नामदेवाच मुंडास
त्याला आबीराचा वास । भिमा चालली रहिवास
चंद्रभागेच पानी । दिसत पिवळ
जनी घुवीती सवळ । सावळ्या इठ्ठलाच
रुक्मिनीची चोळी । जनाबाईच्या धुन्यात
आसे मोती गळालेत । चंद्रभागच्या पान्यात
जना गेली ध्वाया । पांडुरंग पिळे करी
चल जना लवकरी । सासरवास व्हईल घरी
जना गेली धुवाया । इट्ठल पिळे करी
आरती उशीर झाला । चल जना लवकरी
जनाबाई धुन धुई । इट्ठल गोळा करी
चाल जने लवकरी । नामदेव हाका मारी
जनी धुन धुती । हे ग इट्ठलाचा झगा
डळमळे चंद्रभागा । याहीच्या दर्शनाला
जनी धुन धुती । इट्ठल पुढ बस
चंद्रभागे आल हस । त्याहीच्या प्रेमाच

जनाबाई चंद्रभागेला धुनं धुई,जनीला पाहून चंद्रभागेचं मन भरून जाई. देवभक्तांच्या भेटीनें चंद्रभागेला आनंदाचा पूर येई, तिच्या पाण्यावर उल्लासाच्या लाटा उठत. कधीं जनीनं धुणं घासावं, पांडुरंगानं पुढें बसावं. कधीं जनीनं पांडुरंगाला गुज सांगावं आणि पांडुरंगानं जनीला पिळे करूं लागावं. दोघांच्या प्रेमाचा हा अलौकिक प्रसंग पाहून चंद्रभागा गुंग होई, तिचं जळ

त्यांच्या चरण-स्पर्शासाठीं डळमळूं लागे. बोलण्याच्या नादांत उशीर होई तेव्हां पांडुरंग तिला गडबड करीत, आरतीला वेळ होऊन नामदेवाच्या जेवणाचा खोळंबा होईल अशी त्यांना धास्ती वाटे. इकडे जनीलाहि त्रास होऊं नये आणि तिकडे नामदेवाचाहि विग्रह घडूं नये अशी त्यांची अगदीं तारांबळ उडे.

## जनी शेण गोळा करते

इट्ठल मनीतात । जनी माझी हे धाकटी
शेन येचिती येकटी । बोलले पांडुरंग
गोपाळपुऱ्यावरी । जनी येचिती शेन
हिला उचलू लागल कोन । पांडुरंग पाहतो मन
पंढरीभवती । जना येचीती गवऱ्या
योकच हात लाव । माझ्या इट्ठल सोयऱ्या
गोपाळपुऱ्यावरी । जना येचीती गवऱ्या
हात लावावा सोयऱ्या । पिर्तीच्या पांडुरंगा
चंद्रभागच्या काठी । जना येचीती शेन
कोचे खवलेत दोन । जरीच्या पातळाचे

× × × ×

चंद्रभागे तीरथाला । कशाच्या कलागती
इट्ठल इट्ठल मनीती । जनाबाईच्या गवऱ्या

जनाबाई शेण गोळा करीत आहे, तिची पाटी भरली आहे आणि कौसाला देव ती पाटी कोण उचलून देईल याची वाट पहात आहे. हें चित्र चितास कसें उचंबळून आणतें, पण छे! देवाला कुठलं राहवयाला? त्याचें अन्तःकरण भडभडून येतें.

जनीचा भाव देवाला ठावा अन् सावळा पांडुरंग जनीनंच ध्यावा. देव–भक्तांत दुजेपण नव्हतंच. देव गंमत पहात होते, पण मनां तून कळवळले होते. ते तर तिचं माहेरच होते. ती त्यांना टोपलें उचलावयास बोलावते. आपण देवास हें भलतेंच काम सांगत आहों असें तिच्या मनीं मानसींहि येत नाहीं. ती पूर्णपणें विठ्ठलमय बनली होती. हें तर तिच्या गवऱ्यांनींहि सांगितलं आहे. तुम्हांला नवल वाटेल. पण गोष्ट घडली आहे आणि ती खरी आहे. एकदां जनीनं शेण गोळा केलं. त्याच्या गवऱ्या थापल्या. जिथं जनीचं काम तिथं पांडुरंगाचं धाम. जनीच्या शेण्या पांडुरंगाच्या सजण्या. रुक्मिणी तर नेहमींच म्हणे कीं जनीनं देवाला शेणगोण्याला लावलं. तिला त्याचं वाईटहि वाटे आणि कौतुकहि वाटे. कसें जनीच्या अवतीं भंवतीं देव लवयवत असत. जनीच्या गवऱ्या पुष्कळ झाल्या. बायांच्या पोटांत गोळा उठला. त्या म्हणूं लागल्या ह्या गवऱ्या आमच्या आहेत. चारचौघे गोळा झाले. कांहीं जनीकडून सांगूं लागले, कांहीं बायांकडून भांडूं लागले. कलागत लागली. पण जनीला त्याचं काय होय ? तिला कुठं भांडतां येत होतं ? तिचं दळण–कांडण आणि भांडण–तंडण सारंच पांडुरंगमय होतं. तिची ओंवीहि पांडुरंग आणि तिची शिवीहि पांडुरंग. तिला शेणहि परब्रह्म आणि सोनंहि परब्रह्म. विठ्ठलावांचून तिच्या तोंडांत शब्दच नव्हता. शेवटीं गवऱ्यांनींच भांडणाचा निकाल लावला. जनाबाईच्या गवऱ्या विठ्ठल विठ्ठल म्हणूं लागल्या. अशी जनीच्या गवऱ्यांची गोष्ट आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
१००४८

## जनीवरील कुभांड

जना ग म्हनीती । उजेडल उठा हरि
गडबडीन देव गेले । वाकळ घेऊन खांद्यावरी
पहाटेची वेळ झाली । बडव्याह्यची पडे उडी
इसरला शालजोडी । सावळा पांडुरंग
राती पडल सपन । बडवे सांगती सकळा
पांडुरंग पांघरला । जनाबाईची वाकळ
सकाळीं उठून । बडवे हासती मनाला
जनाबाईची वाकळ । देवा शोभती तुम्हाला
सकाळी उठून । बडवे सांगती नक्कल
राती पांघरले देव । जनाबाईची वाकळ
बडवे पहाती । अंगावर शाल नाहीं
खर सांगा जनाबाई । देव वाटविले तुम्ही

× × × ×

पंढरपुरात । कशाची हानामारी
जनीवर आली चोरी । देवाच्या पदकाची
पंढरपुरा । कशाची गर्दी झाली
जनीवर आळ आली । कंठी चोरल्याची
येकाला ग येक । बडवे सांगती
पदक जनीला मागती । लौकर देई आता
पंढरपुरामंधी । गेल पोतीच पान
जना वाहती देवाची आन
गोपाळपुऱ्यावरी । कशाचा गलबला
देव कैसा भुलविला । बडवे मारिती जनीला

जनीला काढून देल। जना पाहाती चवफेरी
देव जनीचा कैवारी

देवाच पदक। जनीच्या गळ्यात
देव भक्ताच्या मेळयात। कुभांड जनीवरी

× × × ×

बडव्याह्यला आला क्रोध। तिला धरी कोनी मारी
जनी द्यावी सुळावरी। ऐसे बडवे बोलती

चंद्रभागच्या काठी। सूळ रवीला आनीचा
इठ्ठल कैवारी जनीचा

रुक्मिनी धुन धुई। इठ्ठल करी पीळ
चंद्रभाग खाली सूळ। जनाबाईला आल मूळ

इठ्ठलाची सेवा। जनीच्या ध्यानी मनी
देव उभा रातदिनी। जनीच्या डोळ्या पुढ

विठ्ठल विठ्ठल। जना मारीती हाका
विठ्ठल मायबाप। कोठ गुतला सखा

पंढरपुरात। आळ आली जनावरी
हात ठेवी इन्यावरी। देवा नाही केली चोरी

इठ्ठल मनीतात। जना माझी हाय लहान
धाकटी इची शीन। बोलले पांडुरंग

इठ्ठलाची सेवा। जना करीती मनोमनी
आनंदले चक्रपानी। जनाच्या भकतीला

जनाबाई पाहे सूळ। सुळाच झाल पानी
उभा व्हता चक्रपानी। जनाबाईच्या पाठीशी

सूळाच झाल पानी । बडवे घाबरले फार
साष्टांग नमस्कार । जनाबाईला करीती

विठाबाई मावली, जना तिची सावली. सदा सर्वदा देव जनीच्या घरीं राहात. काकड–आरतीच्या वेळीं देव रावळांत येत. एकदा देवाला उशीर झाला. घाईत ते शाल विसरून जनीचो वाकळच पांघरून आले. खऱ्या भक्त–बडव्यांना कौतुक वाटलं. पण खरे हिरे किती ? गारगोटयाच अति. जगांत ढोंग धतुऱ्याचीच चलती. देवाच्या अंगावर जनीची वाकळ पाहून त्यांना वाटलं. जनीनं देवाला बाटविलं. देव बाटले, देव बाटले अशी त्यांनीं हाकाटी केली. त्यांना राग आला. देवाला पाहून शांतिसमाधान पावावं कीं रागाला वश व्हावं ? देवदर्शनानं स्वत: शुद्ध होऊन उद्धरावं कीं देवालाच गंगोदकानं शुद्ध करावं ? पण हे पडले बुद्धिसागर, सोनं सोडून घेती खापर; कपाळकरंटे फुलं फेंकून घेती कांटे. देवाला भुलविलं, देवाला बाटविलं म्हणून त्यांनीं ओरड केली. त्यांतच एक नवल झालं. देवाला रावळाची झाली घाई अन् कंठी पदक जनीच्या घरीं राही. मग काय, झुंबड उडाली. बारा घरचे बारा, लोक प्याले वारा. आधींच तारं अन् त्यांत शिरलं वारं. ज्याच्या तोंडाला जें येईल तें तो भकूं लागला कोणी म्हणे जनीनं देवाची कंठी चोरली. कोणी म्हणे तबक (स्तबक) चोरलं. कोणी म्हणे पान चोरलं, कोणी म्हणे पदक चोरलं. जनीवर चोरीची आळ आली. जनीनं जीव तोडून सांगितलं, देवाची आणहि वाहिली. पण ऐकणार कोण ? बडव्यांनीं तिला मारहाण केली, काढून दिलं. जनींत देवाचा सगळा जीव. देव फार कासावीस झाले. देवांनीं जनीचा कैवार घेतला. देव

अनुक्रम ....२८१८५.... वि: ....काद्य.... 
क्रमांक ....१२८२३.... नों: दि: ..२५१७५८..



म्हणूं लागले, अहो, माझी जनी फार लहान आहे. तिला चोरी मारी ठाऊक नाहीं. तिला लबाडी लाताडी ठाऊक नाहीं. काल तर आमचा गोपाळकाला चालला होता. म्याच तिच्या गळ्यांत कंठी पदक घातलं होतं. तुम्ही उगीच जनीवर आळ घेतां. खोटं वाटत असेल तर ह्या ज्ञानदेव नामदेवाला पुसा, ह्या चोख्याला पुसा, गोरोबा काकाला पुसा. अहो मुक्तीचा जिचा वसा त्या मुक्ताईला पुसा. जनीवर हें केवळ कुभांड आहे. पण देवाचं म्हणणं विरलं देवाच्या ओठीं, बडव्यांनीं नाहीं ऐकिल्या त्या गोष्टी. त्यांनीं सूळ रोवला चंद्रभागेच्या कांठीं. चंद्रभागेच्या तिरीं आणीचा सूळ अन् जनीला आलं मरणाचं मूळ. पण जनीला त्याचं काय होतं ? ती आपली नामस्मरणांत गुंगली होती, पांडुरंगांत रंगली होती. तिचा मारहि देवाला आणिक हारहि देवालाच. सुखदुःखाचीं गाणीं तिनं वाहिलीं देवाच्या चरणीं. जनीनं हात ठेवला विण्यावरीं अन् कळवळून सांगितलं सावळ्या हरि, म्या लुटली अवघी पंढरी पण कंठी पदकाची नाहीं केली चोरी. जनीच्या भक्तीनं आनंदले चक्रपाणी अन् विरघळला शूळ, झालं शूळाचं पाणी. विठ्ठलाची सेवा जनीच्या ध्यानीं मनीं, नडसीच्या नामदेवा धन्य तुमची दासी जनी.

## रुक्मिणी देवास शोधते

रुक्मिनी मनीती । देवा उठाव आंघोळी
दारी उभी जनी । काढीती रांगोळी
रुक्मिनी मनीती । इठ्ठल माझा कुठ गेला
दासी जनीन गवीला । शेनपान्याला लाविला

रुक्मिनी मनीती । विठ्ठल कोठ नाही
धोतराचे चोळ खवी । जनीसंग शेन लावी
रुक्मिनी बोलती । उभी राहून गल्लीत
झळकला पीतांबर । देव जनीच्या खोलीत
रुक्मिनी हाका मारी । कनानी दरवाज्यात
देव जनीच्या वाड्यात

विठ्ठल आणि जनी म्हणजे मोती अन् त्याचं पाणी. रुक्मिणीनं जेव्हां पहावं तेव्हां देव जनीच्या घरीं असत. त्यांना जेवणाखाण्याचीहि शुद्ध नसे. रुक्मिणीनें पुष्कळ हाका माराव्या दासी जनी रांगोळी काढायला आली म्हणावं, तेव्हां कोठें ते स्नानास उठत.

## गोपाळपुऱ्यास जातांना

गोपाळपुऱ्यावरी । दुपारी काला झाला
दह्या ग दुधाचा । चंद्रभागे पूर गेला
जनी जाती गोपाळपुऱ्या । उन्ह लागत ठायी ठायी
यान लाविली आंबराई । देवा माझ्या विठ्ठलान
गोपाळपुऱ्या जाया । जनीला झाल ऊन्ह
सावळ्या विठ्ठलान । लाविल तुळशीबन
पंढरीपसून । गोपाळपुऱ्याला लांबन
सखा इठ्ठल माझा । संग सवळ्याचा बामन
गोपाळपुऱ्या जाया । जनीला झाली रात
लाविली चंद्रज्योत । देवा या विठ्ठलान
गोपाळपुऱ्या जाया । जनीला झाली रात
तुळशीच्या पानावरी । देवा लाविली चंद्रजोत

जनाबाई गोपाळपुऱ्यास रहात होती. देवाची सेवा करून परत जाण्यास तिला ऊन्ह होई. तेव्हां दयाळू देव वाटेंत आंबराई लावी. देवानं लावलं तुळसीबन तिथं रमलं जनीचं मन. कधीं ते तिला गुज बोलत वाटीं लावीत येत. कधीं तिला रात्र झाली तर तुळशीच्या पानापानांवर चंद्रज्योत लावून उजेड करीत. देव-भक्तांचं हें एकरूप जीवन पाहून माय रुक्मिणीला आनंदाच्या ऊर्मीवर ऊर्मि येत. ती जनीचं कौतुक करी. तिच्या जीवनाच्या ओंव्या गाई.

## रुक्मिणीनें केलेलें कौतुक

इठ्ठल नाही नाही । हाक झाली रावळांत
इठ्ठल जनीच्या वाड्यांत । करीतो झाड लोट
इठ्ठल मनूनी । हाक मारीतो बडवी
इटू जनीच्या पडवी । भांडी घासाया लागला
देव नाही देवळात । कशाचा गलबला
पिर्तीचा पांडुरंग । जनीसंग पान्या गेला
इटू इटू मनूनी । हाक मारीती बडवी
जनीला दळू लाग । इटू जनीच्या पडवी
देव नाही देवळात । गर्दी झाली रावळात
इठ्ठल जनीच्या महालात । चोळीला टीप घाली
देव नाही देवळात । गर्दी झाली पंढरीत
डाव सोंगट्याचा खेळे । देव जनीच्या वाड्यात
देव नाही देवळात । गर्दी झाली रावळात
इस्रांती घेत्यात । देव जनीच्या महालात

इठू म्हण इठू । रावळी गर्दी झाली
सावळा पांडुरंग । देव जनाच्या वाकळी
देव नाही देवळात । बडवे धुडिती पंढरी
जनाबाईच्या मंदिरी । प्रीतीचा पांडुरंग
देव नाही देवळांत । बडव्यांह्यनी केला धिंगा
तुम्ही जनीच्या महाली बगा । प्रीतीचा पांडुरंग
सकाळी उठून । जना झाडलोट करी
सावळा पांडुरंग । केराच्या पाटया भरी
रावळापासून । गोपाळपुऱ्याला सुरंग
जनीला दळूं लाग । रातच्यात पांडुरंग
सावळा पांडुरंग । जनीचा सासरवासी
उस देल जात्यापशी
दळनाची पाटी । उचलितो अंग
सावळा पांडुरंग । जनीला दळू लाग
विठ्ठल माझा सखा । गेला जनीच्या बागात
झाला गुग दळनात
जनी बसली नाह्याला । पानी नाही इसानाला
सावळा पांडुरंग । झरे फोडी पाषानाला

× × × ×

पंढरपुरामंदी । जनीचा नेहला तवा
बोलले इठ्ठल । दवंडी द्यावी नामदेवा
भरली चंद्रभागा । पानी लागल लिंबाला
जनी सांगती देवाला । बाळ पुंडलिक बुडाला
चंद्रभागेच बाई पानी । लागल रावळाला
उभा जनीच्या देवळाला । देव विठ्ठल माझा

नामदेवाच लगीन । जायाच बेदराला
जनी करवली देली त्येला
नामदेवाच्या लगनी । जनाबाई करवली
करंडा इसरली । बेदरच्या पारावरी
पंढरपुरात । जनाबाई झोपी जाती
अभंगाच्या वव्या गाती । देवा माझ्या इठ्ठलाला

× × × ×

चंद्रभागच्या काठी । जनीची झोपडी
देली लक्षाची शालजोडी । सावळ्या विठ्ठलान
गोपाळपुऱ्यावरी । जनाबाईची झोपडी
देवाची इसरली । नवलाखाची पासोडी
पंढरपुरामधे । कशाचा गलबला
सावळा इसरला । शेला जनीच्या उशाला
गोपाळपुऱ्यामंधी । जनाबाईची वाकळ
सख्या माझ्या विठ्ठलाला । झोप लागली सीतयळ
मोत्याच्या घोंगडीचा । देवान त्याग केला
वाकळ पांघरला । जनाबाई हरनीची

× × × ×

पंढरपुरात । जनाबाई सुगरन
लाटीती पापड । चंद्रसूर्व्याची घडण
पंढरपुरात । जनाबाई सुगरन
देवाच्या पर्सादाला । साखरच इरजन
पंढरपुरात । जनी भाजिती लाह्या
रथ गेला मिरवाया । सख्या माझ्या विठ्ठलाचा

पंढरीला येढा। करूनी आला देव
विठ्ठलाच्या देवळात। ऊठ जना दिवा लाव
पंढरीला येढा। घातीला कशापायी
हरीच्या नामासाठी। येडी झाली जनाबाई
असा इठ्ठल मनीतो। जना माझी कोठ गेली
सभामंडपाच्या खाली। कीर्तनाला उभी केली

रुक्मिणीन जनीचं जीवन जवळून पाहिलं होतं आणि न्याहळून पाहिलं होतं. तिला तर तें देवाच्या चरणापासून निघालेल्या निर्मळ गंगाजीवनासारखंच वाटत होतं. जनीच्या जीवनांतील अनेक प्रसंग ती वरचेवर चिंतीत असे आणि ओव्या गुंफीत बसे. माईची माया किती म्हणून सांगावी? लेंकरूं होऊनच ती अनुभवावी. जनाबाईचं कौतुक करते रुक्मिणी अन् जवळ उभे राहून ऐकती चक्रपाणी.

## समारोप

पंढरपुरात। जनीचा बाभनमोळा
गरसोळीला पद्र सोळा। सोनियाचा भांग टिळा
पंढरपुरामंधी। जनी तुझा बाभनमोळा
सोनियाचा भांग टिळा। पद्र दुल्लडीचे सोळा
हातात टाळ विना। जनी चालली रावळा।
रथ देवाचा पिवळा। हासे इठ्ठल सावळा
जनाबाईन वव्या। कानी माझ्या सांगितल्या
अन् म्या अंतरी वळखिल्या। पांडुरंगाच्या खुना

जनी लक्ष्मीपतीची लाडकी लेक होती. ब्रह्मभावना अंगीं बाणलेल्या तिच्या ब्राह्मणमोळ्याचं वर्णन कसं करतां येईल? माहेरचं

सारं वैभव अंगावर लेऊन एका हातांत टाळ आणि दुसऱ्या हातांत विणा घेऊन मुखानें विठ्ठल विठ्ठल म्हणीत जना रावळास जाई तेव्हां तिच्या अन्तरींच्या कान्तीनं पंढरीला उजळा येई. जनीच्या भक्तीच्या सोन्यानं देवाचा रथ पिवळा होई. जनीची भक्ति पाहून देवाला कौतुकानं हंसू येई. जगज्जीवन हेंच जनीचं जीवन. जनीनं तें अनुभविलं, रुक्मिणीनं तें पाहिलं अन् मराठी मावलीनं जनीचं गीत गायिलं. जनीनं त्या ओव्या एकीच्या कानीं सांगितल्या, तिनं पांडुरंगाच्या खुणा ओळखल्या. त्या एकीच्या ह्या अवघ्या लेंकी; जनीची ओवी आतां सगळयांच्या मुखीं. अवघ्या जणींचा हा गोपाळकाला तिथून मला प्रसाद आला, मी तुम्हांला वाटून दिला. जनीच्या जीवनाची ही ओवी तिची चव नित्य नवी. जनाबाईची एक एक ओवी, अखंड वाहती भिवराबाई. माय ग माझी जनी, माझा भाव तुझ्या चरणीं. चाल जीवा जनीच्या गांवा. जनाबाई माझा दंडवत घ्यावा.

## तुळशी–माहात्म्य

तुळस लावूनी। मोठ पुन्य पदरी बांधील
कार्तिक की द्वादशीला। लग्न क्रिष्णाशी लावील

पानी घालन्या तुळशीसी। नका धरू आनमान
लग्न लावायाशी। क्रिष्ण आलेत नारायेन

विठ्ठल बोलत्याती। आई तुळशी पतिवर्ता
तिची देवात झाली गनता

पहिली माझी ववी। तुळसीच्या मुळच्या
देव माझा पांडुरंग। क्रिष्ण गोकुळात खेळचा

दुसरीं माझी वत्री । तुळसीच्या पाना
क्रिष्ण गोकुळात तान्हा
सकाळी उठून । करते तुळसीला नमस्कार
तिच्या मंजुळाचा । देवाला चंद्रहार
सकाळी उठून । तुळसीला दंडवत
आसे तिच्या दर्शनान । मोक्ष लोळतीं पायात
तुळसीला घाली पानी । पानी घालूंनी लावी कुकू
तिचा चुकल येमलोकू
तुळसीला घाली पानी । पानी घालून घाली दूध
आशी तिच्या दर्शनान । जल्मोजल्मीं झालीं सिद्ध
तुळसीला पानी घाली । पानी घालून दावी निवद
आसे तिच्या दर्शनान । आले भोजना गोइंद
तुळसीला घाला पानी । तुळस मावली
साधु संताला पावली
तुळशी म्हणून तुळशी । तुळशीला घाला वटा
इघ्न पळती बारा वाटा
तुळसी म्हनून तुळसी । तुळसीला घाला पानी
पापाची झाली धुनी
तुळसीला घाला पानी । करा तुळसीला आळ
मग पहाव पुत्र फळ
तुळसीला घाला पानी । लावा तुळसीला गंध
पोटीच्या बाळचा । घरी हाये आनंद
तुळसी म्हणून तुळसी । तुळसीला लावा गंध
जन्मोजन्मी तुटल बंध

तुळसी म्हणून तुळसी । तुळसीपशी लावा कुकू
जन्मोन्मी घडल सुखू
तुळसी म्हणून तुळसी । तुळसीपशी लावा दिवा
उजाड पड सर्वा देवा
तुळसी म्हणून तुळसी । घाला पर्दक्षेना
उभे हैती नारायेन

## विठ्ठलाचें दर्शन

इसाव्यापसून । आडवी लागती चंद्रभागा
दर्शनाला आली सांगा । हरि सावळ्याला
चंद्रभागापसून । आडवा लागतो पुंडलीक
दर्शन झाल ठीक
कुंडलिकापसून । आडवा लागतो चोखामेळा
सादु संत झाले गोळा
चोखामेळ्यापसून । आडवा लागतो नामदेव
दर्शन तेच घेव
नामदेवापसून । आडवी लागती पायरी
येव राउळाबाहेरी
पायरीपसून । आडवा लागतो चोपाळा
नाच दिंडीत सावळा
चोपाळ्यापसून । आडवी लागती तुळस
शिखरी सोन्याचा कळस । इठ्ठल देवाच्या
तुळसीपसून । आडवी लागती रंगसीळ
कवा आलीस लेकीबाळ । देव इठ्ठल बोलतो

रंगसिळपसून । आडवा लागतो ग्रडखांब
भेट देतो जरा थांब । देव इठ्ठल बोलतो
गरडखांबापसून । आडवी लागती कडी
हाती सवळ्याची घडी । इठ्ठल देवाच्या
कडीपसून । आडवा लाग चांदीचा दरवाजा
भेट पंढरीचा राजा
दरवाज्यापसून । आडवा लागतो आडू
हाती सोन्याचा गडू
आडू ग पसून । गाते मी हारीपाठ
चेरन धरीते बळकट । देवा या इठ्ठलाचे
इठ्ठल मजा पिता । रुक्मीन मही माता
नाही मला शीन आला । दोघाला वया गाता

## मायबाप–तीर्थ

आधी गाते ववी । नाना माझ्या लालाला
मागून हळदीच्या थेलाला । मायबाईला
पहिली माझी ववी । नाना माझ्याला गाऊ किती
खडीसाखर उमरावती । मायबाई माझी
पहिली माझी ववी । नाना माझ्या गवळ्याला
जाई पान्याच्या जिव्हाळ्याला । माय ग माझी बाई
पहिली माझी ववी । नाना माझ्याला गाऊ किती
जल्म दिलेली भागेरती । माय हारना माझी
पहिली माझी ववी । नाना माझ्या थोराला
हिरा गंगच्या धाराला । भाईराजस माझा

× × × ×

काशीच्या पलीकड । मग्र माशाच घर
बापा माझ्या वडिलानी । जल्म दिला राज्य थोर
समिद्राच्या पलीकड । मग्रमासा यिली गेला
पिंड माझा पैदा केला । माझ्या बाप्पाजीरायान
राया बाप्पाजी चंदन । मायबाई गोंधन
मला झाली वाट । दोही झाडाच्या मधून

× × × ×

आता बाप्पाजी विश्वेश्वर । मायबाई बेलफुल
या रे तीर्थाला जाऊ चाल
नानाजीराया वड । बाई माझी तुळशीपान
शेंडा लवला वजनान
देसाईराया माझा । अश्वत्थ–पिंपळ
याची सावली शीतळ । मायबाई माझी
नानाजीराया माझा । काशीखंडाचा वड
दूध धुर्पतीच गोड
नानाजीराया माझा । उच पासवा किती चढ
दूध नारळीच गोड । माझिया मावलीच
देसाईराया माझा । काशीखंडीचा वड
मायबाईच माझ्या । दूध त्रिवेणीच गोड
देसाईराया माझा । समुद्राचा साटा
माय माझ्या हारणीचा । गंगेचा ताफा मोठा
नानाजी माझा राया । हाये सरगीचा घाट
गवळन्या माझ्या बाईच । गंगेच नाम मोठ

× × × ×

देसाईराया माझा । काशीखंडीचा वट
तिथ माझ हिंगनबेट । भाईराजस माझा

देसाईराया शिव । मायबाई पिंडी
नंदी माझा भाईराज । देवळाच्या तोंडी

राया देसाई वड । मायबाई फांदी
देऊळ चिरेबंदी । भाईराजस माझा

मायबाई आपली । देसाईराया कोठून
आला हृदयी फुटून । अम्रुताचा पान्हा

काशी मनूनी काशी । काशी आपली माय
माझ्या नानाजीच । या तीर्थाच नाव काय ?

नयी आला नदी पूर । लेंडी वाज कैसा धीर
माझा साटाचा समिदर । नानाजी राया माझा

नयी आला नदी पूर । लेंडी वाज भदभदा
माझी साटाची नरबदा । हारन मायबाई

फुलामधे फूल । फूल उत्तम चाफयाच
सुख भोगाव पितयाच

माय माय म्हनुनी । तोंड पडल गोड
खारीक बाईईच । बागमधे एक झाड

मावलीची माया । बोरी बाभळीचा पाला
करवत लागतो । येड्या मातेच्या जिवाला

माझ्या गवळनीच दूध । अम्रुताचा पान्हा
वाटून पिऊ सरावना

आता काशी ग विश्वेश्वर । मी ग कशाला जाऊ बाई
माझी पवित्र गंगामाई । हारन मायबाई

माझं ग मायबाप । हायती तुळशीच रोप
तेहच्या ग सावलीला । लागून गेली झोप
माझे मायबाप । अमरावती बन
रयी झाल माझं मन । त्याहिच्या सावलीला
जन जाती जतरला । मी त जाते माहेराला
माई हे वडील । काशी तीर्थ हे पाहचाला

## माझी जातकुळ

माझी जातकुळ । कोन पुसतो मंजुळ
चला दाविते आजुंळ
माझी जातकुळ । कोन पुसत अंगनी
खाशा बागाची लिंबुनी । हारन मायबाई
माझी जातकुळ । कोन पुसतो कुंभायार
खाशा बागाचा लिंबायार
माझी जातकुळ । कोन पुसतो हाळवट
ताडा दाविते जुवाट
माझी जातकुळ । कोन पुसत खांदीगुंदी
सुर्ती रुपया खरी चांदी
माझी जातकुळ । कोन पुसतो आगळा
आम्ही अस्सलाच्या लेकी । खऱ्या सोन्याच्या मव्हरा
मह्या बाप्पाजीच कुळ । काय पुसशील भल्या
बस वसरीच्या खाल्या । तुला सांगते सात पिढ्या
मह्या बाप्पाजीच कुळ । काय पुसता दाजी
उच्च कुळीची मही आजी । तिच्या पोटचे बप्पाजी

## जातीसाठीं खातें माती

जातीसाठी माती । खाते मी परोपरी
सासरी माहेरी । नाव कराव दुहेरी
जातीसाठीं माती । खाते मी लवनाची
माझ्या बाप्पाजीरायाची । उच्च कुळी रावनाची
जातीसाठी माती । खडे खाते मी चावून
तुमच्या नावाला भिऊन
जातीसाठी माती । खाते मी केसायाची
बट्टा कुळीला नसायाची
जातीसाठी माती । माती खाते परोपरी
जात अस्सलाची खरी । माझ्या बाप्पाजीरायाची
जातीच लेकरू । जातीसटी मरत
सागाच लाकुड । इमारतीला चढत

## पदराची बंदोबस्ती

उभ्या गल्लीन जाते । पदराची बंदोबस्ती
मला ताकीद केली होती
उभ्या रस्त्यान जाते । पदर टापाटीपी
कुण्या रस्त्याला बयठकी
उभ्या गल्लीन जाते । घेऊ पदर कुटवरी
चौक्या बसल्या वाटवरी
उभ्या रस्त्यान जाते । पदर माझा काकनात
आयना माझा दुकानात
उभ्या गल्लीन जाते । पदर कपाळ भरून
वाट वाड्याच्या मव्हरून

उभ्या रस्त्यान जाते । पदर माझा थोडा
माझ्या ग बंदवाचा । पुढं सोयऱ्याचा वाडा

रस्त्यान बाई जाते । सभा बसली अटनकोट
मला मधून दिली वाट । बंधूच्या मित्तरानी

रस्त्यानी चालताना । पदर दोही भुजा
अहेल्या सखेबाई । कांत आडवा आला तुझा

उभ्या गल्लीन जातें । घेते पदर वडूनी
दिऊ माझा ताना । बोल सबला चढूनी

उभ्या रस्त्यान जाते । पदर घेते पुडी
नाव लौकिक दाहीकडी । सासर माहेरचा

रस्त्यान जाते बाई । खाली बघून माझी चाली
सभा तुमाला नवाजली

× × × ×

उभ्या रस्त्यान जाते । म्या सोडीना फासवा
गरती माजीचा कुसवा

उभ्या रस्त्यान जाते । खडा हालना भोईचा
येल सीतळ जाईचा

उभ्या रस्त्यान जाते । चालनी माझी तसी
शान्या तुजी मी मावशी

उभ्या रस्त्यान जाते । बघते मी मातीला
माझ्या अस्सल जातीला

उभ्या रस्त्यान जाते । उगीर माझी माती
किती करू सखेबाई । पदराची बंदोबस्ती

# जीवाला देतें जीव

जीवाला देते जीव । जीव देऊन पाहिला
हे ग हळदीवाचून । रंग नाही मसाल्याला
जीवाला देते जीव । कोन माझ्या जिवाचा
नाही अंतर दियाचा
जीवाला देते जीव । काय देऊनी आभंडाला
मया पाठीच्या भावंडाला
जीवाला देते जीव । प्रानाला देते प्रान
माझ्या वानीच्या बांधवाची । नका घालू त्याची आन
जीवाला देते जीव । परानाला झाले राजी
खातरी बघा माझी
जीवाला देते जीव । पाषानी लावील
आपल्या मनावनी मन । नाही कुठ आढळल
जीवाला देते जीव । जीव देऊनी नालकाला
कीड लागती वाळकाला
जीवाला देते जीव । काय देऊनी नसान्याला
मया नाहीं पाषानाला
जीवाला देते जीव । जीव देऊनी फाईला
पाषान कोरडा राहीला । पान्याच्या धारला
जीवाला देते जीव । उगाच दिला बाई
जात बैमान ठाव नाही
जीवाला देते जीव । मी त देऊन पाहीला
जाईच्या फुलात । नाही केवडा राहीला

## धीराचा प्रपंच

प्रपंचाचा गाडा । लोटता लोटना
हात लाव नारायना । हरि सावळ्या माझ्या

घरा संसाराला । जीव माझा कदरला
मारवती राजा । येते तुझ्या शेजाराला

केवड्याच झाड । मूर्ख मने झाडपाला
काय वळखू जाने । खेड्याचा राहनेवाला

केवडा केवडा । वास दर्वळत गेला
आशील जाईबाई । चढ देवामंदी केला

मूर्ख ग बोलला । तोंडाची वाफ गेली
देसायाच्या नावासटी । मनामधे छाट केली

बोलसील रे बोलक्या । तुझ्या बोलाचे दिवस
देसायाच्या नावासटी । माझ्या दिलात पईस

गव्हार बोलतो । तोंडाच्या हाटवटी
अस्सल रेशमाच्या । पडल्या हासडून गाठी

फासीपारध्यान । फासा घातिला बनात
गव्हाराच्या संगतीन । हरीण दिलगीर मनात

राजस पाखरू । संगतीसाठी गेल वना
दिली गंगा ढवळूनी । अर तू कावळ्या बैमाना

रजहंस पाखरू । निथळ पानी पित
कावळा बैमान । वऱ्हे ढवळून देत

राजहंस पाखरू । मोत्याचा चारा चर
आपल्या मनी झुर । काय संचित नाही बर

राजहंस पाखरू । चोचीत दुखवल
मोतीयाचा चारा । इसरून गेल

× × × ×

भरल्या सभेत । उचलीना पापनी
देसायाच्या नावासाठी । जीव घालावा काचनी
चंदनासारीख । म्यापल्याला झिजविते
राया माझ्या देसाया । वर तुम्हा म्हनवीते
सोनार आचीतो सोन्याला । आपन काचाव जीवाला
लागू देईना कलंक । देसायाच्या नावाला
चांगल्याशी मी चांगली ।'रगेलासी मी रगेल
मायबाईच दूध । नाही कोनाशी दबेल
सोन झाल जुन । चांदी पाहीली लावून
मायबाईची उपमा । काय मूर्खाला देऊन
माझ्यारे प्रपंचाचा । घोर म्या नाही केला
हवाला देला तुला । सावळ्या पांडुरंगा
धीराचा प्रपंच । जनान हिनविला
शरतीन चालविला । हरि सावळ्यान
मोठे मोठे ग मनीती । या दुबळ्याच व्हईल कस
देव मनामधे हास । सगळे बराबर दिस

## विसाव्याचं झाड

माहेराची वाट । कोन पुसती यशवदा
माडी दिस कळसासुद्धा
जिवाला वाटत । पाखराच्या पायी जाव
वाड्यावरी उतराव । भाऊरायाच्या माझ्या

शेजीची संपत । मी तिच्यान नटना
दुबळा मला वाटना । भाईराजस माझा

धनसंपता । काय करावी लोकाची
मला सावली झोकाची । भाऊरायाची माझ्या

शेजीची संपत । भितीवरला चुना
सावकार माझा जुना । भाईराजस माझा

शेजीची संपत । काय कराव साडीला
बैल येतील गाडीला । भाईराजसाचे माझ्या

काय कराव बाई । शेजीबाईच्या करनीला
आशील मोती मोरनीला । भाऊराया माझ्या

शेजीच्या बंधूला । दादा म्हनायाची चोरी
माझ्या बंधूची गोष्ट न्यारी

कामामाग काम । कामाची लावी माळ
माझ्या भावाची मला ढाल

सीतळ सावलीला । मी उतरीते वज्ज
मला सावली गडदाबाज

सीतळ सावलीला । मी उतरीते वझ
विसाव्याच झाड माझ । भाईराजस माझा

शीतळ सावलीला । मी बसले टेकुनी
आंबा डौलाचा देखुनी

ववीला गाते । देसाई सागर
निरशा दुधाची घागर । भाई राजस माझा

नारायना देवा । आगाशी तुझी छाया
अम्रत द्यावा प्याया । बंधुराय माझा

माझ्या सख्याची शिगी । शाही मिगीच अंड
येक्या खिनात परांड । भाऊरायाच माझ्या
गुज मी सांगते । मानुस पाहूनी दमाच
उच झाड बदामाच । भाऊराया माझा
वोळवन केली । माझ्या पदराला मासा
रंग बडोद्याचा कसा । भाऊरायाला पुसा
रांजनीच पानी । सावलीन घेते
पारक्याला दुवा देते । भाऊरायाला माझ्या
शंभर माझ गोत । गोताची परवा थोडी
तुम्हासाठी झाल्ये वेडी । भाऊराया माझ्या
सिदफळगावाला । वडपारंब्या दाट बाई
त्याच्या सावलीला । उतरल्या वनगाई
शीतळ सावलीला । पाखर झाले गोळा
विसाव्याचा पानमळा । भाईराजस माझा

## देतें तल्वारीवर पायी

तुमच्या जीवासाठी । जीव माझा करवत
देवदास हरि माझ्या । याव गावाला फिरत
तुझिया जिवापायी । प्रानाला झाले राजी
आन वाहीना सख्या तुझी
तुझ्या जिवासटी । जीव माझा इकीन
नेनत्या माझ्या बंधू । तुला ताजवा जोखीन
तुमच्या जिवापायी । माझ्या जिवाची करते माती
तुमच्या चांदीच्या गुनासाठी

तुमच्या जीवापायी । व्हईन आगाशीची घार
तुम्हावरी हेतु फार
तुमच्या जिवापायी । व्हईन वनीच हरन
तुम्हा-भवती चरन
तुमच्या जिवापायी । माझ्या जिवाची व्हती लाही
नाही विलाज करू काई
तुमच्या जिवापायी । माझ्या जिवाच व्हईल काई
देते तलवारीवर पायी

## का रे पाव्हन्या केली रात

दिवस मावळला । येशीच्या कोना
माझ्या वानीच्या बंधवाला । झाली जवानी ऊठ मना
दिवस मावळला । माळाच्या कोरनीला
चिंता लागली हरनीला
दिवस मावळला । दिवसाच्या तोंडी मासा
बंधु माझा येईल असा । मला वाटतो भरोसा
दिवस मावळला । माळाच्या खाली ऊन
काळडी घोडी पिवळा जीन । भाऊराया माझा
दिवस मावळला । सोलापुरच्या कोपऱ्याला
द्रिष्ट व्हईल बेपाऱ्याला
दिवस मावळला । गाव पंढरीच्या सिव
त्याच्या उजेडात जाव
दिवस मावळला । गाव सोडून मैलावरी
चावुक टाकितो बैलावरी

दिवस मावळला । झाडाझुडपाच्या झाल्या दाटी
वढ करीतो माझ्यासटी
दिवस मावळला । तुळजापुरच्या हंगामाला
सोन शिंगीच्या लगामाला
दिवस मावळला । वडजीच्या वढ्यामंदी
चांदी झळकती तोड्यामंदी
दिवस मावळला । दादाच्या बोरीवरी
सखा सारंगी घोडीवरी । भाऊराया माझा
दिवस मावळला । झाडीमंधी चमकला
चालीमंधी वळखला । भाऊराया माझा

× × × ×

दिवस मावळला । दिवा लावा सवसनी
आंगनी आल्या त्या मोकासिनी । तान्ह्या वासराच्या
दिवस मावळला । करा दिव्याची गरबड
दारी लक्षीमी आवघड
दिवस मावळला । दिवसापशी माज काय
चांदन्यान येतो । माझा ग भाऊराय
दिवस मावळला । दान्यात माझा हात
का रे पावन्या केली रात

## बंदु इव्हाई करीतें

बंदु इव्हाई करीते । आपल्या इलाक्याचा
धाराशिव तालुक्याचा
बंदु इव्हाई करीते । मी आपल्या मनान
हाय तुमच्या सिनन

बंदु इव्हाई करीते । खेडयाचा नकु बाई
करनी ठाव नाही । जरीच्या पातळाची
बंदु इव्हाई करीते । कसबी गाईचा दाटून
पानमळयाला खेटून । मागते जानवसा
बंदु इव्हाई करीते । कसबी गाईचा मान्या
कारंज लावी पान्या
बंदु इव्हाई करीते । कसबी गाईचा दलाल
राशी उधळीतो गुलाल
बंदु इव्हाई करीते । वाडी गाईचा हेडया
बंधु माझ्या डिगांबराच्या । त्याच्या जोत्याला
बोरकडया
बंदु इव्हाई करीते । माता मनीती नकु बाई
मान राखायाची नाही । आताची भावजई
बंदु इव्हाई करीते । माय मावशी नकु बाई
सरजा तोलायचा नाही । नकल्या माझा बंदु
बंदु इव्हाई करू गेले । सिता मालन बोलन
बाई विलाज चालन
बंदु इव्हाई करू गेले । सिता मालन झाली राजी
का ग बोलना माझा ताजी । राज्यधर बंदु माझा
बंदु इव्हाई करू गेले । सिता मालन तीन ताड
बलाविते सोप्या आड । राज्यधर बंदवाला
बंदु इव्हाई करू गेले । सिता मालन इथ तिथ
बंदु माझे बोलत्यात । तिच कोन चालू देत
बंदु इव्हाई करीते । मह्या देराला पुसते
बापू माझ्या रावनाच्या । हवेलीपुढ डेरा देते

बंदु इव्हाई करीते । दीर दार्जीबा संग चला
माझ्या बंदूची भीड मला
बंदु इव्हाई करीते । आपन जाऊ दोघजन
दीरा सम्रता माज्या । तुमच मोडायाच कोन
बंदु इव्हाई करीते । भाव्या सम्रत संग चला
सरी पुतळ्याची माळ । सोयरा बोलल तुम्ही तोला
बंदु इव्हाई करीते । मावसभाऊ सखा
माज्या पाचजन भावानो । गावजेवन मागू नका
बंदु इव्हाई करीते । वसमत गाईजा राजा
त्याच्या दरवाजाला धजा । त्यांत मही कंवळजा
बंदु इव्हाई केला । सका सोईरा व्हईल मला
बाळा सासरा मामा तुला
बंदु इव्हाई करीते । जन-लोकाच्या ईना मना
माजा पाटव हाये जुना
बंदु इव्हाई करीते। जन मनी जुना पेंड
केळीचा वल्ला दांड । आम्ही बहीन--भावंड
आंव्याच्या झाडाखाली । बोलाचाली झाली
बहीन भावाची ईन झाली । वर्दी गावामध्ये गेली

## असं माझं दुबळपन

हे ग दुबळेपनाला । जग लागल हसाया
जाते इच्यार पुसाया
दुबळपना याची । लाज वाटती मला
काय कराव नशिबाला

दुबळेपनाची । शेजीला आली घान
झाड अंजिराचे ल्हान
दुबळेपनाच । माझ्या जिवाला करवत
कदी होचील संवरत
अशी दिवाळीची चोळी । तू शिव रे मानान
घडन भाऊबीज । माझ्या दुबळपनान
दुबळपन माझ । उद्या निघून जाईल
मोल हिऱ्याला येईल

× × × ×

माझ्या दुबळपनाची । जनाला येती घान
सीतेच्या आंगनी । रामचंद्राचा बान
माझ्या दुबळपनाला । नार पाहून हसली
जोडी पारावर बसली
माझ्या दुबळपनाची । जन करीत उलाढाली
येईल संपत्ति दमाखाली
धन ग संपत । डावीहाती माझ्या मळी
उद्या लेतिल भिकबाळी
दुबळेपनाची । साल आली सरत ।
वाघ झालेत करत
हे ग दुबळपनाची । जनान हेळ केली
नारायनानं वाही देली
हे ग दुबळपनाला । मव्हा जीव आला घाया
तुव्हा दगडाचा पाया
दुबळपनाच । नार सांगती गऱ्हान
चंद्रा लागल गिऱ्हान । पुनवच्या दिशी

हे ग दुबळपन । आल आता थोडयावरी
यवडया जुंदळया राजाची । हेलं रची गाडीवरी
हे ग दुबळपन । तुला मनील कोन
तुझ्या पोटी रत्न दोन
अस माझ दुबळपन । देवा असच राहू दे
माझ्या कपाळीच कुकू । माझ्या जलमी जाऊ दे

## लाडकी लेक

लाडक्या लेकीईचा । लाड तिचा इळइळ
फडका माघर्त पायघोळ
लाडाची बाई लेक । तिच नाव तारामती
चुलता हिंडतो बारामती
लाडकी बाई लेक । चुलत्याला मनी तात्या ।
पायी पजन उभी जोत्या
लाडकी माझी बाई । हिच खेळन हुडयावरी
भिंग झळकत चुडयावरी
लाडक्या लेकीच । दह्यावर जेवन
दुधा लावा इरजन
लाडक्या लेकीइच । नांव चमक विजली
साखर दुधात भिजली । मैना रुसून निजली
लाडकी बाई लेक । गेली बामनाच्या गल्ली
तिला नेमान दिस्ट झाली
लाडकी बाई लेक । लाडाची होऊ नको ।
जाशील परघरा । येडी मया लावू नको

× × × ×

लाडक्या लेकीच । नाव ठेवील हौसाबाई
रामचंदर जावाई । आत्तारी गंध लावी
लाडकी बाई लेक । चुलत्याचा मोठा लळा
आंदन मागती पानमळा
लाडकी बाई लेक । चुलत्याच्या माग लाग
साळू नेनंती माझी । पागावरली सिंगी माग
लाडकी बाई लेक । वाटत ऊन्ह टाळी
मैना मोत्याचे थेंब गाळी
लाडक्या लेकीन । तिन लाडाचा केला गाडा
उदास दावी वाडा
लाडक्या लेकीला । लाडाच काम सांगा
माझ्या नागर बाईला । देव पुंजाला पानी मागा
लाडकी बाई लेक । लाड तिचा चालवा
माझ्या नागर बाईला । बाई मनून बलवा
लाडक्या लेकीच । नाव तिच सरूवारू
किती हौशीन हाक मारू

## तुज्या मैनाला वाट लावू

साळू सासऱ्याला जाती । अन् म्या बांधिते गोड़ गोड
भूक लागल तिथ सोड
साळू सासऱ्या जाती । सिदोरी करंज्याची
दूर पल्याला जायाची
साळू सासऱ्या जाती । कवतिकाची सिता
पुढ बंधू माग पिता

साळू जाती सासऱ्याला । चौघ भाऊ चहूकड
मधी नागिनीच घोड
साळू जाती सासऱ्याला । शिवशेजारी सासर
गाडी जुपले वासर
साळू जाती सासऱ्याला । येशीपसूर आयाबाया
शिवपत्तूर बापबपा । कडपत्तूर बंधुराया
साळू जाती सासऱ्याला । आयाबायाची लामन
संग सवळयाचा बामन
साळू जाती सासऱ्याला । तिच्या वंटीला कवळ दान
संग मुराळी गाडीवान
साळू जाती सासऱ्याला । तिच्या वटीला कवळी पान
संग मुराळी पहिलवान
साळू सासऱ्या जाती । तिच्या वंटीला कार बोर
संग मुराळी छंदखोर

× × × ×

साळू सासऱ्या जाती । घोड चर लव्हाळयाला
हात देते जिव्हाळयाला
साळू सासऱ्या जाती । घोड लागल चढनीला
भाची भागिरथी माझी । येते मनीतं घडनीला
साळू सासऱ्या जाती । आडव लागत लवन ।
उत्तम शिरिधर हारी । संग चपराशी जवान
साळू सासऱ्या जाती । आडवा डोंगर कंगुऱ्याचा
संग मुराळी मंब्रल्याचा

साळू जाती सासऱ्याला । माळाच्या आरसडश्यान
साळू चालली मुरसडश्यान
साळू सासऱ्या जाती । नदीच्या सैवरान
शालू भिजला दैवरान
साळू सासऱ्या जाती । पानी पिईना शेवाळचाच
आडव गाव जिव्हाळचाच
साळू सासऱ्या जाती । वाट फुलाच्या बागातून
कळचा गळाल्या भांगातून । जाई-सेवंतीच्या

× × × ×

साळू जाती सासऱ्याला । ढेळजाला उव्या राहू
तुझ्या मैनाला वाट लावू । सया बोलत्याता

## लाल पिंजरीचं कुंकू

लाल पिंजरीच्या कुंकाची । रस्त्याला आली गोनी
सख्या बाईला माझ्या । आयव नारीला सांगा कोनी
लाल पिंजरीच कुंकू । पैशाला पैसाभार
सख्या बाईच माझ्या । लेनारनीच भाग्य थोर
लाल पिंजरीच कुंकू । माझ्या आंगनी मोलाविते
तुमच्या रानीला बलाविते
लाल पिंजरीच कुंकू । बाजारी माघल
माप धडचाच लागल
लाल पिंजरीच कुंकू । धडचान जोकत
सख्याबाईच माझ्या । आयवपन पोकत

लाल पिंजरीच कुकू । मी येकली कशी लेऊ
सोप्या बसली माझी जाऊ
लाल पिंज़रीच कुकू । तुझ्या शालीला कोठूनी
आला वहिनीला भेटूनी
लाल पिंजरीच कुकू । माझ्या करंडी झाल पानी
तेन मेव्हनी केली रानी

× × × ×

लाल पिंजरीच कुकू । धाराशिवी घडत
माझ्या अनसयाला दंडत
लाल पिंजरीच कुकू । लेली अंबा मळवट
धारशिवाची राधा नीट
लाल पिंजरीच कुकू । गोणी कोण्या आत्ताराची
शेजेच्या भ्रताराची । अशी होईल दृष्ट
लाल पिंजरीज कुकू । लावित्याता सासासुना
आस दईव आहे कुना
लाल पिंजरीच कुकू । आला आतार येकायेकी
तुम्ही लावा मायलेकी
लाल पिंजरीच कुकू । पैशाला धडाधडा
लेकी–सुनानी भरला वाडा
लाल पिंजरीच कुकू । माझ्या कपाळी रंगल
फूल जाईच चांगल

## लुगडं घेतलं

लुगड घेतल । दोन्ही पदर झुरमुळचाचे
चार्टा मैतर करमाळचाचे

लुगड घेतल । दोन्ही नदर सारख
बापलेकाची पारख
लुगड घेतल । गंगासागर पिवळी घडी
पुन सातार गंगथडी
लुगड घेतल । दोन्ही पदर आदी वगा
शहान्या माझ्याला व्हईल दगा
लुगड घेतल । बघते दिव्याज्योती
याला गुजरा मोर किती
लुगड घतल । पदराला राघू मैना
चाटयासंग भाऊपना
लुगड घेतल । साडेसाताची मिरानी
भाऊभाच्यानी माझ्या । साटया घातली मव्हनी
लुगड घेतल । पदर नारळी
सारी धुंडिली परळी
लुगड घेतल । पदराला गोमवाटी
पुढी वकील माग चाटी
लुगड घेतल । साडीसाताची उदी
इसाराला दिली मुदी
लुगड घेतल । पदरावरी मासा
मोल बंधूला पुसा
लुगड घेतल । जरी काडया काडया
गेले होते राजवाडया
लुगड घेतल । हौसीदारान सज
पाटीला झाल वज । जरीच्या पदराच

लुगड घेतल । नाही मदी सूतकाडी
लुगड दाखविते चडावडी
लुगड घेतल । पदर लई मऊ
सार धुंडिल धाराशिवू
लुगड घेतल । दावीती ज्याला त्याला.
बाजार अंजनीन केला

## हौस

हौस मला मोठी । तुळजापुरच्या बाजाराची
तिथ वाणीन उदाराची
हौस मला मोठी । बंधुसगट बजाराची
कंठी मोडावी हजारांची । बहिनीच्या चोळीसटी
हौस मला मोठी । तदुळच्या लिंबुळीची
माझ्या वंदवान । बोली केली दिवाळीची
हौस मला मोठी । बंदु इव्हाई करायाची
सिता मालन पहायाची । याची करनी घ्यायाची
हौस मला मोठी । बंधूच्या बाळाची
कुंची निऱ्याच्या घोळाची
हौस मला मोठी । बंधूला ल्योक व्हावा
भाचा मुराळी मला यावा

× × × ×

हौस मला मोठी । चार बैलाच्या जिवावरी
आंबा जांभळ धावावरी
हौस मला मोठी । कमानी दरवाजाची
जोडी लमानी बईलाची

हाऊस मला मोठी । मागल्या गोटाची
चांदी मव्हळ पेटाची

माझ्या मनीची हौस । सांगन बाजाराच्या वाट
चोळी हिरकणी जरी कांठ

हाऊस मला मोठी । तांबड्या लुगड्याची
झुब्यासंगट बुगड्याची

हाऊस मला मोठी । तांबड्या लुगड्याची
रांड वालट गंधर्वाची

× × × ×

हौस मला मोठी । दीराभाव्यांत नांदायाची
जोड–पाळने बांधायाची

हौस मला मोठी । दानें मुठीन नासाव
बाळ वसरी असाव

हौस मला मोठी । गाठीला झुब लावा
मोती खंडाया दोगी जावा

हौस मला मोठी । मोत्याच्या जानव्याची
घरी मुंज तान्ह्याची

हौस मला मोठी । सोन्याच्या वाक्याची
लहान नवरी सख्याची

हौस मला मोठी । लेकी द्याव्या शहरामंधी
गिरनीच पीठ घरामंधी । पान्याचा नळ दारामंदी

हौस मला मोठी । तुझ्या गव्हारिपनाची
चोळी अंजीरी खनाची

## पाऊस

पावसाची वाट । बघती भले भले
मेघराजयानी । गगनी डेरे देले
पाऊस नवरा । ईजबाई करवली
शिवच्या शेतावरी । राती वरात मिरवली
पड पड मेघराजा । ईज मारिती चाबूक
स्वारी निघाली नाजूक
पाऊस पडतो । भिजू द्या काळी माती
देवास भल बोलती । गाई चाऱ्याला लागती
पाऊस पडतो । करू नका गाजावाजा
वर्सभिरा आला राजा । धरनीबाई पति तुझा
पड पड मेघराजा । गाईच्या चाऱ्यापायी
दुनयामंदी पाप लई
पड पड मेघराजा । नको बघू ताला माला
धरनी मनी पति आला
पावसा फळी। धरीली सुर्व्या तळी
गुलाब माझा बाळ । बैल येठन गोळा करी
पाऊस पडतो । गर्जून पडशील किती
राजस माझ्या बांधवाचे । अर्जुनाचे बैल शेती
आताच्या यौगामंदी । दुनया निघाली उफराटी
वर्सतो मेघराज । गाईच्या चाऱ्यासटी
सम्रताच्या घरी । दुबळ जाया लाज
वर्सले मेघराज । पानी पन्हायी रान वाज
पयल्या पायरीस । मेघराजा आगळा
धर्तरी मातवरी । सोडी पान्याच्या सागळा

× × × ×

सुताराच्या नेहावरी । बेर न्हेल उडिदाच
पानी पडल मिरगाच
पाऊस-पान्याच । आभाळ उटयल
तिपनी उचलाया । बाळ कुनब्याच नटल
पाऊस पडला । गर्जू गर्जू ग राती
माझ्या सख्याची बैल शेती
पाऊस पडला । गर्जू गर्जू कोकनी
उब्या राहील्या तिपनी
पाऊस पडला । पडून बर झाल
नदी नाल्याला पानी आल
पाऊस-पान्याच । आभाळ कालवल
नंदी तासाला पानी पेल
बर्सला मेघराजा । आबादानी केला
माझ्या गंगाधर हरीचा । नंदी तासाला पानी पेला
बर्सला मेघराजा । मिर्गाचा येक
आर्दड्याबाईच । पानी पडत सोभाईक
असा हस्ताचा पाऊस । कुठ आहे ग कुठ नाही
दैवी लागल घ्याव बाई
वर्सला मेघराजा । प्रिथ्वीचा काला झाला
गाई कसाबाला दिल्या । बेपार बाम्हनान केला
पावसा पान्याच । आभाळ काळकोट
धरनी नेसली हिरवा जोट
पाऊस पडतो । बाळाच्या शिवारात
गल्ला मावना अंबारात । राजस बंधवाचा

संबूदेवाचे सोमवार । अंबाबाईचे मंगळवार
मेघराज बोलत्यात । सर्वा खुशाली माझ्यावर

## तिफणी बाई

सुताराच घर । तिफनीबाईच माहेर
झाले मुराळी तय्यार
चंदनाचा टिळा । सुताराच्या बाळा
तिपनी गेल्या कोन्या माळा । बाळ हरीच्या माझ्या
तिपनीबाईची । चाडदोर सैल
सिग्रासारीखे बैल
तिपनीबाईची । चाडदोर सैल
घरच्या गाईचे बैल
तिपनीबाईची । चाडदोर हालत्याती
नंदी झोकात चालत्याती
तिपनीबाईची । चांदीची तिची वाटी
रान पेरीतो दोन्ही मुठी
तिपनीबाईची । वटी धोतराची
रान पेरीती मैतराची
चिवच्या शेतामंदी । तिपन जवसाची
माग रासन नवसाची

× × × ×

तिपनीबाईच । तिपड तीन नळ
पेरन्याला चवर ढळ
तिपनीबाईच । चाडदोर सैलावल
पेरनार नानावल

तिपनीबाईन । घेतला उबा माळ
माझा रासन्या ताना बाळ
तिपनीबाईच । तास रुंदावल
रासन्याला जड गेल
तिपनीबाईन । तीन मनाचा पेरा केला
माझा रासन्या कोमेजला
तिपनीबाईच । चाडदोर रेसमाच
तोंड सुकत रासन्याच
तिपनीबाईच । नंदी म्हागारी बगत्यात
धन्या इसावा मागत्यात
तिपनी मायबाई । खिनभर उभ रहाव
रासन्याला येऊ द्याव
तिपनीबाईन । मनाचा पेरा केला
तिन बांधाला डेरा दिला
आभाळ उटयल । तळ धरूनी कोकयनी
उभ्या बांधाला तिपयनी

## पिकलं पिकलं

पिकल पिकल । जन बोलत आगाजा
माझ्या ताईत बंदवाची । शेती मेहनत बगा जा
पिकल पिकल । सख्याची नांगरटी
येक्या औताला बैल किती
पिकल पिकल । हरबऱ्याच पाळ
जोंधळा गेला ताळ

पिकल पिकल । हरवऱ्यान केल पाळ
बनशी गव्हाचा गेला ताळ

पिकल पिकल । आला जोंधळा उसावानी
त्याला सांगत गेल कुणी

पिकल पिकल । पिकली नांगरट
तुरीला सेंगा दाट

पिकल पिकल । सांगवा मला आला
किती खंड्या गल्ला झाला

पिकल पिकल । घरनी झाल वझ
बोळवणीच साल माझ

× × × ×

पिकली पिकयली । सख्याची चुनखडी
आयकू येती भलगडी

पिकल पिकल । जन बोलती चावडी
रास लागली वावडी

पिकल पिकल । जन बोलती येशीत
जोड वावड्या राशीत

पिकल पिकल । हाक गेली दिवानात
कातर घाला लवनात

पिकल पिकल । मसूवाची पटी
हाती शेंदराची वाटी

पिकल पिकल । मसूवाच फड
हाती नारळाच घड

× × × ×

पिकलं पिकली । माझ्या सक्याची मालदांडी
येक्या हेलाला झाली खंडी
पिकल पिकल । माल हेड्याच्या गाड्यावरी
मालधनी घोड्यावरी
पिकल पिकल । लमान घेईनात भाड्या
सोडा नागर जुपा गाड्या
पिकल पिकल । जन बोलत कुठ कुठ
नंदी आलेत गुडघीमेट
पिकल पिकल । काय पिकाची गंमत
गाड्या चालल्या रमत । दिरा माझ्या अंजनाच्या
पिकल पिकल । माझ्या सक्याच उमायट
जमिनी आल्यात घानवट
पिकल पिकल । पिकल्याच नवल काई
नंदी राबलेत बाई

## नांगरट

माझ्या बंदूची नांगरट बैल आठ
सरकी पेरीला, मेथी दाट
उडदामुगाला शेंग लागली व साळ सुखली
सेंगा तुरीला, बोंड आंबाडीला
पीक वरईला, मुगी वरनाला अशी भगर फराळीला
पांदीच्या कडला, हुलगा पेरीला
डब्बल शेंगाचा आधी पेरा केला मग तीळ पेरीला
हरक काढायला गडी लावीला

गहूहरभरा कडीलोट, करडचाच पट, जोंधळचाचा थाट
लाख, वटाणे, मसूर दाट, पुढ तांबट
वाफे बनविले, कांद्या वांग्याली रताळाला, लसूनगाजराला
माझ्या सख्याच सुरू झाल थळ व पिवळाच गुळ
गाडचा गेल्याती लातुराला व सौदा केला हप्ता दिला
दादा गेलेती बाजाराला व चोळी लुगडचाला
डब्बल शेंगावरी घाट वैनीला, गरसुळी मला
कडी तोडी बाळाला व मुदी दादाला
पाडवा झाला, मुराळी आला व सैपाक केला
जेवन्याचा थाट बसाया पाट
भाऊ वहिनीला लावी वाट व सरला शेवट

## सावळी सुरत

सावळचा सुरतीच । लागल मला येड
यव मझ्या गावाकड । भाऊराया माझ्या
सावळी सुरत । जाईन ध्येनातुनी
कवा यईल रानातुनी । राज्यधर बंदु माजा
सावळी सुरत । चालली झोकात
इडा रंगला मुखात
सावळचा तोंडावरी । मुरमाची घाई
अर जानीत आला न्हाई
सावळचा सुरतीवरी । मुरूम पिकला
माझा गुलाब सुकयला
सावळचा तोंडावरी । मुरमाची कनी
जानी दंडली बालपनी

सावळ्या तोंडावरी । मुरुम पाला पाला
जानी दंडली माझ्या लाला
सावळ्या तोंडावृरी । मुरुम घेतो धावा
बाळ राजस ग माझा । भर जानीत आला रावा
सावळ्या सुरतीवरी । मुरमाची दावन
भर जानीचा रावन
सावळ्या तोंडावरी । मुरमान केल घर
सदा आरसा मांडीवर
सावळ्या सुरतीवरी । मुरमाच्या कन्या
जानी दंडती माझ्या वान्या
सावळ्या तोंडावरी । मुरमाची बागशाही
• द्रिष्ट होईल नवल काई

× × × ×

सावळी सुरत । सावळ्या नंदची
दोन्ही भवयाच्या मंदी । कोर लावीतो गंदाची
सांवळी सुरत । देखिली मळ्यात
कंठी रामाच्या गळ्यात
सावळी सुरत । सावळ्या वानाची
कंठी गाळीव सोन्याची । मपल्या बंदवाची
सावळ्या सुरतीचा । किती करू आला माला
हात पुरना लगामाला
सावळी सुरत । असली नाही कुठ
तोंडावरी लिंबू फुट
सावळ्या सुरतीची । माझ्या जिवाला धासत
आला गल्लीन हासत । राज्यधर बंदु माझा

सावळ्या सुरतीची । नार वाड्या येती जाती
माझा ग परानसखा । घरी नाही सांगू किती
सावळ्या सुरतीची । नारीला पडली भूल
रस्त्यानी नाग डुल
सावळ्या सुरतीसटी । नार टाकी हातरून
काया टाकी उतरून
सावळ्या सुरतीसटी । नार लड घळघळा
जल्दी वलांड पानमळा
सावळ्या सुरतीला । नार बगतो खाली वर
घोळ माझा डौलदार । माझ्या वानीच्या वाळाला
सावळ्या सुरतीला । नार बगती हुरहुरा
माझा कवळा राजगिरा । राज्यधर बंदु माजा
सावळ्या सुरतीला । नार बगती सवन्यावाट
चंद्र वाकडा नाही कुठ

## गावा गेलेला आला नाहीं

गावाला बाई गेला । महीना झाला आज
सोन येवढ गेल माझ
गावाला बाई गेला । मला पुसून नाही गेला
सेला खुटीला राहीयेला
गावाला बाई गेला । माझ्या पेटीच कुलूप
ठावा नाही सक्याला । उमरावतीचा मुलूक
गावाला बाई गेला । जीव माझा येड्यावानी
शार दिसत खेड्यावनी
गावाला बाई गेला । माझी सोन्याची सळई
लाग उन्हाची झळई

गावाला गेला बाई । माझ्या बुगडीचा रवा
चैन पडना माझ्या जिवा । सका माझा येईल कव्हा
गावाला गेला बाई । पिरतीची झाली येडी
रंगमहालाला घाली कडी
किती मी वाट पाहू । गावा गेल्या रंगेल्याची
जाई सुकली बंगल्याची
गावाला गेला कोन्या । माझ्या जिवाला घोकनी
बैल गाडीला देखनी
गावाला गेला बाई । माझ्या जिवाचा पोपट
वरी मखमली जाकीट
गावाला गेला मनू । तिकड माझा डोळा
सतीचा पानमळा
गावाला गेला बाई । सखा सुरतीन आगळा
जीव लागला सगळा । सख्याच्या वाटकड
गावाला गेला मनू । माझ्या नतचा गुंडमनी
सुरत सावळी माझ्यावनी
गावाला गेला बाई । माझ्या जीवाला कातयर
आयन्यावरील चित्तअर
गावाला गेला बाई । माझ्या गळ्यातली सरी
कशी कटिली मसाफरी । माझ्या राजम बंधवान
गावाला ग गेला । वाटकड पाहता पाहता
पाती शिनली डोळ्याची । आन वाहिली गळ्याची
सातीच्या सुग्रनी । बसल्या ठायी ठायी
गावाला गेलेला आला नाही

# दुरून वळखितें

दुरून वळखिते । शिराढोणची चिंच
पांडेनीचा वाडा उंच । बहेनाबाईचा
दुरून वळखिते । इटाची बांधअनी
नेनंत्या बाई माझे । वाडा तुझा ग पांडेनी
दुरून वळखिते । कळंब गावीची झाडी
विसाव्याची माझी माडी
दुरून वळखिते । दिंडेगावीचा कळस
उजव्या बाजूला तुळस
दुरून वळखिते । तुळजापुरची वेस
पान्या निघाली राजस
दुरून वळखिते । सोलापुरचा हुडा
झळकला तिचा चुडा
दुरून वळखिते । तीर्थगावीच्या चडावरी
पानी शेंदीती आडावरी
दुरून वळखिते । मसलगावीची विहीर
तिथ नवतीची कोथिंबीर
दुरून वळखिते । अरळी गाव धुंद धुंद
माझी दाळिंब लालबुंद

× × × ×

दुरून वळखिते । छत्रीखाली कोन कोन
मामे भाचे दोघजन । सयाबाईला सांगते
दुरून वळखिते । काळी निळी घोडी
गावाला माझ्या येती । चुलत्या पुतन्याची जोडी

अनुक्रम ........ वि: ........
नामांक ........ नों: दि: ........


दुरून वळखिते । बैलाची शिंगोटी
तिपनी चालल्या उमाटी
दुरून वळखिते । रंग्या इस्वराची चाली
दऊड मुराळ्याची आली
दुरून वळखिते । गाडीची चाकोरी
वैराग गावाचा व्यापारी
दुरून वळखिते । चाल माझ्याची चटपट
कवळी हालती मनगट
दुरून वळखिते । चाल माझ्या चतुराची
आडवी भाल धोतराची । भाऊरायाची माझ्या
दुरून वळखिते । चाली माझ्या पठानाची
माझ्या विठ्ठल हरीची । घुंगर वाजती छाटनाची
दुरून वळखिते । माझ्या सख्याची चालनी
पाहू लागल्या वानिनी

× × × ×

दुरून वळखिते । मसलगावीची पानंद
माझ्या बंदुला देखूनी । झाला जिवाला आनंद
दुरून वळखिते । वाडा कोन्या नायकाचा
विस्तार दोघी वायकाचा
दुरून वळखिते । चिरबंदी वाडा खोल
मधी फैलावला येल
दुरून वळखिते । सोयऱ्याचा तळखडा
जोत्याला पायबंद । शिंगी नागर तुझा वाडा
दुरून वळखिते । बापूजीचा वाडा खोल
माझ्या गवळनीचा बाळ । मधे वाघिनीचा येल

दुरुन वळखिते । माझ्या बापाजीचा बसू
माझ्या गवळनीचा बाळ । कुठ तरी सुखी असू

## पानिवंताच्या बायांनो

पानवंताच्या बायानो । तुमच्या मासुळ्या वाज
याच्या खिल्लारी गाई बुज
पानिवंताच्या बायांनो । पानी घेऊनी वायल्या
हरी नंदाच्या गाई आल्या
पानिवंताच्या बायानो । पान्याचा आला लोट
नंदी दलात हाय मोट
पानवंताच्या बायानो । केली पान्याची सारावरी
नंदी जोरान मोहरी सारी
पानवंताच्या बायानो । पानी भरुन सरका
नंदी गवळ्याचा मारका
पानवंताच्या बायानो । पानी कशान नासल
दल गवळ्याच बसल
पानवंताच्या बायानो । पानी कशान खडुळ
नंदी गेल्याती वाढुळ

× × × ×

पानवंताच्या बायानो । पानी भरूनी डगरीला
चेंडू लागल घागरीला
पानिवंताच्या बायानो । तुमा देते पावली
टोपी कोनाला घावली
पानिवंताच्या बायानो । तुमा देते साखरपुडा
इसरला धोतरजोडा

पानवंताच्या बायानो । सांगा पान्याचा उतार
भिजल कल्यानी धोतर

पानवंताच्या बायानो । नकु करा थटा मस्करी
रावा मर्जीचा पानी भरी

पानवंताच्या बायानो । काय पाहता सुरतीला
पानी घाली मारुतीला । राजस बंदु माजा

पानवंताच्या बायानो । तुमच्या कपाळाला लाली
माझ्या हौशाला कन्या झाली

## उन्हाळ्याचं ऊन्ह

उन्हाळ्याच ऊन । लागत सुताराला
चौरंग तान्हीच्या भ्रताराला

उन्हाळ्याच ऊन । शिराळ पडू देवा
बहीना माझी बाई । माझ्यासटी घेती धावा

उन्हाळ्याच ऊन । लागत मोठ्या लोका
मेन्यावरती पानी सिपा । भाऊरायाच्या माझ्या

उन्हाळ्याच ऊन । लागत माझ्या हिऱ्या
सोड छतरीच्या निऱ्या

उन्हाळ्याच ऊन । चैताची पायपोळ
माझ सुकल जाईफळ

उन्हाळ्याच ऊन । लागत चईताच
तोंड कोमेल ताईताच

उन्हाळ्याच ऊन । लागत दुपारून
शेला देऊ का उपरन

× × × ×

90082

दुरून वळखिते । माझ्या बापाजीचा बसू
माझ्या गवळनीचा बाळ । कुठ तरी सुखी असू

## पानिवंताच्या बायांनो

पानवंताच्या बायानो । तुमच्या मासुळ्या वाज
याच्या खिल्लारी गाई बुज
पानिवंताच्या बायानो । पानी घेऊनी वायल्या
हरी नंदाच्या गाई आल्या
पानिवंताच्या बायानो । पान्याचा आला लोट
नंदी दलात हाय मोट
पानवंताच्या बायानो । केली पान्याची सारावरी
नंदी जोरान मोहरी सारी
पानवंताच्या बायानो । पानी भरून सरका
नंदी गवळ्याचा मारका
पानवंताच्या बायानो । पानी कशान नासल
दल गवळ्याच बसल
पानवंताच्या बायानो । पानी कशान खडुळ
नंदी गेल्याती वाढुळ

× × × ×

पानवंताच्या बायानो । पानी भरूनी डगरीला
चेंडू लागल घागरीला
पानिवंताच्या बायानो । तुमा देते पावली
टोपी कोनाला घावली
पानिवंताच्या बायानो । तुमा देते साखरपुडा
इसरला धोतरजोडा

पानवंताच्या बायानो । सांगा पान्याचा उतार
भिजल कल्यानी धोतर
पानवंताच्या बायानो । नकु करा थटा मस्करी
रावा मर्जीचा पानी भरी
पानवंताच्या बायानो । काय पाहता सुरतीला
पानी घाली मारुतीला । राजस बंदु माजा
पानवंताच्या बायानो । तुमच्या कपाळाला लाली
माझ्या हौशाला कन्या झाली

## उन्हाळ्याचं ऊन्ह

उन्हाळयाच ऊन । लागत सुताराला
चौरंग तान्हीच्या भ्रताराला
उन्हाळयाच ऊन । शिराळ पडू देवा
बहीना माझी बाई । माझ्यासटी घेती धावा
उन्हाळयाच ऊन । लागत मोठ्या लोका
मेन्यावरती पानी सिपा । भाऊरायाच्या माझ्या
उन्हाळयाच ऊन । लागत माझ्या हिऱ्या
सोड छतरीच्या निऱ्या
उन्हाळयाच ऊन । चैताची पायपोळ
माझ सुकल जाईफळ
उन्हाळयाच ऊन । लागत चईताच
तोंड कोमेल ताईताच
उन्हाळयाच ऊन । लागत दुपारून
शेला देऊ [illegible] उपरन

× × × ×

90082

उन्हाळ्याच ऊन । धोंड्याच्या झाल्या लाह्या
शेला पांघर भाऊराया
उन्हाळ्याच ऊन । लागत शेल्यातून
शिंगी काढावी बागातून
उन्हाळ्याच ऊन । लागत चपाचपा
सबर शिंगी देती धापा
उन्हाळ्याच ऊन । सुख शिराळ पडू देवा
माझा सुखवासी गेला गावा
उन्हाळ्याच ऊन । माझ्या सख्याला सोसना
कुठ सावली दिसना । चाफ्या चंदनाची
उन्हाळ्याच ऊन । लागत चपाचपा
आयशा झाडाखाली । उभ्या राहून काय नफा
उन्हाळ्याच ऊन । लागत तुला मला
चाल जाईच्या सावलीला
उन्हाळ्याच ऊन । सखीला येतो राग
दारी फुलाऱ्याची बाग

## झोंबी

गावाच्या खालती । उडती धूळ—माती
पहलवानाची कुस्ती व्हती
झोंबीच्या फडामधी । हलकी वाजती नानापरी
पहलवान माझ्या घरी
कुस्तीच्या फडामधे । हलक्या वाजत्याती दोन
नवा माझा बंधुराया । आला खेड्याचा पइलवान

अट्टीचा पइलवान । मुटीन खातो मेवा
कुस्ती नेमिली कोन्या गावा
झोंबीच्या फडामधे । हलकी वाजती टॉगटांग
पइलवानाला जोडी सांग
झोंबीच्या फडामधे । लिंब नारळ अंडी फोडा
बाळ माझा कुस्तीला सोडा
माझ्या बाळासंग । झोंबी नकु धरू हाळवटा
कळ लावील मनगटा
झोंबी खेळताना । अंगा लागू देईना अंग
कुन्या मावलीचा सांग
झोंबीच्या फडावरी । अंगाची केली मूठ
लागू देली नाही पाठ
झोंबी खेळताना । होते अंगाची कमान
नाही जानीचा गुमान
झोंबीच्या फडामधी । कटीचा गोंडा लोळ
ताशा लावूनी झोंबी खेळ । राज्यधर बंदू माझा

× × × ×

झोंबीच्या फडामधी । कइकाच्या खाली माना
इडा उचल पइलवाना
तुळजापुर येसीला । हलकी वाजती कडाकडा
पइलवानाला जोडी काढा
झोंबीच्या फडावरी । वाजत्यात दंड
माझ्या या बंधवाच । दूध पिलेल तेच पिंड
झोंबीच्या फडामधी । दंड वाजती तोफखाना
कोन्या मावलीचा तान्हा

झोंबीच्या फडामध्ये । पइलवान गरजतो
तांब्या दुधाचा इरजतो
झोंबीच्या फडामधी । हलकी वाजती घाईघाई
पइलवानाला जोड नाही
कुस्तीच्या फडात । पइलवान देखना
पडदे सोडिले दुकाना
सिपळगावीच्या येशीमोर । हातरील ज्यान
पट्टा खेळ पइलवान
सिपळगावीच्या येशीमोर । पइलवानाचा आकडा
जोड न्हाई याला । गेला सिवनी वाकडा

## घाटावरला गाडीवान

पहाटच्या पाऱ्यामंदी । कोन बाजिंदी गीत गाती
गाडी बैलाला जड जाती
गाडीच्या गाडीवाना । तुझी गाडी लसनाची
वाट चुकली ठेसनाची
गाडीच्या गाडीवाना । गाडी लागली उताराला
नार धरिती धोतराला
गाडीच्या गाडीवाना । गाडी लागली वरंगळी
नार धरिती करंगुळी
गाडीच्या गाडीवाना । तुझ्या गाडीला नव्या कुरळ्या
नवरा सोडून झाल्या मुरळ्या
गाडीच्या गाडीवाना । तुझ्या गाडीला हिरवा रंग
नारी बघूनी झाल्या दंग

× × × ×

गाडीच्या गाडीवाना । तुझ्या गाडीला नवा नाडा
यवढा वलंड वढा
गाडीच्या गाडीवाना । गाडी लागली चढनीला
उदी रुमाल भडकला
गाडीच्या गाडीवाना । घडी गाडी सागवानी
नंदी गाडीला वागावानी
गाडीच्या गाडीवाना । तुझी खोंड हुलवान
भरल्या गाडीला देत्याती मान
गाडीच्या गाडीवाना । तुझ्या गाडीला नवा आक
हिरव्या शालून बैल झांक

× × × ×

गाडीच्या गाडीवाना । तुझ्या गाडीला कवळी खोंड
त्याला लावावी सरकी पेंड
गाडीच्या गाडीवाना । तुझ्या गाडीला नवी खीळ
येका खेपला गेला ईळ
गाडीच्या गाडीवाना । बैल गाडीला नाजूक
केला फुलाचा चाबूक
गाडीच्या गाडीवाना । गाडी लाविली ओढावरी
टाक चाबूक बैलावरी
गाडीच्या बयलाला । उसाची वयरन
घाटावरला गाडीवान

## गवळी माझा गोरा चांद

सोन्याची म्होरकी । मशीबाई मालनीला
गवळ्याच्या दावनीला । बाळ हरीच्या माझ्या

उन्हाळचा पावसाळयाचा । मशीखाली रेंदा
याला दंडतो गवळी धंदा

खांद्यावरी शेला । मशी घालवीत गेला
गवळी माझा द्रिष्टावला

गवळयाच्या मशी । आलनी मालनी
खाली बघून चालनी । बाळहरीची माझ्या

गवळयाच्या मशी । खेटत्याती चंदन
गवळी माझा ग नादान

गवळयाच्या मशी । गवळयाच्या महाग
गवळी माझा रान बघ

गवळयाच्या मशी । उभा बांध चरत्याता
म्हलप देत चालत्याता

म्हशीबाई गुजरीन । पाचारिला माळ
संग गवळयाचा बाळ

उगवला नारायन । गाईच्या वाडयावरी
गवळी माझा धार काढी

गाईच्या काढी धारा । म्हशीबाईला पान्हा दाट
माझ्या गवळयाची कवळी बोट

गवळयाच्या म्हशी । खात्याता वटाना
धार रेटता रेटना

गवळयाच्या मशी । खात्याती उभा बांध
गवळी माझा गोरा चाद

## माझी महेताप गवळन

गाईच्या कोठ्यामधी । लवंडल दुधायन
सून गवळ्याची नादान
घुसळन घुसळिती । रवी वालडी तोलना
गवळन घामेली बोलना
गुसळन गुसळिती । रई बारडीला गोंड
गवळन माझीला राज दंड
गुसळत घातिल । जोत्याच्या तळखडी
गवळन जोमान रई वहडी
गसळत गुसळिती । रई बालडीचा नाद नवा
गवळन पावनी आली कवा
गुसळन गुसळिती । येक्या फेऱ्यामंदी लोनी
गवळनीची भर जानी
मशीच्या तुपाला । गाईची मिळवन
माझी मह्यताप गवळन

## देवशिंगची देवता

देवशिंग हें गांव तुळजापुर तालुक्यांत आहे. तेथील मराठी जातीची ही स्त्री आहे. हिनें आपल्या जीवनांतील विविध प्रसंग गायिले आहेत. हिची वाणी उक्तिवैचित्र्यानें नटली आहे. हिच्या भावेंत कस आणि ओंवींत भरपूर रस आहे.

पहिली माझी वई । यशीच्या रुशीला
आंजनबाईच्या कुशीला । मारुती जलमला

देवशिंग गाव । गाव जहागीर
नित घोडेला खोगीर । ब्रम्हचारी देवाच्या

देवा माझ्या मारोतीच । लिशान मोतीचूर
नवल करीती वाटसर । देवाच्या सतवाला

वाटचा वाटसर । नवल करीतो जिवाला
मोटा रहिवास गावाला

लक्ष लाभ झाला । पान्याला जाता जाता
मानिकचौकात उभा व्हता । ब्रम्हचारी माझा देव

× × × ×

सकाळच्या पहारा । बहु आनंदाचा
साधूसंताचे सेजार । तुळसीखाली गोइंदाचा

गावाच्या खाल्त । कशाची धुनी
सुर्वेनारायेन । राजा निघाला आनवानी

गावाच्या खाल्त । कशाची आगीन
सुर्वेनारायेन । राजा निघाला नगीन

दिवस उगवला । कुन्या मावलीचा पूत
लाविली चंद्रजोत । नवलाख दुनयेंत

दिवस उगवला । कोथिंबिरी त्याचा वान
नव लाखाची पासोडी । पांघरला भगवान

दिवस उगवला । सेंदराची पुडी
न्हान थोरांना । आवुक मागते वाडीदिडी

× × × ×

देवशिग गावीच्या पारावर । सभा बसली नहानथोर
सयाना सांगते । उच मंदिल माझा दीर
देवशिग गावीच्या पारावर । आधी सारा देतय कोन
बोल पाटील कुळकर्णी । भाव्या माझ्या संब्रताचा
रहिताचा हातगुन
देवशिंग गावच्या पारावरी । गोंधन मावली
शहान्या रह्यतान लावली । माझ्या कुळकर्नी बांधवाला
सारा घेताना सावली
कोतवालापक्षा । माली जोरावरी
रहित बोलत्याती । शाहू माज्या कुळकर्नी बंदवाला
टाका रजया पारावरी
देवशिग गावच्या पारावरी । धोंडा कशान झिजला
माझ्या कुळकर्नी बांधवान । सारा सरकारी मेजिला

× × × ×

माझी जातकुळ । मामा पंडिताला पुसा
मावली माझी बाई । साकर जन्मली पुंड्या उसा
माझी जातकुळ । कोन पुसतो राजी
तिच्या पोटीचा माझा दाजी
माझी जातकुळ । कोन पुसतो रावन
उच्च कुळीचा ब्राम्हन
माझी जातकुळ । कोन पुसतो गन्या
चुलत्या माझ्या रावनाच्या । माझ्या वाघाच्या जाळ्या जुन्या

× × × ×

देवशिंग गाव । गाव जहागीर
नित घोडीला खोगीर । ब्रम्हचारी देवाच्या

देवा माझ्या मारोतीच । लिशान मोतीचूर
नवल करीती वाटसर । देवाच्या सतवाला

वाटचा वाटसर । नवल करीतो जिवाला
मोटा रहिवास गावाला

लक्ष लाभ झाला । पान्याला जाता जाता
मानिकचौकात उभा व्हता । ब्रम्हचारी माझा देव

× × × ×

सकाळच्या पहारा । बहु आनंदाचा
साधूसंताचे सेजार । तुळसीखाली गोइदाचा

गावाच्या खाल्त । कशाची धुनी
सुर्वेनारायेन । राजा निघाला आनवानी

गावाच्या खाल्त । कशाची आगीन
सुर्वेनारायेन । राजा निघाला नगीन

दिवस उगवला । कुन्या मावलीचा पूत
लाविली चंद्रजोत । नवलाख दुनयेत

दिवस उगवला । कोथिंबिरी त्याचा वान
नव लाखाची पासोडी । पांघरला भगवान

दिवस उगवला । सेंदराची पुडी
नहान थोरांना । आवुक मागते वाडीदिडी

× × × ×

देवशिंग गावीच्या पारावर । सभा बसली न्हानथोर
सयाना सांगते । उच मंदिल माझा दीर
देवशिंग गावीच्या पारावर । आधी सारा देतय कोन
बोल पाटील कुळकर्णी । भाव्या माझ्या संबताचा
रहिताचा हातगुन
देवशिंग गावच्या पारावरी । गोंधन मावली
शहान्या रह्यतान लावली । माझ्या कुळकर्नी बांधवाला
सारा घेताना सावली
कोतवालीपक्षा । माली जोरावरी
रहित बोलत्याती । शाहू माज्या कुळकर्नी बंदवाला
टाका रजया पारावरी
देवशिंग गावच्या पारावरी । धोंडा कशान झिजला
माझ्या कुळकर्नी बांधवान । सारा सरकारी मेजिला

× × × ×

माझी जातकुळ । मामा पंडिताला पुसा
मावली माझी बाई । साकर जन्मली पुंड्या उसा
माझी जातकुळ । कोन पुसतो राजी
तिच्या पोटीचा माझा दाजी
माझी जातकुळ । कोन पुसतो रावन
उच्च कुळीचा ब्राम्हन
माझी जातकुळ । कोन पुसतो गन्या
चुलत्या माझ्या रावनाच्या । माझ्या बाघाच्या जाळचा जुन्या

× × × ×

रस्त्यानं चालताना । खाली बघून चालू किती
चुलत्या माझ्या बाप्पाजीला । सभा तुम्हाला नवाजिती
रस्त्यान चालताना । हालना माझी निरी
जाधव रायानो माझ्या । वसा सभला बिनघोरी
रस्त्यान चालताना । खाली बघून अंगुठ्याला
माझ्या बाप्पाजी रायाच्या । रंग चढतो पागुट्याला

× × × ×

तरन्या पनामधी । सव्साराची घाई
माय ग बापाची । काटा मोडला झाली सयी
शेरभर सोन । बांधिल पदरात
मिळतात मायबाप । येड हींड बजारात
हिवाळ्या जिव्हाळ्याच । अंतरी करा शोध
माय ग बापाशिवी । दह्याच व्हइना दूध
जिवाला हुरहुरू । वाटत शेजीबाई
मामा उमराव माझा । झाल लई दी आला न्हाई
भाचा मुराळी आला । नशीब माझं थोर
माझा भास्करराव बोल । आत्या माहेराला चला
भाचा मुराळी आला । नशीव माझ मोट
माझा भगवान बोलतो । आत्या नंदी बांधू कुठ
काशी ग मुन काशी । काशीचा दूर पल्ला
बाई माझ्या माहेराला । रामेसराला चल्ला
काशी ग मुन काशी । कुनी ग पाहिली
माझ्या मावल्याबाईन । दुनया मजला दावली
मावलीची मया । कथलाच पानी
सर्व बाळासटी । घिरट्या घालिती घारीवानी

अनुक्रम २७१८५.... वि: ८१६१८५....
क्रमांक ....१२८५.... नों: दि: ....५१२....


काळी ग कासाई । सना-सुदीला नेसावी
मावली माझी बाई । जडभारीला असावी
शीतळ सावली । कोनत्या झाडाची
माझ्या बाप्पाजीरायाची । माज्या पारंब्या वडाची
माझा अंगलोट । माज्या पित्याच्या मासाचा
मह्या बाईच्या सायासाचा । शिरी बुचडा केसाचा
माझा अंगलोट । मज्या ग भावावनी
मह्या गवळनीच । येक्या झऱ्याच पेल पानी
आपल्या मावलीचा पान्हा । साकरचा डोना
माझ्या नेनंत्या बंधु । वाटून घ्याव सरावना
आपल्या मावलीचा पान्हा । साकराचा पाक
मज्या नेनंत्या बंधु । आपन पेला सावकास
देवशिंग गावीची वाट । बाई दिसती सोन्यावनी
नेनंता माजा बंदू । हाती रुमाल वाऱ्यावनी
माज्या बाप्पीजीच्या शेती । दावन रेसमाची
मज्या ग बंदवाची । धनरेच नशिबाची
लेन्या ग नेसन्याचा । नाही मजला दुकुळ
मज्या ग बंदवाच्या । पानी हौदाला बकळ
सया मला पुसत्यात्या । तुला भाऊ भाचे किती
सिता मालन्या पाय धुती । वाटला गंगा वाहती
सया मला पुसतेत्या । तुला भाऊ भाचे किती
जाधव रायाचा इलाना । येक्या खेड्याची वस्ती
यकाहून चड येक । चुलत्या बाप्पाजीची लेक
जाधवरायाची माज्या । धर्ती रुमालाची येक

थोरल्या वाड्यात । कशी जाऊ यकायेकी
भाऊभाच्याच्या माज्या । बाप लेकाच्या पंगती

थोरल्या वाड्यात । मोत्याचा पाऊस
माझ्या इठ्ठल मांगाला । याला पुत्राची हाऊस

राजवरकी बिल्वर । भर म्हनीते कसाराला
माज्या ग बंदवान । दिला मंदिल इसाराला

मनामधे सन । दिवाळी मालन
मज्या बंधूच्या लुगड्यान । भडक्या मारीती वळन

हिरवी काकन । हातात लेले व्हते
बाई माझ्या माहेराला । रामेसराला गेले व्हते

भाजीमंदी भाजी । इकती माटची
वहीनाबाई माझी । आली वार्नीन पेटची

तुगाव गावीच्या वाटनी । बंदु डिगांबर बिगीबिगी
वहिना माझी बाई । राळ चमकती जागोजागी

लिंबुळी डोरलं । गळा दिसतो वागशाही
मज्या वह्यनाबाईच्या । कंत तोंडाकड पाही

लिंबुळी डोरल । सरमन्याला ववनी
मज्या बह्यनाबाईला । दंग झाल्या कळवातिनी

गेजीन केल्या वड्या । मह्या सखीन केलं वांग
वहीन माझे बाई । मसाल्याच नाव सांग

थोरल्या घरची सून । हांड्याभांड्यात रावती
' बहीन माझी बाई । तळखड्याला रंग देती

मोळा ग सतरा । म्हेवन्या सावल्याच्या गाई
धारा काढाला बसली । गवळन माझी बह्यनाबाई

दहीं दूध घ्या । गौळण आलीया खेड्याची
वहीना माझी बाई । चंद्रावळीच्या ताड्याची
पोटीच्या वाळासटी । धोंडा पुजिला माळाचा
माझ्या बहीनाबाईईला । छंद राघोबा बाळाचा
माझ्या बहिनीचा बाळ । मला मनीत मावशी
देवदास हरी माझा । फूल जाईच सुवासी
मावशी मनूनी । धरीती निऱ्या घोळ
माझ्या बहिनाईची मैना । मज्या रात्रीची चंद्रावळ
थोरल्या घरची सून । लव्हाळ्यावानी लव
बहिनाईच्या हरनीला । इला पडून गेली सव
जिचा भ्रतार गुनाचा । तिचा सव्सार सोयीचा
शालूसंग सकलातीचा । जुवा बसला दोहीचा

× × × ×

पहिली माझी ववी । जात्या आरताला
आंघोळ्या केल्या बाई । चंद्रभागा तीरथाला
जात्या ईस्वरा । नको जाऊ मला दंड
मावलीन वागविला । सुकवासी माझा पिंड
थोरल्या जात्याला । वडनी लाविली
मज्या मावलीची । करनी दुधाची दाविली
जात वडिताना । संगती घालीना वज्र
मावले माझे बाई । हाये इमानी दूध तुझ
जात वडिताना । दोन्हीं हातानी सारख
मज्या वयाच्या दुधाची । केली सयानी पारख

जात्याची भिगुरटी । घागर चेंडूफळी
मझ्या मावलीच दूध । तळहाताच्या कळी
अग तू नवतीचे नारी । तुझी नवती लसुलशी
आपल्या मावलीच दूध । चल वघू जात्यापशी
अग तू नवतीचे नारी । तुझी नवती खुलली
थोरल्या जात्याला । नार माहगारी सरली

× × × ×

पहिली माझी वई । माझी गाते मी देवाला
कुकाच्या ग धन्याला
भ्रताराच राज्य । काचाचा वंगला
पुत्राच्या राज्यी । वारा धुंदुक लागला
मज्या आंगनात । साळीदाळीचा पसारा
मज्या चुडयाच राज्य । अस चालीव ईसोरा
सयाला सांगते । मज्या चुडयाचा रंग न्यारा
नंद वानीन माजी । काढी पदर घाली वारा.

× × × ×

उज्याड पडला । चांदापक्षा चांदनीचा
नंद मज्या वानिनीचा । चुडयामागील कंगनीचा
हात भरला काकनान । चुडा लेते दाटनीचा
नंद माज्या गुजरीचा । मला रहिवास पाटलीचा
माज्या घराला पाव्हनी । बारुळ गावची पाटलीन
नंद माज्या शावाईच्या । संग किती रहाटे जन
माज्या घराला पावनी । बारुळगावची देसाईन
हरनीच्या अंगावरल्या पोशाकाची । अंगनी पडली रसन

काशीच्या वैराळाला । सिद्धा तांदळाचा देऊ
जावानंदानो माज्या । देवादारीचा चुडा लेवू
चांदीच्या करंड्यात । कुकू आपन जावा लेवू
नंद माझ्या शावाईला । मान पावनीला देवू
कुकाचा करुंडा । सासू पुसती सुना
जावा मज्या मालनीनो । तुम्हायवढ राज्य कुना

× × × ×

हातात कडी तोडी । सरपाळश्या नागमोडी
भुजंग माझा हरी । माझा खेड्याचा मारवाडी
आगाशीचा चंद्र । थांबला दारापशी
माझा राघोबा वधन्यासठी
माळ्याच्या मळ्यामंदी । ऊस बाई ग कवळा
द्रिष्ट ग लागली । माझ्या हरीच्या जावळा

× × × ×

सोन्याच मुंडवळ । ठेवीते कापसात
नवरा व्हयाचा वैशाखात
माझ्या घरी कारन । जावा माझ्या सुगरनी
दीरा गुलाबा बोलते । नंदा आनाव्या वऱ्हाडिनी
लगीनपत्रिका । धाडिते लिहून
भाऊ भाचे माझे । आले कळवात घेऊन
हरि माझा नवरा झाला । गावोगावी मुक्काम
दिरा माझ्या गुलाबाच्या । संग दारूच दुकान
हरि माझा नवरा झाला । जायाचा शेजेगावा
द्रिष्ट व्हईल काळ लावा । कटारीला लिंबू खवा

बाशिंगाला तुरा । कोन खवीती हावशी
माझ्या आनवाळ हरीची । नवरदेवाची मावशी

बाशिंगाला तुरा । कोन खवीती गवळन
माझ्या अनवाळ हरीची । नवऱ्या राघूची मावळन

हरि माझा नवरा झाला । मारुतीच्या पारावरी
मामा झिनकाऱ्याच्या घरी । बंगाळ्याच मालकरी

शेवंतीच्या मंदिलाचा । रंग पिवळा सावळा
माझ्या श्रीधर हरीचा । पाठीमाग मावळा

मांडवाच्या दारी । वाजंत्र्याची घाई
पारू माज्या हारनीचा । आजून शिनगार झाला न्हाई

मांडवाच्या दारी । दुरडी पानाची
माज्या शिरिधर हारीची । आत बलावा मानाची

मांडवाच्या दारी । बामन करीतो सामधाम
शिरिधर हरी माझा । नवरी जिंतीतो राजेराम

गाड्यान रुकवत । नका लावू कुनी हात
माज्या भुजंग हारीची । याची येऊ द्या आत

गाड्यान रुकवत । जावा नंदाची माझ्या न्याहरी
सीता माजे मालन्यानो । तुम्हा सांगत व्हते तरी

रुसली वरमाई । खीर खाईन कोरडी
माज्या बंदवानो । गाय बांधावी बिऱ्हाडी

मांडवाच्या दारी । आयाराची सोळा ताट
जाऊ मालन माझी बाई । माझी मानाची आधी उठ

मांडवाच्या दारी । रुसली माझी जाऊ
हाती पातळाची घडी । समजावितो माझा भाऊ

नवकीच पातळ । जाऊबाईचा रुसवा
गुना माज्या हारनीला । लेकी रंबला नेसवा

मांडवाच्या दारी । वुडता आयार कुनाचा
माज्या नेनंत्या बंदवाचा । जलसा जाधवरावाचा

वाजंत्री वाजत्याती । वाजूद्या भिर भिर
आबय वानीन माझी बाई । माझ नेसती आजीचीर

हारी माजा नवरा झाला । वरातीला झोपी जातो
माज्या शिरिधर हारीचा । मामा मंदील आवरितो

हारी माजा नवरा झाला । देवशिंग गावी परांतीला
दिरा माझ्या गुलाबान । बँड लाविला वरातीला

आपन जावा नंदा । वसरीवरी उब्या न्हावू
माज्या शिरधर हारीची । आली वरात नवरी पाव्हू

× × × ×

मागन आल मन । मागन्याची चडावडी
भाची साळाई माझी बाई । नवरी बेगडाची घडी

लग्नाचा सामा । आपाबाईनी केला
सुद्धाकर माझा हारी । मूळ मावशीला गेला

लग्नाचा सामा । करा नगरीच्या नारी
बारकुल माझी बाई । मैना जायाची परघरी

लगीन उतरल । आंबा सोडून वावरी
सौमिता माझी बाई । लई गोताची नवरी

कमल नागरचा वर । येसीत माईना
दादू इठ्ठल बोलतो । लई दिसती सईना

लग्नाची लगनचिठ्ठी । बाम्हन वाचीतो पेडला
नागर माझी बाई । नवरी मामाच्या कडला

मांडवाच्या दारी । बाम्हन बोलतो मंगळमूर्ती
झाला जल्माचा सोबती । नागर माझे बाई

आपन जावानंदा । वडाखाली उब्या ऱ्हावू
राऊ माझ्या हारनीला । आईक लेकी पारवती
राजसला वाट लावू

लग्नाची लगनचिठ्ठी । सोयीच्या सोयऱ्याला
नेनंत्या माझ्या बंधू । मूळ धाडून न्याव मला

लग्नाची लगनचिठी । ठेवीते शिक्याठायी
चुलत्या बाप्पाजीच्या बाळा । मुळावाचून येन ऱ्हाई

लग्नाची लगनचिठी । ठेवीली बानवसी
भाच्या माझ्या राघोवाच्या । येईन तुमच्या
हळदी दिवशी

काजळ कुखूलेली । बामनगल्ली गेली
नागर माझ्या सुंदरला । हिच्या जोमाला द्रिष्ट झाली

उज्याड पडला । माळवदाच्या आकनी
कलू हरनी माझीबाई । कंतापरीस देखनी

हिरव्या चोळीला । रुपाया देन आल
कलू माझ्या हारनीला । राजसला नहान आल

सुबाई संतूबाई । कर इच्यार मनाला
सख्या बाईईच्या मज्या । झाल लई दी नहानाला

आंब्याच्या दिसात । चिचबाईला चिचुन्या
सक्या बाईच्या माज्या । आल्या गर्भाच्या बातम्या

गर्भीन न्हारीला । कांत पुसतो चोरून
दिल नारळ कोरून । मधी साकर भरून
गर्भीन नारीला । उन्हाळा धगमग
हौशा कांतान लावीली । दारी केवड्याची बाग
चइत्तर महिन्यामधी । चैतर पालवी फुटली
सख्या बाईला माझ्या । झोप गर्भाची सुटली
हिरव्या चोळीला । रुपाया सारीला
सख्या बाईला माझ्या । चोळी गर्भीन नारीला
हिरव्या चोळीवरी । पिवळ शिवन
माझ्या तेजाब बाईला । जात ढवाळ जेवन
ढवाळ जेवनाचा । सामा होतो माझ्या घरी
माझ्या वजूबाईईच्या । पातळ नहानाच अंगावरी
हिरव्या चोळींवर । मोर काढून पाहीला
माझ्या तेजाब बाईला । गर्भ पुत्राचा राहिला

× × × ×

आयव मरन । भ्रताराच्या आधी
जाईजुईची फुल । हळदी कुखाचा भडिमार
उधळित्याती रासबिदी
आयव मरन । चांगल्या दिसात
जाईजुईचा हारतुरा । हळदीकुखाची पुडी
साडीचोळीची घडी । भावाच्या हातात
आयव मरन । सोमवारीच्या रातीच
माझ्या सखीला रुजू झाल । पानी कंताच्या हातीच

आयव मरनाची । मजला हाये गोडी
माय मावशी माझी । देवसभला फुल तोडी

आयव मरनाचा । नगारा ठोकीला
माय माझ्या मावशीन । डाव गिरजान जितीला

आयव मरनाचा । सरगी गेला धूर
माय माझे मावशीबाई । तिथ मला जागा धर

आयव मरनाची । माझ्या माहेरी हाये चाल
माय माझ्या मावशी । देवसभला दिल पाल

आयव मरन । असल्या पुरवीत
भाऊ भाचे माझे । खांदेकरी गिरदावीत

× × × ×

सवासिनी सांगू गेले । मिळना त्या खेड्यापाड्या
माझ्या ग बंदवाच्या । कुंकू वाडीते राजवाड्या

सवासिनी सांगू गेले । जाधवरायाचा इलाना
आयलू माझे बाई । तुझ्या वटीला घे पुड
कुंकू करुंड पुरना

सवासिनी सांगू गेले । जाधवरावाच्या बाराजनी
आयलू सखीबाई । त्यात माझी हिरकनी

सवासिनी सांगू गेले । जाधवरायाच्या पार राती
भाऊ भाच्यानी माझ्या । दिला खंदील कोळ्या हाती

सवासिनी सांगू गेले । सीता मालन्या नव्हत्या घरी
माझ्या ग बंदवाच्या । कुंकू शेल्याच्या पदरी

सवासिनी सांगू गेले । थोर लोकाच्या पाहूनी
सीता मालन्या माझ्या । आल्या खंदील लावूनी

× × × ×

घरला पावना । मंगळागिरी रुमालाचा
मज्या गवळनीचा बाळ । पांडव माझ्या धुर्पतीचा
घरला पावना । घडीत करते ताजा
गंगाधर माझ्या हरी । मामा आंघुळीले नेजा
घरला पावना । कोंबडा किशीते
मामा सवयाच्या भोजनाला । मासा भोयाला पुसते
घरला पावना । जेव म्हनता जेवना
त्याच्या हाताला कशी धरू । बंदु न्हव त्यो म्हेवना
घरला पावना । घोंगड्यावरी पान
गंगाधर हरी माझ्या । ज्याचा त्याला द्यावा मान
घोड्यावरल्या पावन्या । संबाळ तुझी वानी
जाधवरायाच्या माझ्या । गाव बंडाच लवनी

× × × ×

गुज बोलायला । गुजाची येळ पाहूनू
बहीनाबाई माझे । नको आवघड उबी राहूनू
दुःख सांगताना । सुखाची हासली
बहीन माझी बाई । चित्त देऊन बसली
सुख सांगताना । दुःखाचा आला लोंडा
बहीन माझी बाई । हात लाविती माझ्या तोंडा
गुज बोलायला । चांदन आल माथा
बहीन माझी बाई । दूर पल्याची हाये राधा

× × × ×

सुख सांगताना । दुःखाचा भर आला
नेनंता माझा बंधू । नेत्राला लावी शेला
चालन जडूजडा । मागील गेले पुढ
नेनंता माझा बंधु । गुतला माझ्या भिड
चालन जडूजडा । मागील माग न्हावू
नेनंत्या माझ्या बंदू । गुज बोलत दोघ जाऊ
चालन जडूजडा । माझ चालन हळू हळू
नेनंत्या माझ्या बंदू । कुठ तरी उन्ह टाळू
अन्तरीच गुज । सांगते माझ्या सख्या
नेनंत्या माझ्या बंधू । चल झाडाखाली येक्या

× × × ×

गावोगावच्या आसाम्या । तुळजापुरी झाल्या खोटया
माझ्या बंदव हारीला । शान्याला आल्या चिठ्या
देवशिंग बाई गाव । तुळजापुरखाली मोड
माज्या ग बंदवाच । याच छत्रीखाली घोड
तुळजापुराला गेला । अंबिकेच्या पाया पड
नेनंता माझा बंधू । कचेरीच जोत चढ
गावोगावच्या कुळकर्ण्याची । घोडी लिंबाच्या झाडाला
माझ्या ग बंदवाची । शिंगी सरकारी खांबाला
देवशिंग गावीच घोड । तुळजापुराचा पार चढ
बोलत्याती तसीलदार । आल आबंड देवशिंगकर
गावीगावीचे पाटील । कचेरीच्या खाली
माझ्या ग बंदवाची । खुर्ची मन्सुबाशेजारी

× × × ×

शालूचा पदर । सोड सोड दासेबाई
माझ्या शिवाजी हरीला । परनारीचा छंद न्हाई
दाशीचा पदुर । लागू देईना अंगाला
माझ्या प्रल्हाद हरीन । केली आंघूळ गंगला
शालूचा पदर । सोड दाशी अमंगळ
माझ्या दादाराव हरीची । घरी रानी चंद्रावळ
घरातली अस्तुरी । तल्वारीच पान
परनारीसाठी । नको घेऊ आडरान
घरातली अस्तुरी । बुगडीच वोंड
परनारीसाठी । का सुकली तुमची तोंड

× × × ×

प्रीतीच्या भाव । कांत म्हनीतो वैनी
राऊ हरनी माझी बाई । पद्मल्या नाथ्याची मेव्हनी
प्रीतीच्या भाव । कांत टाकीतो चूळ
राऊ माझ्या हारनीच । हिच भिजल निऱ्या घोळ
प्रीतीच्या भाव । कांतान दिली पान
राऊ माझ्या हारनीच । हिच रंगल दातवन
तांबड्या पटक्याचा । झाला गळ्हाटा
राऊ हरनी माझी । रानी मेव्हनी करी थटा
लाल पिंजरीच कुखू । करंड्यामधी मोती
राऊ माझ्या हारनीन । इन म्हेवना केला पति

× × × ×

आवुक्ष्याच्या दोऱ्या । माज्यावर फेकिल्या
माज्या अनवाळ हरी । तुम्हावरी म्या झोकील्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम १२३२८०.८४..... दि. ०२.१.९५.....
क्रमांक ......१२८२३....... नों: दि: २९/१२/५८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...... विः ......
क्रमांक ...... नोंः दिः ......

कठीण शब्दांचा अर्थ

# मराठीची माया

अंग–स्वत:
अंजनी–माता
अट्टीचा–अटीतटीनें खेळणारा, पक्का, अट्टल
अवल्या–अवलिया, मुसलमान साधु
असुद–अशुद्ध–रक्त
आगाजा–(आ + गर्ज) आरडा-ओरडा, गाजावाजा
आटनकोट–दाट
आतार–अत्तर विकणारे, कुंकू करणारे व विकणारे
आभंड–आ + भंड–भंडावून सोडणारा, त्रस्त करणारा.
आयार–अर्हणम्–अहेर–आयर–अहेर
आयव–अविधवा–अविड्व–अहेव–सधवा स्त्री
आरत–आर्ती, दुःख, संकट
आरसड्यानं–आडोस्यानें–आडोशानें
आराद–आराध्य–आराधना करण्याचें दैवत
आरादे–आराधे–उपासना करणारे, आरादनी (स्त्री)
आर्दड्याबाई–आर्द्रा नक्षत्र
आला माला–आलय + मालय–सत्कार, लाड
आशील–अस्सल
इलाना–वेल–येल–इलाना–वेलीचा विस्तार, कुटुंब
इसबंद–दृष्ट उतरण्याचें झाड
उगवती–उत् + गुप–उगविणें, उकल करणें
उगानिगा–व्यवस्था ठेवणें
उंड (कानडी)–जेवण, उंडे–लाडू
कणकवर–कन्या + कुमारी
कदरला–त्रस्त झाला (सं.कदर्य)
कल्प–कल्पना, विकल्प, संशय
कळी–चौकोनी पटका, रुमाल
कंगनी–स्त्रियांच्या हातांतील डागिना
काचणी–जाच
कातयर–भय

कातर–कडब्याची सुडी, खळ्या-
भोंवतीं आडव्या गोलं टाक-
लेला कडबा.
कार–एक रानफळ
कारन–कारण–नैमित्तिक समा-
राधना
कारलं–कारल्याच्या आकाराचा
सोन्याचा डागिना
कारला–कांकणाचा एक प्रकार
काला–संकर, भ्रष्टाकार
कासाई–चंद्रकळा, काळ्या रंगाचें
पातळ
कुनबीन– दासी
कुरळी–गाडीच्या पाळण्याच्या
दोन्हीं पाख्यांचे शेवटचे
खुंट
केवळ–कैवल्य–मोक्ष देणारें,
केसायाची–केसाची–उकिरड्या-
वरील
कोरनी–कोर, कांठ
खडुळ–गढूळ–घडूळ–खडूळ
खंडाया–स्कंद्–जोडण्यास, चढ-
विण्यास
खांदीगुंदी–खोदून खोदून विचारणें
खाल्तं–खालच्या बाजूस, पूर्वेकडे
खुतन–गर्भरेशमी व पट्टे असलेलें
कापड

गंधर्वाची–मोहतुराची स्त्री
गरसाळी–गळसरी–स्त्रियांच्या
गळ्यांतील डागिना
गर्ती–गृहस्थी–घरती–गरती–
कुलीन स्त्री
गवणें–गोपन–गोवणें–गुंतविणें
गवरी–गौरी–देवी
गिरदावीत–फिरवीत?
गुजरा–लुगड्याच्या पोतांतील
आडव्या बारीक काड्या
गुंड–खोबळा
गुन्या–गुणवंत
गोंधन– एक झाड
गोमकाठी–कांठाला गोमेच्या
आकाराची वीण
असलेलें
घागऱ्या–घुंगरें
घानवट–गहाणवट, गहाण आलेली
घाया आला–घात–घाय–घायाळ
झाला
घावणें–गवेपणं–गवसणें–गावणें
सांपडणें, शोधणें
घोकती–घोव–घोख–घोक–घोकणें
यानें दृष्ट लागते ही समजूत
चाडदोर–चाड्याला बांधलेली दोरी
चंद्रजोत–हवई
चुनखडी–चुन्याचे खळे असलेलें शेत

छबीना-(शव-रात्र-छबीना रात्री-रक्षणम्)-देवीचा मुखवटा एखाद्या वाहनावर ठेवून रात्रीं काढलेली मिरवणूक

छाटन-कंबरेभोंवतींचें वेष्टन (शाटी,-छाटी)

जकात्या-जकात नाकेदार

जडूजडा-झराझरा (?) जोडीनें?

जानोसा-जन्यावास-लग्नाचें वऱ्हाड उतरलेली जागा

जुवारा-युगुल, सांधा, जोड

जोखणें-युज्-जोक-जोख-तोलणें

जोट-जोगवटा?- उंची वस्त्र, सुती शेला

झळई-मृगजळ-उन्हाची तिरीप

झाज-जहाज

झिनकार-जिनगर नांवाची जात

झुबा-झुबका, घोस

झुरमुळयाचा-झालरीसारख्या कुरळचा असलेला

डोना-द्रोणा

डोरलें-मंगळसूत्र, डोरलीच्या फळासारखा सोन्याचा अलंकार

तळखड़ा-खांबाखालील दगड

ताजी-आदरार्थी मोठा, राजा (मद्रजस्तु भवेत् ताजी)

ताडा-सारखेपणा, तोल, प्रकार

ताप्ता-(तापता कौशेय नामक:) एक कापड

ताफा-नदी तरून जाण्याचें साधन, समूह, विस्तार

तांवडं फुटणं-अरुणोदयीं आकाशांत लाली उत्पन्न होणें

तालामाला-तालेवार, माल्यवंत

तास-नांगर पुढें गेल्यावर मागून भुईत पडणारी खोल रेषा

तोळबंदी-स्त्रियांच्या दंडावरील अलंकार

त्येजे-तेजी-त्यज-त्येजे-घोडा

थेलें-ढेलें-ठेलें-लहान शेत, ठिकें

दाजी-तात-दादा, दादाजी-मेहुणा

दावण-दामन्, दावें-गोठ्यांत बैल जिला बांधतात ती लांब दोरी

दुधायन-दुग्ध+आयनम्-दुधायनं-दुधानें, दूध ठेवण्याचें व तापविण्याचें भांडें

दुल्लड-मध्यें जडावाचें पदक व दोबाजूंस मोत्याचे अनेक सर असलेला डागिना

देऊनी-देऊनं-देऊ नै-देऊं नये

देशावर-देशांतर-देशाऊर-दुसऱ्या देशींचें
दैवर-दहिंवर, दंव
दोडा-दोरा
दोंद-तुंदिल-सुटलेलें पोट, ढेरपोट
दंडणें-दंड:-अभिमानास्पद असणें, शोभणें
धटी-वस्त्र, मोलाचें वस्त्र
धरतरी-धरित्री, भूमि
धावधुडी-धांवत, दौडीनें
धुंदुक-धुनकणारा, सोसाटयाचा
धुरु-ध्रुव भक्त
धुरू-धुर्-अग्रभाग, श्रेष्ट, माता
नक्कल-गंमत, विनोद
नगरबंध-नगरीचे बांधव ?
नवरतन-रत्नामारखी तेजस्वी, सुंदर
नसाणा-माणूमघाण्या
नांगू-हा शब्द नाद (आवाज प्रतिध्वनि) असावा.
नागेली-नागीणरूपी वेल, विड्याच्या पानांची वेल
नालक-नालायक
निरसं-पाणी न मिसळलेलें, अपूट (दूध)
निवद-निवेदनम्-पाक सिद्ध झाल्यावर प्रथम देवाच्या भोजनासाठीं वाढतात तें पात्र, नैवेद्य
पंखा-खांद्याच्या पुढला चोळीचा भाग
परवर-घराची भुई, अंगण
पांगुळ-भिक्षेवर उपजीविका करणारी एक जात
पाटव-पाटाऊ ( चित्रकौशेयम् ) वेलबुट्या, बुंदके असलेलें उंची वस्त्र
पानवंता-पाणोठा
पान्हा लोट-पान्हा सोडी, दयार्द्र होई
पार रात-रात्रीचा पहिला प्रहर
पाल देणें-गोणपोट इ. ची राहुटी ठोकून राहण्यासाठीं जागा करणें
पापान-पापाण-शस्त्रें लावण्याचा दगड, निशाणा
पापाणीं लावणें-कस पाहणें.
पासवा-लुगडें नेसलेला आंतील पदर
पाळ-शेताचा लहान टुकडा, समूह
पिंजर-पिंजर:-तांबुस पिवळा रंग, कुंकू
पेड-रस्ता
पोकणें-पोप-पोख-वाढणें, पुष्ट होणें

क्रमांक ...१३६... नों: दि: ...

पोतारणें–पोतेऱ्यानें सारविणें
प्यार–पार, अंत
फुलवरा–मंडपीवर करंज्या, साटोऱ्या इ. बांधणें
फेराखालीं–सावकाश
बखळ–बहुल ?–पुष्कळ
बगाड–मोटेच्या भऱ्यावरील लांकडाचा सांटा
बंगाळं–भृंगपत्र–अभ्रक
बंड–न ऐकणारे, त्रस्त करणारे
बया–माता
बागशाही–भाग्यशाली?–शोभिवंत
बाजिंदी–छटेल, नखरेल
बानी–बाणा
बाभनमोळा–ब्राह्मणी, पवित्रवागणूक
बारस–द्वादशी
बालट–लबाड, आळ घेणारी, कुभांड रचणारी, शब्द न पाळणारी
बुगडी–स्त्रियांच्या कानांतील डागिना
भकणें–बक्ष्–भक्क–बकणें–वाटेल तसें बोलणें
भंडारा–महाप्रसादाचें जेवण
भरम–भ्रम–संशय
भरूनी–भरू न–भरू ने, नै, नये–भरूं नये
भलगडी–भलरी गाणारे गडी
भवरतगडी–भावार्थगडी–भावार्थ पुरविणारा सखा
भाई–बाही, हात
भाऊपणा–मैत्री
भानवसा–स्वयंपाकघर
भेंडभाजी–भेंड्या, माठ इ. कांहीं विशिष्ट भाज्या आणि बाजरीची भाकर यांचा नैवेद्य. तुळजापुरच्या देवीस हा नैवेद्य दाखविण्याचा मान अजूनहि चालू आहे.
भोगी–देवीची महापूजा
भोजी–भोगी करणारे भक्त
भोरकडी–भोवरकडी, बोरकडी–जोत्याला लावलेली कडी
मंगळागिरि रुमाल–मंगलकारक असा चांगला पटका
मंदील–जरतारी पागोटें
मह्यताप–महताबस्तु चंद्रमा
माघलं–महर्घ–महाग झालें
मान्या–मान्य, मानाचा
मावळा–मातुल–मावळ–मामा
मावळन–मातुलानी, मावळण–मामी
(माअलिआ–मातृष्वास. देशीनाममाला)

मासुळी–बायकांच्या पायाच्या बोटांतील चांदीचा नग

मुडी–दुमतणें, मुडपणें, मोडणें.

मुरूम–तारुण्यांत तोंडावर येणाऱ्या पुटकुळ्या

मोतीचूर–कपड्याचा जरीचा कांठ

म्हलप–डोलत, लपलप असा आवाज करीत.

येका शेज–एका सहज–सहज

येटन–वेष्टन–वेठन–येठन–गाडी, औत यांना जूं, धुरे इत्यादि जोडून त्यांना बांधणारी कातड्याची वार्ती अथवा तागाची धांद.

येतो राती–येती राहाती, येत राहते, येत असते

यौग–युग–काळ

यौगिनी–अंबेच्या चौसष्ट योगिनी.

रंवला–रंभेला

रयी-रही-रहिवास–राहणारें, स्थिर

रवा–कण

रसन–रास–ढीग

रहाटे–वागतो

राऊ–राधा–राधू–राहू–राऊ

राकडीगोंडा–सोन्याची राखडी आणि वेणींतील रेशमास बांधलेलीं [?]न्याचीं फुलें हाच गोंडा

राजस–राजहंस

रासविद–राजवीथि–राजमार्गावर

रासन्या–तिफण चालली असतां मागें जो तास पडतो तो बुजविण्यासाठीं मागून औत चालविणारा माणूस

रेंदा–रवंदळलेला चिखल

लसूलशी-नसोनशी-धमनीधमनींतून लसलस करणारी

लामन–लांबण

लिंवायार–लिंबारें–लिंबाचें झाड

लिंबोळी–गळ्यांतील डागिना, लुगड्याचा एक प्रकार

लेंडी–गांवाशेजारील ओहळ

वज्री–स्नान करतांना अंग घास-ण्याचा दगड

वत–ओत-नदीच्या पुराचें पाणी ज्यांतून जातें तें लवण

वरई–एक धान्य

वरंगळी–घरंगळी, उतारास, घसरणीला

वसू–बैल

वळण–वलानी, कपडे ठेवण्याची दोरी

वाकस–सुताराचें लाकुड तासण्याचें शस्त्र

विघाटें–एक फळ, आखाडी द्वादशीस विठ्ठलाच्या नैवेद्यांत याची भाजी करतात.
वाडीदिडी–वाढीनें दिढीनें
वायल्या वेगळ्या, एकीकडे
वारू–विशेष नाम
वावडी–धान्य उपनायची तव्हई
वैजंती-वैजयंती-विष्णूच्या गळ्यांतील माळ
वैराळ–कासार
शाहीमिरग–शहामृग
शेवरी–एक झाड
शेषनाखालीं–सिंहासनाखालीं
शेसे–शिष्या
सकलाद–सखलाद् द्वीपकंबलः–एक कापड
सज–सहज
सर्जा–(सर्जा सिंहः)–श्रेष्ठ, मोठा नथेंभोंवतीं लावलेले मोत्यांचे घोस
सतीचा-सत्त्वाचा,सत्तेचा,साध्वीचा
सबर–सभर–भरलेली, गाभा गेलेली घोडी
संबला–शेमला, पटका
संबरत–समरत–समर्थ
सरपाळी–(सरपळी का ) गळ्यांतील वा कमरेची सांखळी
सरमनी–मोत्यांची एक पदरी माळ
सरावन–श्रावण, एक मातृपितृभक्त पुत्र
सरू–सरस्वती
सलकडें–शलाका+कटक-पुरुषाच्या हातांतील बारीक कडें
सवसनी–सर्वे + निशी–सवशानी–सवेंल, लागलीच
सवळें–शाम्युल्वणम्-साऊलें सोवळें–रेशमी वस्त्र, पीतांबर
सवासिनी धरणें–सुवासिनींची आणि पात्रांची पूजा करून सुवासिनींना जेवूं घालणें
सळई-शलाका–काडी (सोन्याची)
सागल–छागल–(शेळीच्या कातड्याची)–पाण्याची पिशवी
साटाची–सांठवणीची
साटी– चाटी, कापडाचा व्यापारी
सात–सार्थ–बाजारपेठ
सातीच्या सुगरणी–बाजारबसव्या, मोहविणाऱ्या
सापत्या–बैलांच्या गळांतील जोती
सामधाम–सावधान
सारंगी–घोड्याची जात

मासुळी–बायकांच्या पायाच्या बोटांतील चांदीचा नग

मुडी–दुमतणें, मुडपणें, मोडणें.

मुरूम–तारुण्यांत तोंडावर येणाऱ्या पुटकुळ्या

मोतीचूर–कपडयाचा जरीचा कांठ

म्हलप–डोलत,लपलप असा आवाज करीत.

येका शेज–एका सहज–सहज

येटन–वेष्टन–वेठन–येठन–गाडी, औत यांना जूं, धुरे इत्यादि जोडून त्यांना बांधणारी कातडयाची वार्ती अथवा तागाची धांद.

येतो राती–येती राहाती, येत राहते, येत असते

यौग–युग–काळ

यौगिनी–अंबेच्या चौसष्ट योगिनी.

रंवला–रंभेला

रयी-रही-रहिवास–राहणारें, स्थिर

रवा–कण

रसन–रास–ढीग

रहाटे–वागतो

राऊ–राधा–राधू–राहू–राऊ

राकडीगोंडा–सोन्याची राखडी आणि वेणींतील रेशमास बांधलेलीं [illegible]न्याचीं फुलें हाच गोंडा

राजस–राजहंस

रासविद–राजवीथि–राजमार्गावर

रासन्या–तिफण चालली असतां मार्गे जो तास पडतो तो बुजविण्यासाठीं मागून औत चालविणारा माणूस

रेंदा–रवंदळलेला चिखल

लसूलशी-नसोनशी-धमनीधमनींतून लसलस करणारी

लामन–लांवण

लिंबायार–लिंबारें–लिंबाचें झाड

लिंबोळी–गळयांतील डागिना, लुगडयाचा एक प्रकार

लेंडी–गांवाशेजारील ओहळ

वजरी–स्नान करतांना अंग घासण्याचा दगड

वत–ओत–नदीच्या पुराचें पाणी ज्यांतून जातें तें लवण

वरई–एक धान्य

वरंगळी–घरंगळी, उतारास, घसरणीला

वसू–बैल

वळण–वलानी, कपडे ठेवण्याची दोरी

वाकस–सुताराचें लाकुड तासण्याचें शस्त्र

वघाटें–एक फळ. आखाडी द्वादशीस विठ्ठलाच्या नैवेद्यांत याची भाजी करतात.
वाडीदिडी–वाढीनें दिढीनें
वायल्या वेगळ्या, एकीकडे
वारू–विशेष नाम
वावडी–धान्य उपनायची तव्हई
वैजंती-वैजयंती-विष्णूच्या गळ्यांतील माळ
वैराळ–कासार
शाहीमिरग–शहामृग
शेवरी–एक झाड
शेषनाखालीं–सिंहासनाखालीं
शेसे–शिष्या
सकलाद–सखलाद् द्वीपकंबल:–एक कापड
सज–सहज
सर्जा–(सर्जा सिंह:)-श्रेष्ठ, मोठा नथेंभोंवतीं लावलेले मोत्याचे घोस
सतीचा-सत्त्वाचा,सत्तेचा,साध्वीचा
सबर–सभर–भरलेली, गाभा गेलेली घोडी
संवला–शेमला, पटका
संबरत–समरत–समर्थ
सरपाळी–(सरपळी का) गळ्यांतील वा कमरेची सांखळी
सरमनी–मोत्यांची एक पदरी माळ
सरावन–श्रावण, एक मातृपितृभक्त पुत्र
सरू–सरस्वती
सलकडें–शलाका+कटक-पुरुषाच्या हातांतील बारीक कडें
सवसनी–सवें + निशी–सवशानी–सवेंल, लागलीच
सवळें–शाम्युल्वणम्-साऊलें सोवळें–रेशमी वस्त्र, पीतांबर
सवासिनी धरणें–सुवासिनींची आणि पात्रांची पूजा करून सुवासिनींना जेवूं घालणें
सळई-शलाका–काडी (सोन्याची)
सागल–छागल–(शेळीच्या कातड्याची)-पाण्याची पिशवी
साटाची–सांठवणीची
साटी– चाटी, कापडाचा व्यापारी
सात–सार्थ–बाजारपेठ
सातीच्या सुगरणी–बाजारबसव्या, मोहविणाऱ्या
सापत्या–बैलांच्या गळांतील जोती
सामधाम–सावधान
सारंगी–घोड्याची जात

सारावारी-आवरणें, सावरणें, व्यवस्थित करणें
सिद्ध-सिद्धी
सिनन-सारख्या वयाचा
सिवनी-शिवेहून
सुर्वेपान-सूर्यपान, एक तेजस्वी रत्न
सैवरांनं-सायवारीनें, सोयीनें
सोगा-पदराचें टोंक
सोभाईक-स्वाभाविक, (शोभादायक ?)
हलकी-डफडें, वाद्य
हवा-शोभा
हाटवटीं-बाजारांत
हाळवट-हलका
हिंगणबेट-एक झाड
हिलायाल-हिलालस्तु प्रदीपकः-मोठी दिवटी
हुलवान-तारुण्यानें मुसमुसलेली
हेडचा-गाय, बैल, म्हैस, घोडा इत्यादींचा व्यापारी
हेल-गाडीच्या साटयावर आलेला कडव्याचा उंच भाग
हेळ-अवहेलना.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28125 दि: 3.1.05
क्रमांक 9723 नों: दि: 28.11.2005
ग्रं. क्र. 90089
REFBK-0010048
REFBK-0010048

## डॉ. ना. गो. नांदापूरकर यांचे ग्रंथ

१. **मुक्त-मयूरांचीं भारतें** :– श्रीमद्व्यास, मुक्तेश्वर आणि मोरो-पंत यांच्या भारतांचा तौलनिक अभ्यास म्. रु. १५-०-०

२. **वाग्विलास** :– स्फुट कवितांचा संग्रह

३. **मायबोलींची कहाणी** :– मराठी भाषा आणि साहित्य यांचा रसपूर्ण इतिहास. ज्ञानबा–तुकारामांची शैलीपूर्ण जीवनगाथा रु. १ ५० न. प.

४. **चंद्रहास्यकथा** :– कवि रामसुतात्मजाच्या दीर्घ कथाकाव्याचें विवेचक, रसपूर्ण आणि अभ्यासू समालोचन आणि वैशिष्ट्य-पूर्ण संपादन रु. २–०–०

५ **लांकडी सासू आणि इतर कथा** :– प्रचलित लोककथांचा लहान मुलांनाहि आवडेल असा चिमुकला संग्रह ०. ५० न. पै.

६ **मराठी भारतांचें स्वातंत्र्य** : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वर्धापनदिनानिमित्त केलेलें अभिभाषण रु. १–०–०

७. **माहेरचं मराठी** :– मराठवाड्यांतील सर्व भागांतील आणि सर्व स्तरांतील विविध लोकगीतांचा संग्रह रु. १–०–०

८. **मराठीचा मोहोर** :– मराठवाड्यांतील सर्व भागांतील आणि सर्व स्तरांतील विविध लोकगीतांचा संग्रह रु. १ २५ न पै.